# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७४६/२००९.

श्री. मिताराम आत्माराम सराटे,
मु. मंगेझरी, पो. डाक सुकळी,
ता. तिरोडा, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. के. एन. के राव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी,
गोंदिया.

श्री. के. बी. मिश्रा,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अधिक्षक,
जिल्हाधिकारी कार्यालय (जमिन शाखा),
गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे उशिरा हजर झाले आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.६.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हाािकारी कार्यालय, गोंदिया यांचेकडे सन २००१ ते आजपर्यंत मौजा कोडोबर्रा येथील ग.न. १५८ आराजी ०.९५ हे. आर. जमीन सरकार जमा करण्यात यावे यासाठी तहसीलदार, तिरोडा यांना पाठविले त्याबाबतची माहिती व्यक्तिशः हवी आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, गोदिया यांनी उपविभागीय अधिकारी, गोंदिया यांचेकडे जमीन सरकार जमा करण्याची प्रकरणे या कार्यालयाचे पत्र दिनांक

१.६.२००९ अन्वये पुढील आवश्यक कार्यवाही करण्याकरिता आपणाकडे पाठविण्यात आली आहेत. करिता अर्जदार यांचे अर्जात नमुद माहिती संबंधितांना उपलब्ध करुन देण्याबाबत नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावे असे उपविभागीय अधिकारी, गोंदिया यांना कळवून सदरच्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता श्री. मिताराम आत्माराम सराटे, मु. मंगेझरी, पो. सुकळी (डाकराम), ता. तिरोडा यांना दिलेली आहे व त्यात उपविभागीय अधिकारी, गोंदिया यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांनी दिनांक १.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक ८.९.२००९ रोजी निर्णय देण्यात आला असून दोन्ही पक्षाचे म्हणणे व पुरावे लक्षात घेता अर्जदार/ अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती अर्धन्यायीक बाब आहे. माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे ती पुरविणे. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, गोंदिया यांचे कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदार/अपीलकर्त्यास कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविल्याचे अंतिम सुनावणीत दिसून आले व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यांत आलेले आहे व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी आज उपस्थित नाही व त्यांची निवडणूक अधिकारी असल्यामुळे ते उपस्थित राहू शकत नाही अशा प्रकारे पत्र पाठविले आहे. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दिनांक २७.७.२००९ रोजी सदर प्रकरणाची झेरॉक्स प्रत पाठविलेली आहे व यावरुन त्यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे प्रथम अपील खारीज करण्यात आले असे दिसून येते. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना सन २००२-२००३ पासून तक्रार केलेली आहे. परंतु आज पर्यंत त्या तक्रारीची चौकशी होत नाही. मात्र त्यांना फक्त झेरॉक्स प्रत दिलेली आहे. त्यावरुन माहिती उपलब्ध होत नाही. अपीलकर्ता यांना अतिम निर्णयाची अपेक्षा दिसून येते. त्यामुळे सदरचे अपील हे निवासी उपजिल्हाधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे फेर चौकशी करिता पाठविणे आवश्यक आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी सदरच्या अपीलामध्ये फेर चौकशी करुन अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेली माहिती सार्वजनिक निवडणूक निकालानंतर ३० दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७४१/२००९.

श्री. अरुण अमृत गवई,
सी.पी.डब्ल्यू.डी. क्वॉर्टर नं. २७,
टाईप - तीन (जुने), सिव्हील लाईन,
नागपूर - ४४० ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
अकोला.

श्री. बी. एन. मदनकर,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.६.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, अकोला यांचेकडे एकूण ८ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १५.७.२००९ रोजी अर्जदारास ७ दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन देणे सोईचे होईल असे मंडळ अधिकारी, खांबोरा उजवा सर्कल यांना आदेश दिलेले दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी तत्पुर्वीच दिनांक ९.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १३.८.२००९ रोजी देण्यात आला असून अर्जदाराने मागणी केलेल्या माहिती पेक्षा तयार असलेली माहिती खरोखर त्रोटक व अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले. यावरुन याद्वारे जनमाहिती

... २

अधिकारी, तहसील कार्यालय, अकोला यांना आदेशीत करण्यांत येते की, सदर माहिती ही विविध माहिती अधिकाऱ्यांना हस्तांतरीत होणे आवश्यक होते. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी ती माहिती संकलीत करण्यामध्ये वेळ घालविला व विहित मुदतीत माहिती दिली नाही. त्यामुळे आता सदर अर्ज इतर माहिती अधिकाऱ्यांकडे न पाठविता ती संकलीत करुन अर्जदारास विनामुल्य पुरविण्यात यावी. मागितलेली माहिती अंदाजे ३० पृष्ठांची आहे अशा प्रकारे आदेश दिलेले दिसून येते व त्याप्रमाणे १९ पृष्ठांची माहिती अपीलकर्ता यांना दिनांक १६.९.२००९ रोजी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु संपूर्ण माहिती उपलब्ध झाली नव्हती म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना मुद्या क्रमांक १ ची माहिती उपलब्ध झाली नाही. मात्र मुद्या क्रमांक ८ ची माहिती अजुन पर्यंत उपलब्ध करुन दिली नाही. मुद्या क्रमांक २, ३, ४, ६ व ७ ची माहिती ही तहसीलदार, अकोला यांचे कार्यालयातून उपलब्ध होऊ शकते. अपीलकर्ता यांनी अर्ज जो केलेला आहे त्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली आहे व त्यातही त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मुद्या क्रमांक ८ च्या संदर्भामध्ये फेरफार कशाचे आधारावर घेतले आहे त्याबद्यलची माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत मुद्या क्रमांक २, ३, ४, ६ व ७ ची माहिती तहसीलदार यांचे कार्यालयातून विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) मुद्या क्रमांक ८ ची माहिती फेरफार कशाचे आधारे घेतले आहे ही संबंधित तलाठी किंवा तहसीलदार अभिलेखागारातून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७३८/२००९ व अपील क्रमांक ७३९/२००९.

श्री. यु. एस. नामदेव,
०७, कमल केशव प्लाझा,
रामदासपेठ, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर आयुक्त,
आदिवासी विकास महामंडळ कार्यालय,
गोकुलपेठ, नागपूर.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
गार्डीनर हायस्कूल,
सिव्हील लाईन, नागपूर - ४४० ००१. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे विना अनुमती गैरहजर आहेत.

२. अपील क्रमांक ७३८/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, गार्डीनर हायस्कूल, नागपूर यांचेकडे एकूण ५ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २७.५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा देण्यात आलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांचेकडून कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नाही व आज त्या उपस्थित पण नाही व त्यामुळे जनमाहिती अधिकारी हया दोषी आढळून येतात व त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे मुख्याध्यापिका हया अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्तीस पात्र आहेत व त्यांचे विरुध्द रुपये २५०००/- शास्ती लादणे आवश्यक झाले आहे. परंतु शास्तीबद्यलचे त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक असल्यामुळे त्यांचा खुलासा घेणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता हाच अर्ज त्यांचे कार्यालयात सुध्दा केलेला होता. त्यावर काही माहिती उपलब्ध करुन दिली व काही माहिती संस्थेकडून घेऊन उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र करारनाम्याची प्रत त्यांचेकडे उपलब्ध नाही ती प्रशासन अधिकारी यांचेकडे आहे जी माहिती प्रशासन अधिकारी यांचेकडे आहे ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. जी माहिती उपलब्ध झ ाली नाही त्याकरिता मुख्याध्यापिका तथा जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक ७३९/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, गार्डीनर हायस्कूल, नागपूर यांचेकडे एकूण ८ मुद्यांची माहिती वर्ग ५ वा शैक्षणिक सत्र २००८-०९ ची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २०.५.२००९ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक १२.८.२००९ रोजी अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांनी मुख्याध्यापक, गार्डीनर हायस्कूल, नागपूर यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देण्याचा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५. अपीलकर्ता यांच्या दिनांक १५.४.२००९ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, गार्डीनर हायस्कूल, नागपूर हया अधिनियमाचे कलम २० प्रमाणे दोषी आढळून येतात अशी आयोगाची खात्री झाली आहे व त्यामुळे त्यांना पोट कलम (१) प्रमाणे शास्ती रुपये २५०००/- लादणे आवश्यक आहे. परंतु शास्ती लादण्यापूर्वी जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे अधिनियमाचे कलम २० प्रमाणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे त्यांचा खुलासा मागणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश दिलेले असून सुध्दा माहिती दिली नाही व त्यामुळे सुध्दा ते दोषी आढळून येतात. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपील क्रमांक ७३८/२००९ व अपील क्रमांक ७३९/२००९ ही दोन्ही अपीले मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, गार्डीनर हायस्कूल, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाचे कलम ७(१) चे उल्लंघन केलेले आहे व त्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे त्या शास्तीस पात्र आहेत. त्यामुळे त्यांचे विरुध्द प्रत्येकी रुपये २५०००/- ची शास्ती कां लादण्यात येऊ नये याचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगाकडे करण्यात यावा. अन्यथा प्रत्येकी रुपये २५०००/- ची शास्ती कायम होईल.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १.१०.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७५३/२००९.

श्री. नंदलाल श्रावण करंबे,
रा. चांदली, ता. ब्रम्हपूरी,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.

श्री. अशोक डी. गायकवाड,
जनमाहिती अधिकारी तथा
तलाठी, सा. क्र. ३, कालेता,
ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तलाठी कार्यालय, कालेता, सा.जा.क्र. ३ यांचेकडे मौजा चांदली येथील गट नं.७८ ची श्रावण नारायण करंबे फेरफार पंजी दिनांक ३०.३.१९७६ मिळणेबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती प्रत्यक्ष घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २२.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तलाठी यांनी तलाठी हे प्रत्येक ५ वर्षांनी रेकॉर्ड रुमला किंवा तालुक्यात जमा करीत असेल या कारणामुळे आपण तालुक्यात किंवा चंद्रपूर येथील रेकॉर्ड रुमला सन १९७६ ची फेरफार पंजीची मागणी करावी. मौजा चांदली येथील ग.क्र. ७८, दिनांक ३०.३.१९७६ ची फेरफार पंजी तलाठी दप्तर मध्ये उपलब्ध नसल्यामुळे आपणाला पंजीची नक्कल देता येत नाही. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक२८.७.२००९ रोजी प्रथम अपील

... २

दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानुसार तहसीलदार, ब्रम्हपूरी यांनी दिनांक ३०.३.१९७६ ची फेरफार पंजी अभिलेखागारामध्ये शोध घेतले असता सदर पंजी आढळली नसल्यामुळे पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही जुनी १९७६ ची असल्यामुळे सन १९८२ ला हलकाबंदी झाल्यामुळे मौजा चांदली हे गांव खेड हलक्यामध्ये समाविष्ट होते. हलकाबंदी होण्यापूर्वी तलाठी, खेड यांनी आपला जुना रेकॉर्ड तालुक्यात किंवा जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे कार्यालयातील रेकॉर्ड रुमला जमा केलेला असावा. तसेही तलाठी प्रत्येक ५ वर्षानी रेकॉर्ड रुमला किंवा तालुक्यात जमा करीत असेल या कारणामुळे आपण तालुक्यात किंवा चंद्रपूर येथील रेकॉर्ड रुमला सन १९७६ ची फेरफार पंजीची मागणी करावी या कारणामुळे मौजा चांदली या कार्यालयात उपलब्ध नाही असे आयोगाचे पुढे सांगितले. त्यामुळे सदरच्या रेकॉर्ड संबंधामध्ये तहसीलदार कार्यालयातील अभिलेखागारामध्ये कसून चौकशी करणे आवश्यक आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अभिलेखागारामध्ये सदरचे प्रकरण जमा केले असल्यामुळे अपीलकर्ता यांना संबंधित माहिती त्या कार्यालयातून मागवून उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक ७.७.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार, ब्रम्हपूरी यांनी तहसील अभिलेखागारामध्ये कसून शोध घेऊन कशाचे आधारे फेरफार करण्यात आले ती कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात यावी किंवा जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे अभिलेखागारात संबंधी शोध घेऊन सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास नायब तहसीलदार/तहसीलदार हे शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७५७/२००९.**

श्रीमती लक्ष्मीबाई दत्तुजी मेश्राम,
रा. नवीन भानेगांव, पो. खापरखेडा,
ता. सावनेर, जि. नागपूर. **..... अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. सलामपुरे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
पंचायत विभाग,
जिल्हा परिषद, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक ३१.८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक २२.६.२००९ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत विभाग), जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद, नागपूर यांनी दिनांक ११.९.२००९ ला ठेवलेल्या सुनावणीमध्ये मला विस्तृत माहिती मिळाली व त्यावरुन माझे संपूर्ण समाधान झाले आहे. त्यामुळे मी केलेली तक्रार परत घेत आहे असे अपीलकर्ती यांनी दिनांक ११.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगास निवेदन दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ५.१०.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८६२/२००९.**

श्री. अरुण विठ्ठलपूरी वैकुंठी,
प्लॉट नं. ५८, बँक कॉलोनी,
दुर्गानगर, मानेवाडा रोड, नागपूर - ४४० ०२४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. सुधाकर रणदिवे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
गोसावी हायस्कूल, लिंगा,
ता. कळमेश्वर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.५.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गोसावी हायस्कूल, लिंगा यांचेकडे माझे आजीवन सदस्यत्व रद्य करुन मला संस्थेच्या कार्यकारणीतून काढण्यात आल्याबाबतची माहिती एकूण ३ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरच्या माहितीचा कालावधी वर्ष २००९ असून सदरची माहिती रजिस्टर्ड टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.६.२००९ रोजी मागितलेली माहिती ही संस्थेच्या संदर्भात असल्यामुळे संस्थेचे सचिव श्री. जयप्रकाशजी पुरी यांना पत्र पाठविले. परंतु त्यांनी आपणास अपेक्षित असलेली माहिती मला पुरविण्यात आली नाही. त्यामुळे मी आपणास अपेक्षित असलेली माहिती देण्यास असमर्थ आहे. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.७.२००९ रोजी अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे अनुषंगाने प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ५.९.२००९ रोजी अपीलकर्ता यांनी सचिव, गोस्वामी आदिवासी बहुउद्येशीय औद्योगिक शिक्षण संस्था, पाचपावली बंगल्याच्या आखाडयाच्या मागे, रामनिवास, नागपूर यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारे आदेश देण्यात आलेले आहेत. परंतु संस्थेच्या सचिवांनी कोणत्याही प्रकारची माहिती आता पर्यंत अपीलकर्ता यांना न दिल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी मुळातच संस्थेची माहिती ही जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना मागितली. मुख्याध्यापक हे संस्थेचे माहिती अधिकारी नसून शाळेचे माहिती अधिकारी आहेत. त्यामुळे संस्थेकडील माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता त्यांनी संस्थेकडे अर्ज करणे आवश्यक होते. संस्थेकडे अर्ज केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी संस्थेस माहिती देण्याबाबत आदेश दिलेले आहेत. परंतु संस्थेने आदेशाचे पालन केलेले नाही. संस्थेला शाळेकरिता अनुदान मिळते. त्यामुळे संस्थेस मिळणाऱ्या सादिल अनुदान संबंधी निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यामुळे शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांनी त्यांच्या अधिकाराचा वापर करुन संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. तसे न केल्यास त्यांचे सादिल अनुदानाबाबत त्यांचे अधिकारात शिक्षा करणे संयुक्तिक राहिल. त्यामुळे सदरचे अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे पुन्हा परत करणे संयुक्तिक राहिल.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे प्रथम अपीलाची सुनावणी पुन्हा घेण्यात येऊन प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांनी संस्थेकडून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी व तसे न केल्यास संस्थेविरुध्द योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १६.१०.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८६६/२००९ व अपील क्रमांक ८६७/२००९.**

श्री. गुरुदेव व्यंकटराव ताजणे,
रा. जाटलापुर, पो. मासोद,
ता. काटोल, जि. नागपूर.

श्री. भाऊराव किसन डोंगरे,
मु. पो. मासोद, ता. काटोल,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
लघु सिंचाई जिल्हा परिषद (कामे)
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.

श्री. एस. डी. बलविर,
जनमाहिती अधिकारी तथा
विशेष भुअर्जन अधिकारी,
जिल्हा परिषद (कामे),
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. भैसारे, आरेखक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दोनही अपीलामध्ये दिनांक २२.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा भुअर्जन अधिकारी, लघु सिंचाई, जिल्हा परिषद कामे, नागपूर यांचेकडे जमीनीचा योग्य मोबदला मिळण्याबाबत मौजा फुसागोंदी त.सा.क्र. ६५, ता. काटोल, जि. नागपूर सर्वे नं. १०२ आराजी ४ व्हेक्टर ५३ आर मधील व सर्वे नं. १०३३ आराजी ३ हेक्टर ७३ आर. मधील किती शेती तलावात संपादित केली आहे याबाबतची माहिती

... २

नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून दिनांक २४.८.२००९ रोजी त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३१.८.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना जी माहिती पुर्वी उपलब्ध करुन दिलेली आहे त्या संदर्भात दिनांक ३१.८.२००९ रोजी पत्र दिलेले दिसून येते.

३. परंतु अपीलकर्ता यांना कागदपत्राची आवश्यकता आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे कार्यकारी अभियंता, लघु सिंचाई विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांनी दिनांक १.९.२००९ रोजी भुअर्जन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचेकडे आपले कार्यालया अंतर्गत नेमण्यात आलेल्या प्रथम अपीलीय अधिकारी यांचे स्तरावर सुनावणी घेऊन अपीलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविण्यात यावी असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यातून माहिती उपलब्ध होईलच असे दिसून येत नाही त्यामुळे अपीलकर्ता यांना दिनांक २९.३.२००८ रोजी तसेच दिनांक ८.७.२००९ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या माहितीच्या आधारे जी नस्ती उपलब्ध आहे त्या नस्तीच्या सर्व छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. सदरची माहिती विशेष भुअर्जन अधिकारी, जिल्हा परिषद कामे, नागपूर यांचेकडे किंवा जिल्हाधिकारी यांचेकडे आहेत अशा प्रकारचा वाद न करता दोनही अपीलकर्ता यांनी त्यांनी मागितलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांची दोनही अपीले ही अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांची दोनही अपीले ही अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना विशेष भुअर्जन, जिल्हा परिषद कामे, नागपूर यांनी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर किंवा जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांनी मिळून अपीलकर्ता यांना सदरच्या नस्तीचा शोध घेऊन संपूर्ण कागदपत्रे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत विनामुल्य छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी. असे न केल्यास जनमाहिती अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयातील माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १६.१०.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७९४/२००९.

श्री. मिलिंदकुमार आय. चवरे,
आंबेडकर वार्ड, आसोली,
ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी, सफाई विभाग,
नगर परिषद, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. मागील तारखेस दिनांक ७.१०.२००९ रोजी उत्तरवादी सुध्दा हजर होते. मात्र आज हजर नाहीत. त्यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.६.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी नगर परिषद, गोंदिया यांचेकडे सन २००० पासून ते आजपर्यंत श्री. दिपक मनोहर माटीया, सफाई कामगार, स्वास्थ विभाग, नगर परिषद, गोंदिया इथे कामावर होते. त्यांची प्रकृती नेहमी अस्वस्थ राहत असल्याने तसेच शारीरीक व मानसिक कमजोरीमुळे त्यांनी नौकरी करण्यास असमर्थता दर्शविली व मुदतपुर्व सेवा निवृत्ती मिळण्याकरिता आपल्या कार्यालयात अर्ज दाखल केला. या अर्जाची प्रत या अर्जावार काय कार्यवाही झाली या अर्जासोबत कोणकोणते कागदपत्र जोडण्यात आले कोणते मागविण्यात आले. त्याला सेवानिवृत्ती दिली का केंव्हा दिली तो आदेश व

... २

त्यांच्या मुदतपूर्व सेवानिवृत्तीनंतर त्यांचया कोणत्या नातेवाईकांस त्यांच्या जागी बदली नौकरी देण्यात आली. या संदर्भात सादर केलेले नातेवाईकाचे अर्ज व इतर कागदपत्र तसेच या केससी संबंधित सर्व कागदपत्र सह सविस्तर माहिती देण्यात यावी. दिपक मनोहर माटीयाच्या जागी त्यांच्या पत्नीला नौकरी दिली का जर नाही तर का. दिपक ज्या जागी सुभाष मोहितेला घेतले कां ? घेण्याचे कारण सर्व कागदपत्रासह सविस्तर माहिती देण्यात यावी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २२.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाकडे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक १.१०.२००९ रोजी अपीलकर्ता यांना कागदपत्रे देण्यात आलेली आहेत. परंतु सदरची माहिती जुनी असल्यामुळे नगर परिषद रेकॉर्डमध्ये गाहाळ झाल्यामुळे ती सापडत नसल्यामुळे त्यांना पुरविण्यांत विलंब झाला आहे. परंतु मुद्याम जाणीवपूर्वक कागदपत्रे देण्यास टाळाटाळ करण्यास आलेली नाही असा खुलासा जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ६.१०.२००९ रोजी आयोगाकडे केलेला आहे. मात्र अपीलकर्ता यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणले की, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांची जबाबदारी टाळली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांना त्यांचे लिपिकांनी त्यांचेकडे अपीलाची कागदपत्रे सादर केली नाही व अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे कागदपत्रे सादर न करता लिपिकाकडे दाखल केली व त्यामुळे सुनावणी घेता आली नाही असेही आयोगाचे निदर्शनास आणले. तसेच अशा प्रकारची कोणतीही सुचना नगरपरिषद कर्मचाऱ्यांनी दिली नाही व त्यामुळे कोणतेही कागदपत्रे ही आवक लिपिक यांचेकडे दाखल केले जातात. माहितीच्या अधिकारातील अशी कोणतीही कागदपत्रे अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल करावयाची अशा प्रकारची सूचना नसल्याने ते संबंधित लिपिकाकडे दाखल करावी लागतात. त्यामुळे संबंधित जबाबदारी टाळू शकत नाही. लिपिकांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे कागदपत्रे सादर केली नसल्यामुळे लिपिकाचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक ठरते. तसेच दिनांक २२.७.२००९ रोजी श्री. व्ही. के. जक्कुलवार हे मुख्यअधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी, नगर परिषद, गोंदिया

म्हणून कार्यरत होते. श्री. व्हि. के. जक्कुलवार हे उपजिल्हाधिकारी असून त्यांचेकडे मुख्यअधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार त्यांच्याकडे हाता व त्यामुळे ते केवळ महत्वाचे कामकाज पाहात होते. नगरपरिषद संबंधित कर्मचाऱ्यानी ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिलेली दिसुन येत नाही व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी या प्रकरणात दाखल असलेले अपील निकाली काढले नाही. अशा प्रकारे केलेला खुलासा अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास आणला आहे व त्यावरुन अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे दाखल केलेले प्रथम अपील हे सुध्दा महत्वाचे प्रकरण असते व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे जर अतिरिक्त कार्यभार असेल तर त्यांना ही जबाबदारी टाळता येणार नाही. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी अधिनियमाचे तरतूदीचे पालन करणे हे आवश्यक आहे. अतिरिक्त कार्यभार आहे किंवा नाही हे महत्वाचे नाही व त्यामुळे अशा प्रकारची जबाबदारी टाळण्यात येऊ नये याची नोंद घ्यावी व त्यामुळे संबंधित लिपिकाचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक राहिल. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येते.

२) संबंधित आवक लिपिका विरुध्द योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २९.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८१७/२००९.

श्री. मिलिंदकुमार आय. चवरे,
आंबेडकर वार्ड, आसोली,
ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, गोंदिया.

श्री. एस. जी. घरसेले,
जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. वाय. बी. रंगारी, उपशिक्षणाधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे सर्वशिक्षा अभियान अंतर्गत शिक्षकांना संगणक प्रशिक्षण. माहितीचा कालावधी १ जानेवारी २००१ ते आज दिनांक ३ जुलै २००१ पर्यंत एकूण ९ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ११.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक ११.८.२००९ रोजी अपीलकर्ता यांना दिनांक ३.७.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.८.२००९ ला दुपारी १४:०० वाजता प्रत्यक्ष उपस्थित राहावे व माहिती हवी असल्यास व गरज असल्यास नेण्यात यावी. उपस्थित न झाल्यास माहितीची आपणांस आवश्यकता नाही हे समजण्यात येईल असे ही कळविलेले दिसून

... २

येते. त्यावर दिनांक २५.८.२००९ रोजी अपीलकर्ता यांना आक्षेप घेणारे पत्र दिले आहे व त्यात आवश्यक असलेली माहिती आतापर्यंत मिळाली नाही असे नमुद केलेले आहे व त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये न्यायालयामध्ये केस दाखल करण्यात आलेली आहे व त्या केसच्या संदर्भामध्ये जी काही कागदपत्रे दाखल केलेली आहेत ती अपीलकर्ता यांना दिलेली आहेत. परंतु अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे दिनांक ३.७.२००९ रोजी माहिती मागितली आहे ती मात्र देण्यात आली नाही असे त्यांनी मान्य केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कोणत्याही प्रकारची कायदेशीर जबाबदारी पार पाडली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी आतापर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना संपूर्ण ९ मुद्यांची माहितीचे कागदपत्राचे स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३.७.२००९ (६.७.२००९) च्या अर्जाचे अनुषंगाने ९ मुद्दे निहाय माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य कागदपत्राचे स्वरुपात व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांना माहिती तयार झाल्यावर कळविण्यात यावे व अपीलकर्ता यांनी मुद्येनिहाय कागदपत्राचे स्वरुपात विनामुल्य माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) संबंधित आवक लिपिका विरुध्द योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- २९.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८७२/२००९.**

श्री. मिलिंदकुमार आय. चवरे,
आंबेडकर वार्ड, आसोली,
ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर पोलीस अधिक्षक,
जिल्हा गोंदिया.

श्री. संतोष कुंभारे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
जिल्हा गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.७.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, गोंदिया यांचेकडे फौ.प्र.क्र. २८३/०६ विनोद वि. गगन + २ मध्ये मा.न्यायाधीश यांनी दिलेल्या आदेशानुसार मा.उपविभागीय अधिकारी पोलीस यांनी सदर प्रकरणात चौकशी करुन आपला चौकशी अहवाल/अभिप्राय मा. न्यायालयासमोर दाखल केली. सदर प्रकरणात एफआयआर एम-१/०८ नोंदविण्यात आली व चौकशी अंती न्यायालयात अहवाल सादर केला. यात मा. पोलीस अधिकारी/अन्वेषण अधिकारी यांनी न्यायालयात दाखल केलेल्या या केससंबंधी चौकशी संबंधी सर्व कागदपत्र आरोपी व फिर्यादी यानी दाखल केलेल्या सर्व कागदपत्र व चौकशीत आलेल्या सर्व बयान सहीत सर्व कागदपत्र देण्यात यावे. अशी माहिती

... २

व्यक्तिशः मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३१.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, गोंदिया यांनी सदर गुन्हयाचा तपास आम्ही उपविभागीय पोलीस अधिकारी, गोंदिया नी केलेला असून सविस्तर अंतिम अहवाल मुळ केस पेपर्ससह या कार्यालयाचे दिनांक १९.१०.२००८ अन्वये मा.जे.एम.एफ.सी. वर्ग-१ ले कोर्ट-२ रे गोंदिया यांचे कोर्टात सादर करण्यात आलेले आहे. तरी संबंधित कोर्टातून केस पेपर्सच्या प्रती आपण उपलब्ध करुन घ्याव्यात. सदरच्या उत्तराने न झाल्यामुळे दिनांक १.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पोलीस अधिक्षक, गोंदिया यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावे असा आदेश दिलेला दिसून येतो व प्रथम अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक, कॅम्प देवरी, जि. गोंदिया यांचेकडे हस्तांतर केलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना त्यासंदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता हे न्यायालयामध्ये तक्रार दाखल करणारे श्री. विनोद बन्सोड यांचे वकील असून ती खाजगी तक्रार आहे व त्यामुळे फौजदारी संहिते प्रमाणे मा. न्यायालयाने सदरच्या तक्रारीचे संदर्भामध्ये पोलीसांना चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे मा.जे.एम.एफ.सी. गोंदिया यांचेकडून सिआरपीसी कलम १५६(३) अन्वये पोलीस स्टेशनला तक्रार प्राप्त झाल्यावरुन पोलीस स्टेशन, गोंदिया शहर येथे अप.क्र.एम-१/०८ कलम ३(२)(५) अ.जा.ज.अ.प्र. का. सहकलम ४०६, ४०९, ४१८, ४२६, ३४ भादविचा नोंदविण्यात आला होता व त्या गुन्हयाचा तपास आम्ही उपविभागीय पोलीस अधिकारी, गोंदियानी केलला असून सविस्तर अंतिम अहवाल मुळ केस पेपर्ससह या कार्यालयाचे दिनांक १९.१०.२००८ अन्वये मा.जे.एम.एफ.सी. वर्ग-१ ले कोर्ट-२ रे गोंदिया यांचे कोर्टात दाखल करण्यात आलेले आहे व निर्णयातून प्रती मिळाल्या नाही. त्यामुळे माहितीच्या अधिकारात त्यांना माहिती मागितलेली आहे. वास्तविक अपीलकर्ता यांचे अपील हे तक्रार असल्यामुळे त्यांनी निश्चितच भा.फौ.त. संदर्भामध्ये पोलीसांनी दाखल केलेल्या अहवालाची प्रत ही उपलब्ध होऊ शकेल. परंतु ती न्यायालयातून न घेता माहितीच्या अधिकारात मागितली असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांना न्यायालयाने आदेश केलेले आहे व कोणत्याही प्रकारची कागदपत्रे उपलब्ध नाही व त्यामुळे

अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येणार नाही व तसेही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास न्यायालयाची परवानगी घ्यावी लागेल व त्याही पेक्षा पक्षकार हे स्वतःच तक्रारदार असल्यामुळे त्यांना सुध्दा प्रती मिळू शकतात. त्यामुळे माहितीच्या अधिकारामध्ये न्यायालयाचे आदेश असल्यामुळे सदरची कागदपत्रे उपलब्ध करुन देणे योग्य होणार नाही. त्याकरिता जनमाहिती अधिकारी यांनी पोलीस उपमहानिरीक्षक (का. व सु.) रश्मि शुल्का यांचे एक परिपत्रक तपासी अधिकाऱ्याने कार्यवाहीचा रोजनामा (केसडायरी) तक्रारदाराला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत देण्यात आल्याचे संदर्भामध्ये सर्व पोलीस आयुक्त, सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक, अपर पोलीस महासंचालक, सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक यांना सदरच्या पोलीस डायरीची माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही याबद्यलच्या सुचना देण्यात आलेल्या दिसून येतात. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती ही पोलीस डायरीची नसून जो एफआयआर मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे दाखल केला त्यासंदर्भात झालेल्या तपासणीची कागदपत्रांची माहिती, बयाण घेतल्याची माहिती त्यांनी मागितलेली आहे. परंतु त्यावर पुन्हा जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, न्यायालयाकडे सर्व कागदपत्रे सादर केलेली असल्यामुळे त्यांच्याकडे आता कोणत्याही प्रकारची कागदपत्रे उपलब्ध नाही व त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, असे होऊ शकत नाही. पुराव्यांच्या वेळेस हया कागदपत्राची आवश्यकता असते. त्यामुळे सदरची कागदपत्रे ही पोलीस यांचेकडेच आहेत. परंतु अपीलकर्ता हे जरी तक्रारकर्त्यांचे वकील असले तरी ते त्रयस्थ आहेत व त्यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे हे योग्य होणार नाही. ती मुळ न्यायालयास तक्रार करणारे श्री. विनोद बन्सोड यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक झाले असते व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २९.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८६८/२००९.**

श्री. जर्नादन विठ्ठल निकोडे,
रा. कांतापेठ, पो. भगवानपूर,
ता. मूल, जि. चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
ता. मुल, जि. चंद्रपूर.

श्री. डी. एस. भोयर,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, मुल,
जि. चंद्रपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.६.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसील कार्यालय, मुल यांचेकडे मौजा चिरोली येथील सर्व्हे नं. ६५५/७ चा सातबारा व नकाशा. विठ्ठल सुकरु निकोडे यांच्या अतिक्रमीत जमीनीचा खसरा अतिक्रमण नोंद. बुधा सुकरु निकोडे यांच्या अतिक्रमीत जमीनीचा सातबारा किंवा खसरा अतिक्रमण नोंद. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १.७.२००९ रोजी संबंधित तलाठी यांनी तहसीलदार यांना पाठविलेल्या अहवालाची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यात चिरोली येथील ६५५/७ चा ७/१२ व नकाशा संबंधामध्ये उपलब्ध रेकॉर्डमध्ये अतिक्रमण संदर्भातील नोंद नाही अशा प्रकारे अहवाल सादर केलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता

यांना पूर्ण माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा झालेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता आज गैरहजर आहेत. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तत्कालीन तलाठी श्री. व्ही. बी. गादेवार यांनी उपलब्ध रेकॉर्डमध्ये अतिक्रमण धारकाची अतिक्रमणबाबत ७/१२ अतिक्रमण पंजीत नोंद नाही म्हणून अपीलकर्ता यांना तसे कळविण्यात आले. परंतु त्यानंतर कार्यभार असलेले तलाठी यांनी सदरची नोंद आहे अशा प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली आहेत. त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देता येईल. यावरुन तत्कालीन तलाठी यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती तहसीलदार यांना दिलेली व तत्कालीन तलाठी हे शास्तीस पात्र आहेत. त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक राहिल व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांनी मागितलेल्या मुद्या क्रमांक २ व ३ ची माहिती कागदपत्राचे स्वरुपात छायांकित प्रतीचे स्वरुपात विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) तत्कालीन तलाठी श्री. व्ही. बी. गादेवार यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांना प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल करावे लागले. त्यामुळे तत्कालीन तलाठी श्री. व्ही. बी. गादेवार यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत उपविभागीय अधिकारी, मुल यांना माहितीकरिता व पुढील कार्यवाहीकरिता स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २९.१०.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८७७/२००९.

श्री. नागोराव लक्ष्मणराव सावरकर,
३९, देवतळे ले आऊट, अंबाझरी उद्यानाजवळ,
नागपूर - ४४० ० ३३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अजय रामटेके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त उपायुक्त (१) (सा.प्र.वि.),
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. वऱ्हाडे,
जनमाहिती अधिकारी तथा
कर निर्धारक, (सा.प्र.वि.),
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.६.२००९ (१२.६.२००९) रोजी जनमाहिती अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, नागपूर महानगरपालिका, केंद्रीय कार्यालय, नागपूर यांच्याकडे महानगरपालिका तर्फे घरांच्या असेसमेंटसाठी नेमण्यात आलेल्या खाजगी संस्था कोणाच्या आदेशान नेमण्यात आल्या त्याची माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती पुरविणेबाबत त्या संदर्भात एकूण ३२ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३.७.२००९ रोजी आपण अर्जात नमुद केल्याप्रमाणे आपणांस निश्चित अश्या कोणत्या एजंसीची माहिती पाहिजे आहे त्या एजंसीच्या नावाचा उल्लेख

... २

करावा. जेणेकरुन आपल्याला माहिती पुरविणे शक्य होईल. तसेच प्रश्नोत्तर स्वरुपात माहितीची मागणी केलेली आहे नेमकी कोणती माहिती पाहिजे आहे याचे आकलन होत नाही. कृपया मागितलेली माहितीबाबत सविस्तर चर्चा करावयाची असल्यास माहिती अधिकारी तथा कर निर्धारक यांची कार्यालयीन वेळेत भेट घ्यावी असे कळविलेले दिसून येते. पुन्हा दिनांक ३०.७.२००९ रोजी महासचिव, जनसमस्या निवारण संघर्ष समिती, नागपूर यांना सुध्दा स्पष्टीकरण करण्यासाठी पत्र दिलेले दिसून येते. तसेच प्रत्यक्ष येऊन कार्यालयात उपलब्ध नस्तीचे अवलोकन करावे व आपणास पाहिजे असलेल्या प्रतींची मागणी करावी. याकरिता आपण दिनांक ४.८.२००९ ला दुपारी १२:०० वाजता कर निर्धारक तथा माहिती अधिकारी यांचे महाल स्थित कक्षात त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन आपण विचारलेल्या प्रश्नोत्तरावर चर्चा करुन आपले समाधान करुन घ्यावे असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे समाधान न झ ाल्यामुळे त्यांनी दिनांक ११.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ८.९.२००९ रोजी देण्यात आलेला असून मागितलेल्या ३१ मुद्यांबाबत माहिती ८ दिवसात द्यावी असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढण्यात आलेले आहे व त्यानंतर अपीलर्ता यांना एकूण ३२ मुद्यांवर दिनांक १५.९.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना अपेक्षित असलेली माहिती मुद्येनिहाय उपलब्ध करुन देण्यात आली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असून नस्तीचे स्वरुपात नाही. तसेच प्रश्नोत्तराचे स्वरुपात असल्यामुळे व जनमाहिती अधिकारी यांचे मत येईल अशा स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. त्यामुळे त्यांना विहित मुदतीत संबंधित नस्तीचे अवलोकन करुन आवश्यक त्या कागदपत्र उपलब्ध करुन घ्यावी असे कळविले होते. परंतु त्यानंतरही ते चर्चेस आले नाही किंवा त्यांनी नस्तीचे अवलोकन केले नाही व त्यामुळे त्यांना पुन्हा दिनांक ३०.७.२००९ रोजी कळविण्यात आले होते. त्यानंतरही त्यांनी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचे आदेशाप्रमाणे त्यांना मुद्येनिहाय माहिती उपलब्ध झालेली आहे. वास्तविक प्रथम अपीलीय अधिकारी हे त्याच कार्यालयातील असल्यामुळे त्याच वेळेस संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित आहे.

परंतु प्रथम अपीलीय अधिकारी हे कोणत्याही प्रकारे कायद्याच्या तरततुदीचे पालन करीत नाही व प्रथम अपीलाची सुनावणी घेत नाही व मागितलेल्या माहितीचे अर्जाचे सुध्दा अवलोकन करीत नाही व चुकीचे आदेश पारित करतात व त्यामुळेच अपीलकर्ता यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागते. त्याच कार्यालयात माहिती उपलब्ध असल्यामुळे ८ दिवसांत माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारे निरर्थक आदेश काढून प्रथम अपीलीय अधिकारी काय साहस करतात हे समजणे कठीण आहे. माहिती उपलब्ध करुन द्यावयाची आहे ही बाब जनमाहिती अधिकारी यांना सुध्दा समजते. परंतु ते उपलब्ध करुन दत नाही म्हणून अपील करावी लागते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी हे नेहमीच आपली जबाबदारी टाळत आहेत असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी सुध्दा जी माहिती मागितलेली आहे त्या ३२ मुद्यांचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांनी निश्चित असे कागदपत्राचे किंवा माहितीचे वर्णन केले नाही. तसेच माहिती तयार करुन पाहिजे अशा प्रकारची मागणी त्यांनी केलेली आहे व जनमाहिती अधिकारी यांचे मत विचारलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कलम २(च) प्रमाणे "माहिती" या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याचे स्वरुपात उदा.:- कागदपत्रे, दस्तऐवज, परिपत्रक, टिपणी, अहवाल, निविदा, इत्यादी कागदपत्राचे स्वरुपात उपलब्ध असतील त्यांच्या छायांकित प्रती उपलबध करुन देणे अपेक्षित आहे. "माहितीचा अधिकार" या संज्ञेची सुध्दा व्याख्या कलम २(ञ) मध्ये केलेले आहे व त्यामध्ये सुरुवातीलाच एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे व त्यानंतर दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे अशी तरतुद केलेली आहे व त्यामुळे व्यापक व मोघम स्वरुपाची माहिती मागितलेली असेली तरी त्या संदर्भामध्ये अर्जाचे संदर्भात नस्तीची पाहणी करुन त्यातून छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित आहे. कागदपत्राचे निश्चित वर्णन केलेले नसल्यामुळे त्याप्रमाणे माहिती मिळू शकते. परंतु माहिती या संज्ञेमध्ये जनमाहिती अधिकारी यांचे अभिप्राय येतील अशा प्रकारची तरतुद नाही. जनमाहिती अधिकारी हे कागदपत्रांचे राखणदार आहेत. उपलब्ध असलेल्या कागदपत्राचे संदर्भात निर्णय प्रक्रियेत त्याचा संबंध असेलच असे नाही व त्यामुळे कोणत्याही प्रकरणात जनमाहिती अधिकारी यांचे अभिप्राय हे माहिती या व्याख्येप्रमाणे अपेक्षित नाही. नस्तीमध्ये अभिप्राय उपलब्ध असेल तर त्याच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेल्या ३२ मुद्यांमधील माहितीच्या संबंधात अभिप्रायात्मक जी माहिती असेल त्याबद्यल अभिप्रायाची माहिती देणे अपेक्षित नाही.

जनमाहिती अधिकारी यांना अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये स्पष्टीकरण करावे किंवा चर्चेस यावे असे कळविले असुन सुध्दा अपीलकर्ता यांनी त्यांच्याकडे स्पष्टपणे मुद्दे उपस्थित केलेले नाही. मात्र आयोगाकडे मुद्या क्रमांक ५ ते ३२ च्या संदर्भामध्ये स्पष्टीकरण दिलेले आहे. निश्चित माहिती मागितलेली नसल्यामुळे कागदपत्रे किती होतात व त्यांचा अतिरिक्त खर्च किती होता हे निश्चित नसल्यामुळे अपीलकर्ता यांना खर्चाचा भरणा किती करावा हे कळविले दिसून येत नाही व त्यामुळे माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे असे म्हणता येत नाही. मुद्या क्रमांक १ ते ३२ हे मुळात असंबंध आहेत. अधिनिमयाच्या तरतुदी हया स्वयंस्पष्ट आहे. ज्या माहितीच्या विषयाचे संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी नियुक्त केले असतील त्या जनमाहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक असते. परंतु अपीलकर्ता यांनी सामान्य प्रशासन विभागाकडे अर्ज केलेला आहे व सदरची माहिती ही कर निर्धारक या विभागातील दिसून येते. निश्चितच अधिनियमातील तरतुदी हया सार्वजनिक प्राधिकरणास लागू आहेत. परंतु तसे अपीलकर्ता व अर्जदारास सुध्दा लागू आहेत व त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीच्या संदर्भातील सर्व नस्त्यांची पाहणी करणे संयुक्ति राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १२.६.२००९ च्या अर्जामध्ये अपेक्षित असलेल्या विषयाचे संदर्भातील नस्त्यांची पाहणी कार्यालयीन कामकाजाचे वेळ व तारीख जनमाहिती अधिकारी यांना कळवून त्या दिवशी उपस्थित राहून जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून प्रत्यक्ष आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी कार्यालयीन कामकाजाची वेळ किंवा तारीख व वेळ कळवून अपीलकर्ता हे उपस्थित झाल्यास जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना संबंधित सर्व नस्ती निरिक्षणासाठी कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे उपस्थितीत उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

३) अपीलकर्ता यांनी आवश्यक असतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्याव्या.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- २९.१०.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८७३/२००९.

श्री. डॉ. मनिष आनंद,
द्वारा - प्रा. मनोहर कुंभारे, निवास क्र. बी-८/१,
शासकीय वसाहत, रविनगर, नागपूर - ४४० ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. टी. खरवडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
सालेकसा, जि. गोंदिया.

श्री. एच. जे. राहांगडाले,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
सालेकसा, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, सालेकसा, जि. गोंदिया यांचेकडे १९९९ ते ३१ डिसेंबर २००० या कालावधीतील दिनांक ३१ जुलै, २००० ला राजीनामा मंजूर झाला तेंव्हापासून आपल्या कार्यालयात प्रलंबित असलेले सेवापुस्तिका पाली ॲण्ड बुध्दिझम विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या कार्यालयास पाठविणे बाबत. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २८.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ६.६.२००९ रोजी देण्यात आला असून मुळ सेवापुस्तक कार्यालयात उपलब्ध नाही व सेवापुस्तक नव्याने तयार

... २

करणे या कार्यालयाचे अधिकार क्षेत्रात नाही. सेवापुस्तक तयार करण्यासाठी सक्षम अधिकाऱ्याकडे कागदोपत्री पाठपुरावा कराव व आदेश प्राप्त होताच दुय्यम सेवापुस्तकावरुन नव्याने सेवापुस्तक तयार करण्याची कार्यवाही करावी तसेच याबाबत संबंधित लिपिकांवर जबाबदारी निश्चित करावी. अपीलार्थी यांना तात्काळ सेवापुस्तक उपलब्ध करुन देण्याबाबत योग्य पाठपुरावा माहिती अधिकारी यांनी करावा. अशा प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दिनांक १९.६.२००९ रोजी तहसीलदार, सालेकसा यांनी जिल्हाधिकारी, गोंदिया यांना दुय्यम सेवा पुस्तीकेवरुन नवीन सेवापुस्तक करण्यास परवानगी मागितलेली दिसून येते. तसेच दिनांक १६.७.२००९ रोजी निवासी उपजिल्हाधिकारी, गोंदिया यांनी तहसीलदार यांना दुय्यम सेवा पुस्तिकेवरुन नविन सेवापुस्तक तयार करण्याची परवानगी देण्यात आलेली दिसून येते. त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००८ रोजी माहितीचा अर्ज दाखल करण्यापूर्वी अपीलकर्ता यांच्या संदर्भातील माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संबंधाने दिनांक २.९.२००८ रोजी निवासी उपजिल्हाधिकारी, गोंदिया यांनी तहसीलदार, सालेकसा यांना त्यांच्या दिनांक २२.७.२००८ च्या अर्जाप्रमाणे सेवापुस्तीका त्यांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावी किंवा या कार्यालयास सादर केली असल्यास (पाठविलेल्या पत्राच्या प्रतीसह) तसे या कार्यालयास कळवावे असे कळविलेले दिसून येते. त्यावर दिनांक ९.९.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी शासकीय सेवेतून राजीनामा दिला. त्यांचे सेवा पुस्तक मा.जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्याकडे पाठविल्याचे सवा पुस्तक नोंद वहीमध्ये नोंद घेण्यात आली आहे. तरीपण संबंधिताचे सेवा पुस्तकाबाबत शोध घेणे सुरु आहे. सेवा पुस्तक मिळताच आपणास सेवापुस्तक सादर करण्यात येईल असे तहसीलदार, सालेकसा यांनी जिल्हाधिकारी (आस्था-२), गोंदिया यांना कळविलेले दिसून येते. तसेच अपीलकर्ता यांचा दिनांक २८.७.२००० रोजी राजीनामा तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी मान्य केलेला असल्यामुळे दिनांक १६.७.२००९ रोजी निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी तहसीलदार, सालेकसा यांना डॉ. मनिष आनंद तत्कालीन अव्वल कारकून, तहसील कार्यालय, सालेकसा यांच्या दुय्यम सेवापुस्तकावरुन नवीन सेवा पुस्तक तयार करण्यास हरकत नाही. तथापी शासकीय सेवेतून राजीनामा दिलेल्या कर्मचाऱ्याला महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ चे नियम ४८ नुसार मुळसेवा पुस्तक देण्याची तरतुद नाही असे

... ३

कळविलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना जरी मुळ सेवापुस्तक मागितली तरी ती त्यांना पुरविणे नियामानुसार आवश्यक नसल्यामुळेच त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रमाणे सदरची मागणी केलेली दिसून येते. परंतु त्यातही सदरची सेवापुस्तक उपलब्ध होत नाही असाच पत्र व्यवहार दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांना दुय्यम सेवापुस्तकावरुन नवीन सेवापुस्तक तयार करुन देण्यात यावी याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे आदेशानुसार दुय्यम सेवापुस्तकावरुन नविन सेवापुस्तक तयार करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २९.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८७०/२००९ व अपील क्रमांक ८७१/२००९.**

श्री. राजकुमार देवीलाल ठाकरे,
मु. मंगेझरी, पो. सुकडी (डाक),
ता. तिरोडा, जि. गोंदिया.

श्री. मिताराम आत्माराम सराटे,
मु. मंगेझरी, पो. सुकडी (डाक),
ता. तिरोडा, जि. गोंदिया. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अनंत लक्ष्मणराव वालसकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी (राजस्व),
ता. जि. गोंदिया.

श्री. जी. आर. नागपुरे,
जनमाहिती अधिकारी तथा
वरिष्ठ लिपिक,
उपविभागीय अधिकारी (राजस्व),
ता. जि. गोंदिया. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.१०.२००९ रोजी घेण्यात आली. दोन्ही अपीलामध्ये उत्तरवादी एकच आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. वरील दोनही अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २५.६.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, गोंदिया यांचेकडे मौजा कोडबर्रा येथील गट नं. ९०, आराजी १.१० हे. आर. जमीन

... २

सरकार जमा झाली किंवा नाही माहिती पाहिजे. तसेच मौजा कोडबर्रा येथील व गट नं. १०५, आराजी ०.९१ हे. आर. सरकार जमा करण्याची कार्यवाही झाली माहिती पाहिजे. अशी माहिती मागितलेली दिसून येते. वरील दोनही अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २७.७.२००९ रोजी संपूर्ण प्रकरणाची छायांकित प्रत देण्यात आलेली आहे असे दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २५.७.२००९ रोजी प्रथम अपीले दाखल केलेली दिसून येतात. दोनही अपील प्रकरणात अपीलकर्ता हे हजर न झाल्यामुळे अपीले नस्तीबध्द करण्यात आले असे दिसून येते. परंतु त्यानंतर दोनही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी दोनही गट नं. च्या प्रकरणाची संपूर्ण छायांकित प्रत दिली आहे. परंतु त्यावरुन सदरची जमीन सरकार जमा झाले आहे किंवा नाही अशा प्रकारचा अर्थबोध होत नाही असे दोनही अपीलकर्ता यांनी सांगितले. त्यामुळे दोनही अपीलकर्ता यांनी सदरची जमीन सरकार जमा झाली किंवा नाही एवढेच उत्तर अपेक्षित आहे असे दिसून येते व त्यामुळे दोनही अपीले ही अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपील क्रमांक ८७०/२००९ व अपील क्रमांक ८७१/२००९ हे दोनही अपीले अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेली गट नं ९० व गट नं. १५८ ही जमीन सरकार जमा झाली किंवा नाही याबद्यलची माहिती त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिष्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २९.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८७६/२००९.

श्री. सुनिल वासुदेव भोयर,
द्वारा - एस. पी. जामदार,
प्लॉट नं. १०, श्री. गुरुदेवनगर,
नंदनवन, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. बी. पवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. एस. के. सेलगांवकर,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
जामदार शिक्षण संस्था,
रेशिमबाग, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.१०.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.५.२००९ रोजी सचिव, जामदार हायस्कूल एज्युकेशन सोसायटी, रेशिमबाग, नागपूर यांच्याकडे मी आपल्या संस्थेत कनिष्ठ व्याखाता या पदाकरिता केलेल्या मुळ अर्जाची प्रमाणित प्रत देण्यात यावी. मला दिलेली नियुक्ती आदेशाची पोचपावतीसह प्रमाणित प्रत देण्यात यावी. माझ्या मुळ सेवापुस्तकाची प्रमाणित प्रत देण्यात यावी. माहितीचा कालावधी दिनांक ६.८.२००४ ते आजपर्यंत सदरची माहिती अतिशिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत

... २

माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १५.६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना आता पर्यंत कोणत्याही प्रकारची मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांना दिनांक २४.६.२००९ रोजी एकूण ३ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही रेकॉर्डवर उपलब्ध नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देता येत नाही असे त्यात कळविलेले दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी शालेय न्यायाधिकरणामध्ये अर्ज दाखल केला होता व त्या अर्जाचा निर्णय त्यांचे बाजुने देण्यात आला होता. परंतु त्या निर्णया विरुध्द संस्थेने मा. उच्च न्यायालयामध्ये अपील दाखल केले होते व त्यात उच्च न्यायालयामध्ये शालेय न्यायाधिकरणाचा निर्णय हा रद्द करण्यात आलेला आहे. तरीसुध्दा अपीलकर्ता त्यांच्या नियुक्तीच्या संदर्भातील कागदपत्राची माहिती मागत असतात. परंतु सदरची कागदपत्रे ही कार्यालयातील अभिलेखामध्ये उपलब्ध नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देता आली नाही व ती गहाळ झाली असल्यामुळे पोलीस स्टेशन, कोतवाली, महाल यांचेकडे एफआयआर १६४१/२००९, दिनांक १५.५.२००९ रोजी दाखल करण्यात आली असून अपीलकर्ता व तत्कालीन मुख्याध्यापक यांचे विरुध्द ती दाखल करण्यात आलेली आहे. संस्थेचे सचिव, श्री. एस. के. शेलगांवकर आहेत व त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता व तत्कालीन मुख्याध्यापक यांनीच संगनमताने सदरची कागदपत्रे गहाळ केलेली दिसून येतात. म्हणून एफआयआर दाखल केलेला आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे की, श्री. एस. के. शेलगांवकर हे संस्थेचे सचिव नाहीत. परंतु मा.उच्च न्यायालया मध्ये जे रिट दाखल केले होते ते श्री. एस. के. शेलगांवकर यांनी दाखल केले होते व सचिव श्री. एस. के. शेलगांवकर आहेत असे दिसून येते व त्यामुळे अर्थातच त्या वादात जाण्याचे आयोगाचे कारण नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी फौजदारी तक्रार १६४१/२००९ ज्युडिशीयल मॅजीस्टेट प्रथम यांचे कोर्टातील निर्णयानंतरच योग्य ती माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) मात्र फौजदारी तक्रार क्रमांक १६४१/२००९ च्या निर्णयानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- २९.१०.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८६९/२००९.

श्री. जानराव हरबाजी होले,
द्वारा - श्री. रमेश जोशी,
आकांक्षा फ्लॅट नं. १३,
जुने आर. टी. ओ. ऑफीस मागे,
प्रतापनगर, वर्धा - ४४२ ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,
कृषी विभाग, पंचशील टॉकीज जवळ,
वर्धा रोड, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय कृषी अधिकारी,
ता. उमरेड, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्रीमती अर्चना कोचरे, तंत्र अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचेवतीने श्री. स. न. उके, कृषी अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.५.२००९ रोजी श्री. जानराव हरबाजी होले, कृषी सहाय्यक, उमरेड हयांच्या दिनांक २१.५.१९८१ पासून ते दिनांक १९.१०.२००४ पर्यंत (नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त) पर्यंत वेतन भत्ते, निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी, अंतीम रक्कम इत्यादी बाबतची माहिती व त्यावर खात्याने केलेल्या कार्यवाहीचे समर्पक सवर्धन इत्यादीची संपूर्ण माहिती मिळण्याबाबत. माहिती ही राज्य जनमाहिती

... २

अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, उमरेड यांना मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २३.६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २३.१०.२००८ रोजी देण्यात आला असून आपण अर्जामध्ये मागणी केलेल्या अभिलेखांची पडताळणी केली असता संबंधित अभिलेख हा जवळपास १८ वर्षापुर्वीचा असल्याने अभिलेख्यांचे वर्गीकरण अंतर्गत १० वर्षावरील किरकोळ अभिलेख, वैयक्तिक नस्ती इत्यादी निर्लेखन करण्यांत आलेले असल्यामुळे पत्र दिनांक १३.५.१९८१ पासून गैरहजर बाबतचा पत्र व्यवहार व पत्र दिनांक ८.८.१९८९ या कार्यालयाकडून उपलब्ध करुन देता येत नाही. त्याचप्रमाणे आपण कोणत्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहेत किंवा कसे ? सेवानिवृत्ती दिनांक, सेवा निवृत्ती प्रकरण मंजूर झाले किंवा कसे ? इत्यादी बाबत माहिती पुरवावी. वगैरे त्यांना माहिती मागितलेली दिसून येते. तत्पुर्वी सुध्दा दिनांक २६.६.२००९ रोजी अपीलकर्ता यांना तीच माहिती मागितलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारची माहिती न देता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. दिनांक २९.७.२००९ रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना ही संपूर्ण माहितीची विचारणा करण्यात आलेली दिसून येते. ती खालील प्रमाणे उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास या कार्यालयाचे अधिनस्त उपविभागीय कृषि अधिकारी, उमरेड कार्यालयाकडून माहिती न मिळू शकल्यामुळे आपण संदर्भ क्र. १ अन्वये या कार्यालयात अपीलीय अर्ज दाखल केला त्या अनुषंगाने सदर अपील अर्जावर सुनावणीकरिता संदर्भ क्र. २ अन्वये या कार्यालयात आपणास सर्व आवश्यक दस्तऐवजासह उपस्थित राहण्याबाबत कळविले. त्या सदराखाली आपण दिनांक २७.७.२००९ रोजी अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नागपूर यांचे उपस्थित अपीलीय अर्जावर सुनावणी झाली. त्या सुनावणीच्या वेळी अपीलीय/माहिती अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, उमरेड श्री. एस. बी. मंडपे हे उपस्थित नव्हते. त्यांचे प्रतिनिधी म्हणून कार्यालयीन अधिक्षक श्री. एस. एन. भोयर, उपविभागीय कृषि अधिकारी, उमरेड उपस्थित होते. सदर प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी आपणास संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते की, संबंधित प्रकरणाची आपलेकडे असलेली सर्व आवश्यक कागदपत्रे सोबत आणावी, जेणेकरुन आपले प्रकरण निकाली काढता येईल. खालील प्रकारची माहिती या कार्यालयास सादर करावी. १) सेवा निवृत्ती पुर्वी आपण कोणत्या कार्यालयात कार्यरत होते. २) आपले मुळ सेवापुस्तक कोणत्या कार्यालयात आहे/होते. ३) आपण शेवटचे वेतन किंवा इतर कोणतेही क्लेम कोणत्या कार्यालयामार्फत घेतले. ४) सेवा निवृत्तीनंतर आपणएवढा कालावधी कुठे

... ३

होते. ५) सेवा निवृत्तीपुर्वी रजेवर असल्यास आपण रजेचा अर्ज कोणत्या कार्यालयात पाठविला/सादर केला. वरील बाबीवर आपणाकडून माहिती विचारण्यात आली. त्या अनुषंगाने आपण कोणतेही ठोस माहिती पुरावा या कार्यालयास सादर केलेला नाही. त्यामुळे आपले प्रकरणे नेमके कोणत्या कार्यालयाशी संबंधित आहे यांचा बोध होत नाही. तरी आपणास परत सुचित करण्यात येते की, आपल्याकडे आपल्या संबंधि कोणताही दस्तऐवज उपलब्ध असल्यास (उदा. दुय्यम सेवापुस्तक, रजेचा अर्ज, रजा मंजूरी आदेश) तसे दिनांक १.७.१९९८ रोजी एक खिडकी योजनेअंतर्गत आपली बदली कोणत्या कार्यालयात झाली होती. याबाबतचे बदली आदेश या कार्यालयाला सादर करावे जेणे करुन आपले प्रकरण निकाली काढता येईल. यावरुन अपीलकर्ता यांना त्यांच्याकडे कोणत्या प्रकारचा पुरावा असेल तो कार्यालयाकडे सादर केल्यास कार्यालयास त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे सुलभ होईल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्याकडे त्यांच्या सेवेच्या संबंधातील जी कागदपत्रे असतील ती जनमाहिती अधिकारी यांचेकडे किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रकरणाचा शोध घेण्याचे दृष्टिने सादर करावी व त्यातून प्रकरणाचा शोध घेतल्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- २९.१०.२००९**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८८४/२००९.

श्री. राजेंद्र का. बरेठीया,
ह.मु. वार्ड नं. १, कोर्टाजवळ,
ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, भंडारा.

श्री. एस. पी. तुरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
आरोग्य विभाग,
जिल्हा परिषद, भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.५.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांच्याकडे कालबध्द पदोन्नती दिनांक १.१०.१९९४ पासून लागू करुन वेतनातील पुर्न निर्धारण करण्याविषयी दिनांक १०.१२.२००७ चे अर्ज व त्या प्रकरणात झालेल्या कार्यवाहीबाबत माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगास लेखी निवेदन दिलेले आहे. त्यात जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा. तसेच प्रशासकीय अधिकारी तथा माहिती अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, भंडारा हयांनी माझे प्रकरणात मला माझेकडे माहिती आदेशासह व्यक्तिशः प्राप्त झाली आहे. त्यामुळे माझे कोणतेही आक्षेप राहिलेले नाही. तरी कृपया सदर प्रकरणात माझे अपील अर्ज रद्य करण्यांत यावे अशी विनंती केलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ३०.१०.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८४६/२००९.

श्री. राजू किसन वानखेडे,
श्रीराम वार्ड, बल्लारपूर, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई -३२.

जनमाहिती अधिकारी तथा
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई -३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.५.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सहाव्या वेतन आयोगाबाबत आपल्या शालेय शिक्षण विभागाचे शासन परिपत्रकाबाबत एकूण ५ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१०.२००९ रोजी माहिती आयुक्त यांना विनंती पत्र दाखल केलेले आहे. त्यात माहिती अधिकारी यांनी दिनांक १६.१०.२००९ चे पत्रानुसार मागितलेली माहिती विनामुल्य उपलब्ध करुन दिली. माहिती मिळाल्याने व समाधान झाल्याने प्रकरण बंद करण्यात यावे अशी विनंती केलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ३१.१०.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८९७/२००९ व अपील क्रमांक ८९८/२००९.**

श्री. देवराव नत्थुजी चटप,
२०, ओंकार नगर,
पो. भगवाननगर, नागपूर - ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, रामटेक,
जि. नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, रामटेक,
जि. नागपूर.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, कुही,
जि. नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, कुही,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ३१.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी, रामटेक यांचे तर्फे श्री. एम. जी. पाटील हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी, कुही यांचेतर्फे श्री. रविशंकर पाठक हे हजर आहेत.

... २

२.     अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, रामटेक व कुही यांचेकडे एस.टी.सी. ट्रेन्ड शिक्षकांना थकबाकी आपल्या पंचायत समिती मधून देण्यात आली याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना रामटेक पंचायत समितीकडून दिनांक १०.१०.२००९ रोजी सविस्तर माहिती मिळाली. पाहिजे ती माहिती मिळाल्यामुळे अपील सुनावणी प्रकरण खारील करावी अशी विनंती करुन राज्य माहिती आयोगास दिनांक २०.१०.२००९ रोजी निवेदन दिलेले आहे. तसेच गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कुही यांचेकडे अपीलकर्ता यांना माहिती दिली असल्यामुळे मी अपील मागे घेत असल्याचे तोंडी सांगितले व त्यानुसार अपीलकर्ता यांनी रोजनामावर स्वाक्षरी केली असल्यामुळे सदरची दोनही अपीले ही खारीज करण्यात येत आहेत.

**नागपूर**

**दिनांक :- ३१.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २/२००८ व तक्रार क्रमांक १९२/२००७ व तक्रार क्रमांक ११०/२००८.**

श्री. भरत झिंगरजी राऊत,
मु. पो. पाहार्णी, ता. नागभिड,
जि. चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.

श्री. जी. एन. करनुके,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
नागभिड, जि. चंद्रपूर.

श्री. वैद्य,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका निरिक्षक,
भूमी अभिलेख, नागभिड,
जि. चंद्रपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. तसेच कलम १८(१) अन्वये दोन तक्रारी दाखल केलेल्या आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची व दोनही तक्रारींची सुनावणी आज दिनांक ३१.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.९.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, नागभिड यांचेकडे मौजा पाहार्णी प.ह.नं. ५ किरमीटी मेंढा, तालुका नागभिड येथील एकूण ४ मुद्यांवर माहिती

... ३

मागितलेली दिसून येते. तसेच दिनांक २१.११.२००७ व दिनांक ४.११.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी दोन तक्रार दाखल केलेल्या आहेत. सदर अपील व तक्रारीचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे निवेदन दिलेले आहे. त्यात अपील व तक्रारीबाबत जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, नागभिड व जनमाहिती अधिकारी तथा तालुका भुमी अभिलेख, नागभिड यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती व दुरुस्ती अभिलेखाची प्रत पुरविण्यात आली असून उर्वरित माहिती मला पुरवितो हयाबद्यल मौखीक बोलणी झाल्यामुळे माझे समाधान झाले असून सदर अपील व तक्रार बंद करण्यास विनंती केलेली असल्यामुळे सदरचे अपील व दोनही तक्रारी खारीज करण्यात येत आहेत.

**नागपूर**

**दिनांक :- ३१.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७५२/२००९**

**१) श्री कृष्णा हेमराज कनोजीया,**
**बुध्द नगर, आनंद बुध्द विहार जवळ,**
**पोस्ट आंबेडकर मार्ग, नागपूर-४४००१७.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, चंद्रपूर. ता.जि. चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**पंचायत समिती, चंद्रपूर. ता.जि.चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.५.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांचेकडे दिनांक २४.२.२००९ रोजी ग्राम विकास अधिकारी श्री दिलीप बापूराव बैलनवार, कनिष्ठ अभियंता बी.बी. येनोरकर, उघडे, सचिव यांचे विरुध्द केलेल्या तक्रारीच्या कार्यवाहीच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाशी संबंधीत नसल्यामुळे गट विकास अधिकारी, पंचायत समिती चंद्रपूर यांचेकडे दिनांक ५.६.२००९ रोजी पाठविण्यात आलयाचे दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १५.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता हजर न झाल्यामुळे कोण्यात्याही प्रकारचा निर्णय देण्यात आला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये तक्रार केलेली होती. परंतु त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मुळ तक्रार पोलीस स्टेशन, घुग्धुस, जिल्हा चंद्रपूर येथे दिनांक ६.२.२००९ रोजी नोंदविण्यात आली व दिनांक २४.२.२००९ रोजी पोलीस स्टेशन मध्ये केलेल्या तक्रारीची प्रतीलिपी ही जिल्हाधिकारी यांना दिलेली दिसून येते. प्रतीलीपी दिलेली असेली तरी अपीलकर्ता यांची अपेक्षा ही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कार्यवाही व्हावी अशी दिसून येते व प्रतिलीपी असल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही न होता सदरचा अर्ज दिनांक ५.६.२००८ रोजी गट विकास अधिकारी यांचेकडे ग्राम विकास अधिकारी व कनिष्ठ अभियंता यांचेविरुध्द तक्रार असल्यामुळे पाठविण्यात आलेला दिसून येतो. परंतु त्याबाबतची कोणतीही माहिती जन माहिती

(पान २ वर..)

अधिकारी यांचेकडून गट विकास अधिकारी यांना आहे असे दिसून येत नाही. कारण खंड विकास अधिकारी यांचेकडे अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारची तक्रार केलेली दिसून येत नाही. माहिती मात्र खंड विकास अधिकारी यांनी द्यावयाची आहे असे जिल्हाधिकारी कार्यालयातील कागदपत्रावरुन दिसून येते. व त्यामुळेच खंड विकास अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता हे प्रथम अपीलाच्या सुनावणीस त्यांचेकडे आले असते तर त्यांच्याकडून ही संपूर्ण माहिती घेवून माहिती उपलब्ध करुन देता आली असती. तरीही श्री बैलनवार, ग्राम विकास अधिकारी, श्री येनोरकर, कनिष्ठ अभियंता व श्री उघडे सचिव यांचे विरुध्द चौकशी झाली आहे व चौकशी अधिकारी आज हजर आहे. व सदरच्या माहितीचा अर्ज सुध्दा जन माहिती अधिकारी किंवा खंड विकास अधिकारी यांचेकडे न पाठविता तो चौकशी अधिकारी यांचेकडे पाठविण्यात आलेला दिसून येतो व त्यामुळे सदरच्या प्रकरणात माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. सदरच्या प्रकरणात अपीलकर्ता यांनी सुध्दा ज्या कार्यालयात तक्रार केलेली आहे त्या कार्यालयातच माहिती मागणे अपेक्षित असते. प्रतिलीपी पाठविल्यास त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही होत नाही. व त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयात प्रतिलीपी पाठविलेली असल्यामुळे त्याबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून झालेली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. असे असले तरी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी चौकशी अधिकारी यांना आयोगाचे पूढे हजर केलेले आहे. त्यात चौकशी अधिकारी यांनी असे सांगितले की, चौकशी अंतिम अप्प्यात आहे. मात्र पोलीसांकडे केलेल्या तक्रारीच्या संदर्भात खंड विकास अधिकारी स्तरावरील कार्यालयात काहीही माहिती नसल्यामुळे त्याबाबतची माहिती देता येत नाही. असे असल्यामुळे अपीलकर्ता यांना चौकशी अधिका-याकडील चौकशी कोणत्या टप्प्यावर आहे त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत सुरु असलेल्या चौकशीच्या संदर्भात माहिती विनामुल्य, टपालाने उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७४७/२००९**

**१) श्री निळकंठ तुकाराम नाकाडे,**
**दत्त मंदीर वार्ड, जाजु हॅास्पीटल जवळ,**
**वरोरा, पो.ता.वरोरा, जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, वरोरा, ता.वरोरा, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, नगर परिषद, वरोरा,**
**ता.वरोरा, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद वरोरा यांचेकडे सोबततच्या पत्रानुसार पुरविलेल्या माहितीच्या अंतर्गत श्री रुपेश डाखोरे व इतर यांचे विरुध्द कोणत्या नियमानुसार कार्यवाही करण्यांत आली किंवा केली नसल्यास त्याचे नेमके कारण काय. तसेच दिनांक १०.९.०९ चे तक्रार नुसार सार्वजनिक रस्ता खुला करण्याबाबत कोणती कार्यवाही केली याची माहिती पुरवावी. आपल्या दिनांक २०.९.०९ च्या नोटीसची झेरॅाक्स प्रत माहिती पुरविण्याकरीता सोबत जोडली आहे, असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २७.७.०९ रोजी अपीलकर्ता यांना, श्री डाखोरे यांना पत्र दिनांक २१.९.०८ नुसार नोटीस देण्यात आली होती. सदर नोटीस नुसार कार्यालयाने पाहाणी केली असता सार्वजनिक रस्त्यावर वाहने उभी ठेवण्यात येत नाही व सध्या वाहतुकीस अडथळा निर्माण होत नाही. रस्त्यावरुन जाणा-यांच्या अंगावर टाकीचे पाणी पडत नाही व नाली नगर परिषदे मार्फत नियमीत साफ होत असून तेथे कोणत्याही प्रकारची दुर्गंधी आढळून आलेली नाही. त्यामुळे विषयांकित नोटीस नंतर या विभागा मार्फत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक ६.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. तसेच अर्जाचे अनुषंगाने पुन्हा दिनांक १७.८.०९ रोजी वरीलप्रमाणेच उत्तर देण्यात आलेले दिसून येते. परंतु तत्पुर्वीच अपीलकर्ता यांनी दिनांक ६.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १४.८.२००९ रोजी देण्यात आला असून आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत वरील मुद्यांतील माहिती पुरविण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येते. व त्यामुळे दिनांक १७.८.०९ रोजी माहिती दिलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यापुर्वी मुख्याधिकारी यांनी दिनांक

( पान २ वर ..)

२७.७.०९ रोजी तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांना सार्वजनिक रस्त्यावर गैरअर्जदार श्री रुपेश डाखोरे यांनी अतिक्रमण केल्याची तक्रार या कार्यालयाला प्राप्त झालेली आहे. करीता गैरअर्जदार यांनी सार्वजनिक रस्त्यावर किती जागेवर अतिक्रमण केले याबाबत सदर रस्त्याची मोजणी करुन या कार्यालयास कळविण्यात यावे, असे पत्र दिलेले दिसून येते.

यावरुन अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. असे असले तरी श्री रुपेश डाखोरे यांनी घराचे नवीन बांधकाम करताना शासनाच्या निर्देशाप्रमाणे पाच फुट जागा खुली ठेवणे आवश्यक आहे. परंतु त्यांनी शासनाच्या निर्देशाची अवहेलना केली आहे. त्याचप्रमाणे मय्यत श्री महादेवराव डाखोरे यांनी त्यावेळच्या शासन नियमानुसार दीड फुट जागा सोडणे गरजेचे होते. परंतु त्यांनीही तसे केलेले नाही. रलट रस्त्यावर अतिक्रमण केलेले आहे. याबाबतची चौकशी करण्यात यावी या संबंधाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु तशा प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना, जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत अतिक्रमणाच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७४९/२००९**

**१) श्री राहूल दयाल वाघमारे,**
**अथर्व, ८४, विवेकानंद नगर,**
**वर्धा रोड, नागपूर-४४००१५.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक शिक्षण व अधिष्ठाता पशुविज्ञान,**
**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमिनरी हिल्स, नागपूर-६.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव,**
**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमिनरी हिल्स, नागपूर-६.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.५.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, पशुसंवर्धन आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचेकडे ज्ञानगंगा भारतीय एज्युकेशनल व कल्चरल सोसायटी द्वारा संचालित विजयसिंग राठोड पशुधन व्यवस्थापन व दुग्धोपादन पदविका विद्यालय, येरणगांव, त.हिंगणा, जि.नागपूर संबंधीची माहिती एकुण १० मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी १ जानेवारी २००२ पासून ३० एप्रिल २००९ असा दिलेला आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.५.०९ रोजी अपीलकर्ता यांना एकुण ११८ पृष्ठये पुरविण्याकरीता प्रती पृष्ठ रुपये २/- प्रमाणे रु. २३६+ ५० रु. पोस्टेज खर्च असे एकुण रुपये २८६/- चा भरना करावा असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी डी.डी.हा कार्यालयात पाठविण्यात आला होता. परंतु सदरची माहिती ही संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता, पशु विज्ञान शाखा, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ यांनी कुलसचिव तथा माहिती अधिकारी यांना सदरची माहिती त्रयस्थ पक्षाची माहिती संबंधात अपील केल्यामुळे या प्रकरणात निकाल लागत नाही तोपर्यंत संदर्भ क्रं. १ च्या पत्राला तात्पुरती स्थगिती देण्यात येत आहे, असा निर्णय दिलेला दिसून येते. व त्याप्रमाणे दिनांक ६.६.२००९ रोजी संचालक, शिक्षण तथा अधिष्ठाता यांनी अध्यक्ष, ज्ञानगंगा भारतीय एज्युकेशन ॲन्ड कल्चरल सोसायटी यांना तसेच अपीलकर्ता यांना सुनावणीची नोटीस काढण्यात आली होती. त्याअनुषंगाने दिनांक १८.६.२००९ रोजी त्रयस्थ पक्षाच्या माहितीच्या संदर्भात अपील केल्यामुळे या प्रकरणात निकाल लागेपर्यंत स्थगिती देण्यात आल्यामुळे डी.डी. परत करण्यात येत आहे. व त्यानंतर दिनांक ३०.६.२००९ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला आहे. त्यात गैरअर्जदाराला पुरविण्यात येणारी माहिती विस्तृत प्रमाणात आहे. याकामासाठी साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागते तरी अधिनियमाचे कलम ७(९) नुसार माहिती ही पुरविण्यात येवू नये असे आदेश दिलेले दिसून येतात. अपीलाच्या सुनावणीस

(पान २ वर..)

अपीलकर्ता गैरहजर होते. व अध्यक्ष, ज्ञानगंगा भारतीय एज्युकेशन ॲन्ड कल्चरल सोसायटी हे हजर व माहिती अधिकारी हे हजर होते असे दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांना राज्य माहिती आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.९.२००९ रोजी त्यांनी अर्जात दिलेल्या पत्यावर नोटीस काढण्यात आलेली होती. परंतु तरीही अपीलकर्ता सुनावणीस गैरहजर आहे. व त्यांनी कोणत्याही प्रकारचा अर्ज सुध्दा दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर असताना त्रयस्थ पक्षातर्फे, अर्जदार राहूल वाघमारे हे हे अर्थव-८४, विवेकानंद नगर, वर्धा रोड, नागपूर येथील रहिवाशी नसून या बंगल्याचे मालक डॉ. दत्ता राठोड हे आहेत. अर्जदाराने आपली खरी ओळख व खरा पत्ता दिलेला नाही. त्यांनी प्लॅाट नं. १४६ यादवनगर, पो. उप्पलवाडी, नागपूर-२६ असाही पत्ता आपल्या विद्यापीठाच्या विविध विभागात दिलेला आहे. खरा पत्ता ते कां देत नाही ही मोठी संशयास्पद बाब आहे. अर्जदाराने अर्जात नमूद केलेली इतकी विस्तृत माहिती अनाधिकृतपणे व गैरमार्गाने मिळविलेली दिसते. संस्थेशी त्यांचा कोणताही संबंध नसून मुद्दाम त्रास देण्यासाठी व ब्लॅाकमेल करण्यासाठी सदर माहितीचा गैरवापर होण्याची शक्यता आहे, अशा प्रकारची हरकत घेतली असल्याचे आयोगाचे निदर्शनास आणले. आज अपीलकर्ता हजर असते तर याबाबत त्यांना विचारता आले असते परंतु ते हजर नाही अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर न राहाता नंतर त्रयस्थ पक्षास कोणत्या नियमाप्रमाणे अपील करता येते असे विचारलेले आहे. अधिनियमाचे कलम १९(२) प्रमाणे त्रयस्थ पक्ष यांना अपील दाखल करता येते. तसेच कलम ११ चे पोटकलम ४ प्रमाणे सुध्दा, अधिनियमाचे कलम १९ अंतर्गत त्रयस्थ पक्ष अपील दाखल करण्याची तरतुद आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेले कागदपत्रावरुन व आयोगाचे निदर्शनास आणलेली माहिती खरी आहे, अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७५०/२००९**
**अपील क्रमांक ७५१/२००९**

**१) श्री गुलास वारिस,**
**स्टार्की टाऊन, बंगला क्रं.८/२, क्वार्टर नं.२,**
**मंगळवारी बाजार, सदर नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक,**
**आरोग्य सेवा(परिवहन), ८ केनडी रोड, नायडु हॉस्पीटल कंपाऊंड,**
**पुणे-४११००१.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सेवा व्यवस्थापक,**
**विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा(परिवहन)नागपूर,**
**माता कचेरी कंपाऊंड, दिक्षा भूमी समोर, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.९.२००९ व ३.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. **अपील क्रं. ७५०/२००९** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २५.४.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन) यांचेकडे अर्जदार यांनी दि. २१.३.२००९ ला फॅक्सद्वारे मागितलेली माहिती (२) नागपूर स्थळी कार्यालयात विजतंत्री यांची ३ पदे मंजूर असता आकृतीबंधात सध्या ३ पदे ठरविली तर यातसाठी बदली कोणत्या आधारे केली याची लेखी पुराव्यासह खुलासा. (३) माझे नागपूर कार्यालयातील दि. ४.१२.२००० च्या अर्जावर कोणती कार्यवाही केली याची माहिती द्यावी. अशी माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.६.२००९ रोजी माहिती उपलब्ध झालेली दिसून येते परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २६.६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ७.७.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असून ती स्वयंस्पष्ट दिसून येते. तसेच मुद्या क्रं. ३ च्या संदर्भात दिनांक ४.१२.२००० चे पत्र नागपूर कार्यालयात असल्यामुळे उपसंचालक तथा माहिती अधिकारी, पूणे यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे माहिती दिली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. प्रथम अपीलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, सहाय्यक संचालक, सहाय्यक माहिती अधिकारी यांचेशी सविस्तर चर्चा होऊन आपण अपील मागे घेतल्याबाबत लेखी जबाब दिलेला आहे. सबब अपील निकाली

( पान २ वर ..)

काढण्यात येत आहे, असा निर्णय दिलेला आहे. अपीलकर्ता यांचे जोडपत्र ब, वर माझे समाधान झाले आहे, असे दिनांक २३.७.२००९ रोजी अपीलकर्ता यांनी त्यांचे हस्ताक्षरात लिहून दिलेले दिसून येते. व असे असल्यामुळे सदरचे व्दितीय अपील करण्याचे कारण नव्हेते. व त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

४. **अपील क्रमांक ७५१/२००९** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ८.४.२००९ रोजी सेवा व्यवस्थापक तथा माहिती अधिकारी नागपूर यांचेकडे श्री राठोड, टी.ए.बील हाजरी पटाची वैद्यकिय बिल, डिजल बिलाची छायाप्रत तसेच खिलारे यांचे टि.ए.बील छायाप्रत. कालावधी दिनांक १३.६.०७ ते २७.२.०९ पर्यंत, असा दिलेला आहे. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १५.५.०९ रोजी ५६५ पृष्ठांकरीता ११३०/- रुपये रोख रकमेच्या स्वरुपात मनीऑर्डर/डी.डी. स्वरुपात जमा करण्यात यावे असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २९.५.०९ रोजी अतिरिक्त खर्चाचा भरणा करण्याकरीता गेलो असता सेवा व्यवस्थापक हजर नाही या कारणास्तव भरना करता आला नाही, असा आक्षेप घेणारे पत्र दिलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यापुर्वी दिनांक १६.५.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २३.७.०९ रोजी देण्यात आला असून सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा नागपूर यांनी अर्जदारास त्वरीत माहिती द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी वेळोवेळी नागपूर कार्यालयात संपर्क साधून सुध्दा त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही व ही बाब प्रथम अपीलाच्या निर्णयात स्पष्ट झालेली आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर अपीलकर्ता यांना पुणे येथे माहिती मिळाली. परंतु त्या मिळालेल्या माहितीमुळे समाधान झाले, असे त्यांनी लेखी दिले असले तरीही त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे. व व्दितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, दिनांक १३.६.०७ ते २७.२.०९ पर्यंतची माहिती मागितली होती. परंतु त्यांना दिनांक ७/२००७ पर्यंतची माहिती मिळाली आहे. याचा अर्थ त्यांना १३.६.२००७ पासून ६/२००७ पर्यंतची माहिती मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यातही त्यांच्या वैद्यकिय बिलाचे संदर्भात निर्णय झालेला नाही असे त्यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांना जून २००७ मधील माहिती दिली नाही हे जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा मान्य केले. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी नागपूर कार्यालयात माहिती मागितली असतांना सुध्दा त्यांना पुणे येथे अपीलाच्या सुनावणीस उपस्थित राहावे लागते व त्यामुळे त्यांचा जाण्या-येण्याचा खर्च झालेला आहे. तसेच त्यांनी अर्ज दिनांक ८.४.०९ रोजी केला असून सुध्दा त्यांना ३० दिवसांचे आंत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केलेला नाही व दिनांक १५.५.२००९ नंतर पैसे भरण्याबाबत पत्र दिलेले आहे. त्यामुळे त्यांना विना मुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी असे त्यांचे म्हणण् आहे. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ७५०/२००९ हे खारीज करण्यात येत आहे.

१) अपीलकर्ता यांचे अपील ७५१/२००९ अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना, जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जून, २००७ च्या हजेरी पटाची माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

( पान ३ वर ..)

तसेच अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता त्यांनी भरलेले रुपये ११३०/- परत करण्यात यावे. तसेच माहिती नागपूर येथे उपलब्ध असताना सुध्दा ती पुणे येथून उपलब्ध करुन घ्यावी लागल्यामुळे अपीलकर्ता यांना पुणे येथे जाण्यायेण्याचा खर्च देण्यात यावा.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७४८/२००९**

**१) श्री भगवान रेवानाथ सहारे,**
**मु.पो. नवेगांव खैरी, ता.पारशिवनी, जि. नागपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**रामटेक, ता. रामटेक, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**मौदा, ता. मौदा, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.८.२००९रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.४.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालयाकडे त्यांचे वडीलोपार्जित शेत जमीन मिळण्याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ७.८.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय ह दिनांक २०.८.२००९ रोजी देण्यात आला असून माहितीच्या अधिकारा अंतर्गत उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या प्रती देता येते. परंतु अपीलकर्ता यांनी जमीन नांवे करण्याची मागणी केली, त्यामुळे त्यांची मागणी पुर्ण करता येत नाही. त्यामुळे अपील खारीज केलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. विजय किनगे हे हजर झाले व त्यांनी युक्तीवाद करताना अपीलकर्ता यांना माहिती मिळाली नाही असे आयोगास सांगीतले. अपीलकर्ता यांनी केलेल्या अर्जाचे अवलोकन केले असता व प्रथम अपीलाच्या निर्णयाचे अवलोकन केले असता निर्णय योग्य आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी जी कागदपत्रे दाखल केलेली आहे त्यासंदर्भात युक्तीवाद करताना अपीलकर्ता यांच्या वकीलानी असे सांगितले की, श्री रेवनाथ सहारे व स्व. गयाबाई रेवनाथ सहारे या भाऊबहिर्णीची एकत्र जमीन होती. दोघेही मृत्यू पावलेले आहे. व गयाबाई यांना कोणत्याही प्रकारचा वारस नाही, या कारणास्तव ही जमीन रेवनाथ सहारे यांच्या मुलाच्या नांवे करण्यात आली आहे. यामुळे गयाबाई यांचा मुलगा म्हणजेच अपीलकर्ता यांनी माहिती मागितली आहे. परंतु त्याकरीता अपीलकर्ता यांनी महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ च्या अंतर्गत उपविभागीय अधिकारी यांचेकडे आर.टी.एस. अपील दाखल करणे आवश्यक आहे. त्याअपीलाच्या चौकशीमध्ये सर्वच संबंधीतांना नोटीस काढून व तलाठी यांचेकडून संपूर्ण

(पान २ वर .. )

कागदपत्रे मागवून चौकशी करण्यात येते व त्यामुळे उपविभागीय अधिकारी यांचेकडे आर.टी.एस.अपील दाखल करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार** क्रमांक १७०/२००९
**तक्रार** क्रमांक १७१/२००९

**१) श्री मुजाहिदुल हक अंसारी व मो.हनीफ अंसारी,**
**ईस्माईलपुरा, ता.कामठी, जिल्हा नागपूर.** **तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता,**
**नगर परिषद (बांधकाम विभाग),ता.कामठी, जि.नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद,ता.कामठी, जि.नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारदार यांनी दिनांक २०.६.२००९ व दिनांक ३.६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये दोन तक्रारी दाखल केलेल्या आहेत. सदरच्या दोनही तक्रारीची सुनावणी आज दिनांक ५.१०.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी कनिष्ठ अभियंता, नगर परिषद हजर आहेत.

२. तक्रारदार यांची अपील क्रमांक ७८८/०८ व अपील क्रमांक ३७४/०८ मध्ये अनुक्रमे दिनांक २६.५.२००९ व दिनांक ८.४.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक ३.६.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, त्याबध्दलचे कोणत्याही प्रकारचे अंदाजपत्रक किंवा नकाशे त्यांना उपलब्ध करुन दिलेले नाहीत. जो नकाशा उपलब्ध करुन दिलेला आहे तो त्याबध्दलचा नाही. जन माहिती अधिकारी यांनी स्पष्टपणे सदरच्या माहितीच्या संदर्भात "यह नाली नगर परिषद की मजदूर द्वारा पुराने लोखंडी पाईप डालकर बनाई गई है," अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे व त्यावरुन त्याबाबत कोणत्याही प्रकारचे

( पान २ वर ..)

अंदाजपत्रक किंवा नकाशे किंवा ठराव उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. परंतु अपीलकर्ता यांना जशी आहे तशी माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरच्या दोनही तक्रारी हया खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांच्या तक्रार क्रमांक १७०/२००९ व तक्रार क्रमांक १७१/२००९ हया दोनही तक्रारी खारीज करण्यात येत आहे.

२) तक्रारकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७५९/२००९**

**१) श्री अश्वजीत अशोक गायकवाड,**
**ह.मु.पो.शेगांव(बुज.) ता.वरोरा, जि. चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी ,**
**विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.३,**
**सिव्हील लाईन, सदर नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी ,**
**विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.३,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.३, नागपूर यांचेकडे अर्ज पाठविला परंतु कोणत्याही प्रकारची पडताळणी झाली नाही, याबध्दलची माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १४.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १३.७.२००९ ला माहिती दिली. त्यांचा जात वैधतेबाबतचा अर्ज शैक्षणिक सेवा विषयक किंवा निवडणुकीविषयक आहे याबाबतचा खुलासा होत नाही. अर्जदाराने अर्ज शासन निर्णयानुसार सादर केलेला नाही व त्यामुळे त्यांचा मुळ अर्ज या कार्यालयाचे पत्र क्रमांक ६६९४/०९, दिनांक १०.८.२००९ अन्वये परत पाठविण्यात आला. परंतु अर्जदाराने स्विकारला नाही. प्रथम अपीलाच्या संदर्भात अपीलकर्ता हजर नसल्यामुळे अपील खारीज करण्यात आले व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांचा मुलगा तलाठी परीक्षेला बसला होता. परंतु उत्तर आतापर्यंत उपलब्ध झाले नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, शासन निर्णयाप्रमाणे संबंधीत कार्यालयाकडून जात पडताळणीकरीता अर्ज सादर करणे आवश्यक असते. वैयक्तिकरित्या कोणत्याही प्रकारचा अर्ज पडताळणीकरीता समीतीकडे सादर करता येत नाही. तसेच अपीलकर्ता यांना वेळोवेळी कळविलेले आहे व त्यांचा अर्ज सुध्दा परत

( पान २ वर ..)

करण्यात आला आहे. परंतु तरीही अपीलकर्ता यांची अपेखा आहे की, त्यांना माहिती उपलब्ध व्हावी. जन माहिती अधिकारी यांनी शासन निर्णयाचा उल्लेख केलेला आहे व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७५४/२००९**

**१) श्री लक्ष्मय्या राजम नागुला,**
**वनपरिक्षेत्र कार्यालय, नागभिड, मु.पो.ता.नागभिड,**
**जि. चंद्रपूर-४४१२०५** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त(महसुल)**
**आयुक्त कार्यालय, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा चिटणीस (महसुल शाखा)**
**आयुक्त कार्यालय, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.४.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचकडे जात प्रडताळणी प्रमाणपत्राची सत्यप्रत मिळणेबाबत. (१) श्री व्ही.के.मादरबोईना, तत्कालीन तहसिलदार सिरोंचा, श्री के.एस. बद्येला, खंड विकास अधिकारी, सिरोंचा व श्री एल.के.मादरबोईना, सहाय्यक जिल्हा मलेरिया अधिकारी गडचिरोली यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र. (२) जर जात पडताळणी प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर ज्या शासन निर्णयाप्रमाणे त्यांना एन.टी.(बी) प्रवर्गातून पदोन्नती देण्यात आली त्याची सत्यप्रत. (३) जात पडताळणी प्रमाणपत्र उपलब्ध नसताना जातीच्या दाखल्यावरुन पदोन्नती दिल्यास त्याची सत्यप्रत. (४) सदर पदोन्नतीचे मापदंड इतरांना लागू आहेत किंवा कसे याबाबत आवश्यक माहिती मिळण्याबाबत. अशा प्रकारची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती टपालाने घेणार असे नमुद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे दिनांक ४.२.२००९ रोजी जातीचे वैद्यता प्रमापणपत्र आपण अद्यापही सादर केले नाही. सबब, तातडीने वैद्यता प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करावे, असे नागपूर विभाग यांचेकडून चौघांनाही पत्र दिलेले दिसून येते. व त्यानंतर दिनांक २.५.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहितीच्या खर्चाकरीता रुपये ८/- चा भरणा करावे व श्री के.एस. बद्येला यांच्या बाबतची माहिती जिल्हा परिषद गडचिरोली यांचेकडे असून त्याबाबतची माहिती विकास शाखा, नागपूर यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी. तसेच श्री एल.के. मादरबोईना हे या विभागातील अधिकारी नाही. सबबत संबंधीत विभागाकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २८.५.२००९ रोजी प्रथम

( पान २ वर ..)

अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक १४.७.२००९ रोजी मुद्दा क्रं. १,३,४ च्या अनुषंगाने माहिती देण्याबाबत कार्यवाही करावी. १५ दिवसांचे आंत माहिती अपीलकर्ता यांना देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांच्या प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे त्याप्रमाणे १० दिवसांचे आंत उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील. अन्यथा जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील, याची नोंद घ्यावी. आज जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर असून त्यांनी जरी कागदपत्रे दाखल केलेली असली तरी त्यावरुन कोणत्याही प्रकारची उर्वरित माहिती उपलब्ध करुन दिलेले आहे असे दिसून येत नाही. त्यामुळे उर्वरित माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे हा निर्णय मिळालयापासून १० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी अन्यथा जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील, याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७६८/२००९**

**१) सौ. प्रमिला राजेश मेश्राम,**
**रा.द्वारा श्री दामोधर खोब्रागडे, प्लॅाट नं.५६,**
**उंटखाना, नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,**
**परिमंडळ क्रं.४, अजनी विभाग, नागपूर शहर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**अजनी विभाग, नागपूर शहर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.४.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,अजनी यांचेकडे (१) दि.७.६.०७ ते दि. २६.६.०७ पर्यंत इमामवाडा पो.स्टे.येथे कार्यरत असणा-या संपूर्ण स्टॅाफचे संपूर्ण नांव, पद त्यांचे सहीच्या नमुन्यांची सत्यप्रत कृपया देण्यात यावी. ( इमामवाडा पो.स्टे.बाबत.) (२) दि. १४.१२.०७ ते २६.६.०८ पर्यंत कार्यरत असणारे व.पो.निरीक्षक, पो.निरीक्षक, ए.एस.आय., पी.एस.आय. यांचे संपूर्ण नांव, पद व सहयांचे नमुने याची सत्यप्रत कृपया देण्यात यावी. ( इमामवाडा पो.स्टे.बाबत.). अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २७.४.२००९ रोजी, आपण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये मुद्या क्रं.१ मधील दि. ७.६.७ ते दि. २६.६.७ पर्यंत पो.स्टे. इमामवाडा येथील कर्मचा-यांचे सहयांचे नमुनेची माहिती मागितलेली आहे. परंतु सदर माहिती ही माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ११ त्रयस्थ पक्षीय माहिती मध्ये मोडत आहे. तसेच कलम २ मधील (च) अंतर्गत माहिती या शब्दाच्या व्याख्यात मोडत नसल्याने माहिती आपणास देण्यात येत नाही. मुद्या क्रं. १ व २ ची माहिती सोबत जोडली आहे. असे कळविलेले दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ६.५.०९ रोजी देण्यात आला असून मागणी केलेली माहिती पुरविण्यात येत असून मुद्या क्रं. १ व २ अन्वये मागितलेली माहिती कलम ११ (च) अन्वये फेटाळण्यात येत आहे, असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, इमामवाडा

**( पान २ वर ..)**

येथे पोलीस स्टेशन मध्ये कार्यरत असलेले अधिकारी/कर्मचारी यांची माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु त्या ठिकाणी एक पोलीस निरीक्षक आहे ही बाब अपीलकर्ता यांना मान्य नाही. अनेक पोलीस निरीक्षक असतील ही बाब लपविण्यात आली आहे. तसेच अपीलकर्ता यांनी सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या सहयांचे नमुने मागितले होते. परंतु जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांचा याबाबतचा निर्णय योग्य आहे. अपीलकर्ता यांचेकडे, एक पोलीस निरीक्षक ऐवजी दोन किंवा तीन पोलीस उपनिरीक्षक असतात याबाबतचा कोणत्याही प्रकारचा पुरावा उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, पोलीस स्टेशनच्या दर्जावरुन अधिकारी/कर्मचारी वर्ग ठरविण्यात आलेला असतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७६६/२००९**
**अपील क्रमांक ७६७/२००९**

**१) श्री मनाहर धकाते, सचिव**
**आदिवासी हलबा समाज समिती, अंचलेश्वर वार्ड,**
**चंद्रपूर-४४२४०२. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक,**
**अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, गडचिरोली,**
**ता.जिल्हा गडचिरोली. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, गडचिरोली, उत्तरवादी**
**ता.जिल्हा गडचिरोली.**

**(आदेश पारित दिनांक ५.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.८.२००९ व दिनांक २०.८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ५.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक ७६६/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती यांचेकडे, श्री पांडुरंग दौलत मडावी, रा.कळमगांव यांना तपासणी समितीने दिनांक ७.८.२००७ ला वैधता प्रमाणपत्र दिलेले आहे. प्रमाणपत्र क्रं.०८/६३८. सदरहु प्रमाणपत्र ज्या दस्तऐवज/प्रमाणपत्राच्या आधारावर देण्यात आलेली आहे त्या सर्व दस्ताऐवज/प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रती देण्यात यावे. त्याचप्रमाणे दक्षता पथकाचा अहवाल व तपासणी समितीने पारित केलेले आदेश यांच्या सुध्दा प्रमाणित प्रती पुरविण्यात याव्या, अशी माहिती टपालाद्वारे मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १५.५.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३०.६.२००९ रोजी दिलेला असून दिनांक १५.६.२००९ अन्वये जन माहिती अधिकारी यांनी कळविलेला निर्णय योग्य असून कलम ११(१) अन्वये संबंधीतांनी त्यांनी माहिती देण्यास नकार दिल्यामुळे आपणास माहिती देण्याचे नकारण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २३.३.२००९ रोजी सहाय्यक माहिती अधिकारी यांनी श्री पांडुरंग दौलत मडावी यांना त्यांच्या संदर्भात समितीकडे सादर केलेला दस्तऐवज इ. कागदपत्राची मागणी केलेली आहे. श्री मनोहर धकाते यांच्या दिनांक २०.१.२००९

( पान २ वर ..)

च्या अर्जाची प्रत यासोबत जोडून आपणास पाठविण्यात येत आहे. सदरहु माहिती आपली वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे अधिनियमाचे कलम ११(१) अन्वये सदर माहिती संबंधीतास द्यावी किंवा कसे याबध्दल उलट टपाली कळविण्यात यावे. त्यानंतर पुन्हा दिनांक १९.५.२००९ रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. त्यावर श्री पांडुरंग दौलत मडावी यांनी श्री मनोहर धकाते यांची खालील वैयक्तिक कागदपत्रे मला सूपूर्द करीत असल्यास माझे दस्ताऐवज, कागदपत्राची माहिती संबंधीतांना देण्यांस माझी हरकत नाही. व श्री मनोहर धकाते यांची खालील कागदपत्रे देण्यास नकार असतील तर माझी कोणतीही व्यक्त्ीगत माहिती संबंधीतस देवू नये.
कागदपत्रे- (१) श्री मनोहर धकाते यांचे जातीचे प्रमाणपत्र (साक्षांकित प्रत) व वैधता प्रमाणपत्र. (२) त्याचे शाळा सोडल्याचे क्रमांक (साक्षांकित प्रत) (३) शेती असल्यास पी-१ व सातबारा (साक्षांकित प्रत) (४) वडीलाचे (मनोहर धकाते यांच्या) शाळा सोडल्याचे प्रमाणप९ा व जातीचे प्रमाणपत्र/सरपंच पुरावा. (५) ५० वर्षापूर्वीचा जातीचा पुरावा. (६) श्री मनोहर धकाते यांचे मुले असल्यास, मुलांचे तसेच नातेवाईक असे पाच जातीचे प्रमाणपत्र. वरील कागदपत्रे तुमच्या मार्फत मला पुरविल्यास माझे दस्तऐवज देण्यांत यावे अन्यथा माझे दस्तऐवज (रेकार्डची माहिती) संबंधीतास देवू नये ही विनंती. व त्याप्रमाणे दिनांक १५.६.२००९ रोजी अपीलकर्तायांना कळविण्यात आलेले दिसून येते.

अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी मागितलेली माहिती ही सार्वजनिक अभिलेखे असल्यामुळे ती त्रयस्थ पक्षाची माहिती होत नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अर्जदार ज्या वेळेस जात पडताळणीकरीता कागदपत्रे दाखल करतो ती सर्व कागदपत्रे त्याची वैयक्तिक कागदपत्रे असतात व ती त्यांनी विश्वासाने दाखल केलेली असते. त्यामुळे त्यांची वैयक्तिक कागदपत्रे ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्याकरीता कलम ११(१) प्रमाणे त्यांना विचारण्याची प्रक्रिया करणे आवश्यक असते. अपीलकर्ता यांना निर्णय जर मान्य नव्हता तर त्यांनी कलम ११(१) च्या प्रक्रियेविरुध्द अपील दाखल करणे आवश्यक होते. परंतु तसे न करता त्यांनी संपूर्ण प्रक्रियेच्या विरुध्द अपील दाखल केलेले आहे. कलम ११(१) च्या प्रक्रियेच्या संदर्भात अपील दाखल करताना ज्यांची माहिती मागीतलेली आहे त्यांना पक्षकार करणे आवश्यक असते व तसे ते अर्जदार यांनी केलेले नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी कलम ११(१) व कलम १९(२) व कलम १९(४) प्रमाणे कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. व त्यामुळे श्री मडाची यांचे म्हणणे आयोगापुढे प्रत्यक्षात येवू शकत नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

४. **अपील क्रमांक ७६७/२००९** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२००९ रोजी सह आयुक्त तथा उपाध्यक्ष अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती यांचे दिनांक २६.२.२००९ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई नागपूर खंडपीठ, नागपूर येथील रिट याचिका क्रमांक ९०३/२००७ व याचिका क्रमांक ९०४/०७ मध्ये दिनांक २४.३.२००७ रोजी दिलेल्या निर्णया मधील परिच्छेद क्रमांक ८ ते ११ कडे लक्ष वेधण्याचे सूचविलेले आहे. सदर्हु निर्णयाची प्रत उपलब्ध नसल्यामुळे कृपया दिनांक २४.३.२००७ च्या निर्णयाची प्रत त्वरीत पुरविण्यात यावी. अशी माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १५.५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल

( पान ३ वर ..)

केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे दिनांक ३०.६.२००९ रोजी मा. उच्च न्यायालय, मुंबई नागपूर खंडपीठ, नागपूर येथील रिट याचिका क्रमांक ९०३/२००७ मध्ये दिनांक २४.३.२००७ रोजी दिलेल्या निर्णयाची प्रत मा.उच्च न्यायालयाचे वेब साईटवरुन प्राप्त करुन घ्यावी. किंवा मा. उच्च न्यायालयातील संबंधीत सेक्शनचे रजिस्ट्रार यांचेकडे अर्ज दाखल करुन प्रत प्राप्त करुन घ्यावी. वरील माहितीचा स्त्रोत हे कार्यालया नसल्यामुळे व माहितीचा मुळ स्त्रोत असलेल्या कार्यालयाकडे अर्ज सादर करावा व त्यामुळे अर्ज त्वरीत निकाली काढण्यात आला आहे. सदरच्या उत्तराने समाधान न झ ााल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेली आहे.

५. जन माहिती अधिकारी यांना माहिती विहित मुदतीत कां उपलब्ध करुन दिलेली नाही असे दोनही अपीलांमध्ये विचारले असता त्यांनी असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली तरीही प्रथम अपील व द्वितीय अपील ते दाखल करीत असतात व त्यामुळे कार्यालयाचे कामकाज हे कोणत्याही हिताशिवाय खोळंबत असते. अपीलकर्ता यांनी आतापर्यंत शेकडो अर्ज व अपीले दाखल केलेली आहेत. व ते अशा प्रकारे त्रयस्थ पक्षाची माहिती त्यांच्या स्वत:ची व मुलाची जात पडताळणीच्या संदर्भात दबाव आणण्याच्या दृष्टीने करीत आहे, असा आयोगाने मागिल अपीलांमध्ये निर्णय दिलेला आहे. तरीही अपीलकर्ता हे कोणत्याही सार्वजनिक हिताशिवाय माहिती मागणी सुरुच ठेवत आहे. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ७६६/२००९ व अपील क्रमांक ७६७/२००९ हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७६४/२००९**

**१) श्री प्रमोद छोटमलजी चोरडीया,**
**मु.पो.बेला, ता.उमरेड, जिल्हा नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका निरीक्षक,**
**भूमी अभिलेख, उमरेड, ता.उमरेड, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी ,**
**तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, उमरेड, ता.उमरेड, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे बेला येथील गणपतीच्या देवळाला लागून असलेली सिट क्रं.९ भू.क्रं.नं.१४४६ ही जागा वडीलोपार्जीची असल्यामुळे कुटूंबातील कोणत्याच लोकाला विकण्याचा अधिकार नव्हाता. त्याप्रमाणे एक अर्ज तालुका निरीक्षक उमरेड यांना फेर फार न करण्याचा अर्ज दिलेला होता. कोणत्या प्रकारचा नोटीसन काढता नियमबाहय श्री एम.एन. श्रीखंडे यांनी फेर फार केला अशी माहिती, माहिती अधिकारात अपील २२.१०.२००८ ला केल्यानंतर त्यांचे स्पष्टीकरण दिनांक १९.११.२००८ ला श्रीखंडे यांच्यावर रितसर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले अशी माहिती मिळाली व त्यांच्यावर कोणती कारवाई झाली त्याची सत्यप्रतची
झेरॉक्स प्रत देण्यात यावी. तीन महिन्याचे कालावधी होऊन सुध्दा त्यांची कारवाईची छायाप्रत आपणास पुरविण्यात येईल असे लेटर सुध्दा दिनांक २१.११.२००८ ला आले होते. परंतु अद्याप पर्यंत त्याची छायाप्रत आलेली नाही. करीता श्रीखंडे यांच्यावर कोणती कारवाई केली याची सत्यप्रत तातडीने देण्यात यावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २५.५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपील सोबत तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांनी दिनांक १९.११.२००८ रोजी अपीलकर्ता अर्जदार यांना जावक क्रमांक १८४६, दिनांक २०.११.०८ चे पत्र पाठविले आहे. सदरच्या पत्रामध्ये मौजा बेला येथील सर्व्हे क्रं. ९ व भू.क्रं.१४४६ या प्रकरणाची विकदग्रस्त पंजीमध्ये फेर फार नोंदवून फेर फार घेतले असून मंजूर केलेले आहे. त्याचा फे.फा.क्रं. २४४ दिनांक ७.६.२००८ आहे. त्या फेर फारची व आपण फी भरुन त्याची

( पान २ वर ..)

नक्कल पुरविण्यात येईल. सदर प्रकरणांत श्री श्रीखंडे, माजी निरीक्षक, उमरेड, नगर भूमापन अधिकारी क्रं.३ नागपूर यांना ज्ञाप देवून त्यांचे विरुध्द रितसर कार्यवाही करण्याचे आदेश इकडील कार्यालयाने त्यांवर देण्यात आलेले आहे. तरी वरील प्रकरणाची धारिका प्राप्त होताच त्यांच्या छायाप्रती आपणास पुरविण्याची तजविज घेण्यांत येत आहे, असे नमुद आहे. परंतु अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. सदरच्या अपीलाच्या सुनावणीकरीता दिनांक १०.९.०९ रोजी राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून नोटीस काढण्यात आली होती. परंतु, तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख व जन माहिती अधिकारी हे आज सुनावणीस हजर झालेले नाहीत किंवा कागदपत्रे सुध्दा दाखल केलेली नाही. व त्यामुळे त्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु शास्ती लादताना जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे अधिनियमाचे कलम २०(१) च्या परंतुकाप्रमाणे ऐकुण घेणे बंधनकारक आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची दखल घेतलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासकिय कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक ५.३.२००९ च्या अर्जाप्रमाणे विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ५.३.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त)ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबध्दलचा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगास सादर करावा.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची दखल घेतलेली नसल्यामुळे व आयोगापुढे हजर झालेले नसल्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासकिय कार्यवाही करण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७६२/२००९**
**अपील क्रमांक ७६३/२००९**

**१) श्री चिंधु रामाजी जांगळे,**
**रा.गांधी वार्ड, मोहाडी, ता.मोहाडी, जिल्हा भंडारा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, लाखनी, जिल्हा भंडारा. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**पंचायत समिती, लाखनी, जिल्हा भंडारा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक ७६२/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ५.५.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी यांचे कार्यालयात १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर कालबध्द पदोन्नतीचे प्रकरणाबाबत माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीश: घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ४.६.२००९ रोजी खालीलप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

(१) श्री सी.आर. जांगळे ग्रासे म्हणून या कार्यालयात दि. १.५.२००० ला रुजू झाले. तसेच ते कालबध्द पदोन्नतीचे वेळी म्हणजे १.११.९४ ला पं.स.मोहाडी येथे कार्यरत होते. तसेच त्यांना २९.४.२००९ नुसार दिनांक ३०.५.०१ ला निलंबित करण्यात आले. तसेच दि. ७.३.०३ अन्वये अपील नामंजूर करण्यात आली. त्यामुळे त्यांचे कालबध्द पदोन्नतीचे प्रस्ताव या कार्या.पाठविल्याचे नस्ती पडताळणीतून दिसून येत नाही. तरी यापुढे त्यांचे प्रस्ताव लवकरच वरिष्ठ कार्यालयाचे मार्गदर्शन मागवून पाठविण्याची कार्यवाही केली जाईल. (२) सेवा निवृत्तीनंतर शासकिय गट विमा योजना भविष्य निर्वाह निधी अंतीम प्रदानाचे प्रकरणाबाबत- वरील कर्मचारी यांचेवर विभागीय चौकशी व निलंबनाची कार्यवाही दिनांक २३.७.०८ पर्यंत सातत्याने सुरु होती त्यामुळे त्यांचे प्रकरणात कार्यवाही केली नाही. तसेच त्यांचेवर विविध अफरातफरीची रक्कम रुपये १००७१६/- सेवानिवृत्ती प्रदानातून वसुली दाखविण्यात आली होती. त्यांची सेवा निवृत्ती प्रकरण ३१.१२.०८ ला मंजूर केलेले आहे. तसेच त्यांनी शास.गट विमा व भविष्य निर्वाह निधी प्रकरण तयार करणेसाठी अद्याप कोणतेही कागदपत्रे विविध नमुन्यातील असून न दिल्याने त्यांचे सदर प्रकरण वरिष्ठ कार्यालयास पाठविण्यास विलंब झाला आहे. तरी संबंधीतांनी आवश्यक प्रपत्रे, कागदपत्रे या कार्यालयास सादर करावी जेणे करुन उपरोक्त क्लेम काढण्यास अडचण जाणार नाही. सदरच्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी

( पान २ वर..)

दिनांक १६.७.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १५.९.०९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अधिकारात दिनांक ५.५.०९ व १६.७.०९ पर्यंत मागणी केलेल्या माहिती बाबत प्रस्ताव सादर केल्याची पावती कार्यालयात देण्यात यावी जेणेकरुन प्रकरणाचा शोध घेण्यास मदत होईल असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याचप्रमाणे अपीलकर्ता यांना अनेक पत्राद्वारे दिनांक ४.८.०९, २९.७.०९, ७.८.०९ अशारितीने पत्रव्यवहार केलेला दिसून येतो. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करण्यात आली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. दिनांक ४.६.०९ चे पत्र स्वयंस्पष्ट आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी सेवानिवृत्ती झाल्यानंतर त्यांच्या कालबध्द पदोन्नती प्रकरणाची माहितीची मागणी केली आहे. व ते १९९४ ला मोहाडीला असताना त्यांनी लाखनी पंचायत समितीकडे माहिती मागणे हे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांना दिनांक ४.६.२००९ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती स्वयंस्पष्ट आहे. तसेच त्यांचे निलंबन झालेले होते व ती प्रक्रिया दिनांक २१.८.२००९ पर्यंत सुरु होती व त्यामुळे माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक ७६३/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ५.५.०९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे गट विमा योजना व भविष्य निर्वाह निधी अंतिम प्रदानाबाबत दिनांक ३१.३.२००३ नंतर. माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांच्या दिनांक ५.९.२००९ च्या दोनही अर्जाच्या संदर्भात दिनांक ४.६.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील ७६२/२००९ व अपील क्रमांक ७६३/२००९ हे खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७६५/२००९**

**१) श्री गेमराज मारोतराव भोयर आणि इतर**
**तुळसकर लॉज जवळ, गुरुनानक वार्ड,**
**हिंगणघाट, ता. हिंगणघाट, जिल्हा वर्धा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद हिंगणघाट, ता.हिंगणघाट, जिल्हा वर्धा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी,**
**नगर परिषद, हिंगणघाट, ता.हिंगणघाट, जिल्हा वर्धा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१.०९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.४.२०९ रोजी मे. कलेक्टर तथा जन माहिती अधिकारी व मे.मुख्याधिकारी, नगरपरिषद तथा जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. एकुण ९ अर्जदार आहेत. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ५.५.०९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दिनांक निरंक प्रादेशिक कार्यालय प्रमुख तथा जन माहिती अपील अधिकारी कार्यालय, नागपूर यांचेकडे केलेले दिसून येते. सदरचा अर्ज हा दिनांक ५.५.०९ रोजी मुख्याधिकारी तथ अपीलीय अधिकारी यांचेकडे पाठविण्यात आलेला होता. व तो नगर परिषदेला दिनांक १३.५.०९ ला प्राप्त झालेला आहे व त्यावरुन सदर प्रकरण सुरु करण्यात आले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ४.६.०९ रोजी देण्यात आला असून सदरच्या प्रकरणात तपास केला असता श्री गेमराव भोयर यांनी मागणी केलेली माहिती, माहिती अधिका-यांकडून विहित मुदतीचे आंत दिल्याचे निदर्शनास आले. अपीलार्थी यांना माहिती अधिका-यांकडून माहिती मिळाली काय याबध्दल विचारणा केली असता त्यांनी माहिती मिळाल्याचे संदर्भात समाधान व्यक्त केले. तसेच सेवा निवृत्त शिक्षकांना ४ महिन्याची सेवानिवृत्ती/कुटूंब निवृत्ती वेतन मिळणे संदर्भात नगर पालिकेकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येत असून सेवा निवृत्त शिक्षकांना सेवा निवृत्ती व कुटूंब निवृत्ती वेतन तात्काळ मिळवून देण्यात येईल. त्या संबंधीचे कार्यवाही बध्दल सांगण्यात आले त्यावरुन अपीलार्थीने समाधान व्यक्त केले. व अपील खारीज करण्यात आले. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येतात.

३. द्वितीय अपीलाच्या सुनावणीमध्ये सर्वच अपीलकर्ता हजर होते. परंतु त्यांच्यापैकी

( पान २ वर ..)

प्रतिनिधी म्हणून श्री गेमराज भोयर यांचे म्हणणे ऐकुण घेतले. त्यांचे वय ८७ वर्षाचे आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी खालीप्रमाणे खुलासा केलेला आहे.

**खुलासा :**

"मा.शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर येथील लेखाधिकारी यांनी मौखिकरित्या असे सांगितले की, सन १९९३ ते २००९ पर्यंतच्या असेसमेंटचे तपासणी मध्ये नगर पालिकेकडे रु. ११३९५४८/- रक्कम थकीत आहे. त्यामधून माहे जानेवारीचे वेतन व पेन्शन करण्यात यावे. त्यांचे सूचनेप्रमाणे कॅशबुक मधून तपासण करण्यात येऊन रुपये ११३९५४८/- लाख न.प. फंडात जमा असल्याचे दिसून येते. याबाबतची टिपणी मा. प्र.अ.(सा.प्र.) यांचे तर्फे सादर करण्यात आली. त्यावर लेखाधिकारी न.प. यांचेकडून तपासणी होऊन अभिप्राय घेण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. मधल्या कालावधीमध्ये निवडणुक प्रक्रियेमध्ये सर्व कर्मचारी व्यस्त असल्यामुळे लेखाधिकारी यांचेकडून कॅशबुक तपासून देण्यात आले नाही. सदर कार्यवाही त्वरीत करण्यात येत असून याबाबतचा अहवाल मा.शि.उ.संचालकांना सादर करण्यात येत आहे. त्यांचेकडून न.पा.ला मा.जिल्हाधिकारी यांना पत्र प्राप्त होताच माहे जाने.०९ च्या पगाराची व्यवस्था करण्यात येईल. उर्वरित माहे फरवरी ०९ ते एप्रिल, ०९ पर्यंत पगार/पेन्शनचे डी.डी. मा.शि.उ.संचालक यांचेकडून प्राप्त झालेले नाहीत. महिना संपताच पेन्शन /कु.नि.वेतन ठरलेल्या तारखेत संबंधीतांच्या खात्यात जमा होणे आवश्यक आहे. परंतु जोपर्यंत मा.शि.उ.संचालक यांचेकडून असे लेखी आदेश प्राप्त होत नाही तोपर्यंत माहे जानेवारी ०९ चे वेतन/पेन्शन जमा करणे शक्य होत नाही माहे फरवरी/मार्च/एप्रिल ०९ चे वेतन/पेन्शनचा डी.डी.अद्याप पावेतो अप्राप्त आहे. प्राप्त होताच बँक खात्यात जमा करण्यात येईल."

त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना प्रथम अपीलाच्या संदर्भात निर्णय दिलेला आहे परंतु यापुढे त्यांना सेवा निवृत्ती वेतन हे वेळच्या वेळी मिळावे अशी त्यांची अपेक्षा आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अशा प्रकारची कार्यवाही करुन माहिती पुरविण्यासाठी आदेश देता येत नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांना त्याबाबत विचारले असता त्यांनी असे सांगितले की, त्यांच्या नगरपरिषदेमध्ये जानेवारी, २००९ ते मार्च, २००९ पर्यंत प्रशासनिक अधिकारी (शिक्षण विभाग) हे नव्हते. ते सेवानिवृत्त होणार असल्यामुळे रजेवर गेले होते. त्याचप्रमाणे शिक्षण विभागाकडून वेळेवर निधी उपलब्ध झाल्यास वेळच्या वेळी निवृत्ती वेतन देण्यात येते. परंतु लोकसभेची निवडणुक व त्यानंतर प्रशासनिक अधिकारी यांची सेवा निवृत्ती व त्यानंतर मा.उपसंचालक यांनी कोणत्याही प्रशासनिक अधिका-याची नियुक्ती केलेली नसल्यामुळे सेवा निवृत्ती वेतन वेळेवर उपलब्ध झ ाले नाही हे खरे आहे. परंतु वेळेवर निधी उपलब्ध करुन दिल्यास व प्रशासनिक अधिकारी यांची नियुक्ती केल्यास तशी अडचण येणार नाही, असे आयोगापुढे सांगितले. त्याकरीता शिक्षण संचालक यांनी या संदर्भात हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. अन्यथा प्रशासनिक अधिकारी शिक्षण विभागाने नियुक्त न केल्यास अनेक सेवा निवृत्तीधारकांना सेवा निवृत्ती वेतन मिळणार नाही, हे स्पष्ट आहे. याबाबतची दखल शिक्षण संचालक(प्राथमिक), मध्यवर्ती इमारत, म.रा. पुणे

( पान ३ वर ..)

यांनी त्वरीत घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी ज्या माहितीची मागणी केलेली आहे त्यासंदर्भात शासनाने गंभिरपणे विचार करुन शिक्षण संचालक(प्रा.), मध्यवर्ती इमारत,पुणे यांनी उपसंचालक, शिक्षण, नागपूर यांना तशा प्रकारचे आदेश दिल्यास माहिती वेळेवर उपलब्ध होऊ शकेल. **त्याकरीता शिक्षण संचालक(प्रा.) मध्यवर्ती इमारत, म.रा. पुणे यांना या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.**

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार** क्रमांक १५८/२००९

**१) श्री  सुरेंद्र पुंडलीकराव रेवतकर,**
**द्वारा बी.डी. जोसपू, १७/३ कॅनल रोड,**
**गिरीपेठ, नागपूर.** **तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**३) जन माहिती अधिकारी तथा  ठाणेदार,**
**पोलीस स्टेशन सिताबर्डी, ता.जि.नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.१०.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारकर्ता यांनी दिनांक १३.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ६.१०.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. तक्रारकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अपील क्रमांक १८/०७ चा निर्णय दिनांक २१.२.०९ रोजी आयोगाने दिला असून निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी अशा प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे् असे आहे की, त्यांना आतापर्यंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती ही मिळून आलेली नव्हती. परंतु आता ती उपलब्ध झालेली आहे व आता उपलब्ध करुन देण्यात येईल. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती ही उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे व त्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. आयोगाचा निर्णय सुध्दा जन माहिती अधिकारी हे अंमलबजावणी करीत नसेल तर त्यांच्या विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. व त्यामुळे सदरची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून त्यांना अपील क्रमांक १८/०७ मधील आदेशाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत संपूर्ण माहिती रजिस्टर पोस्टाने

( पान २ वर ..)

विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जन माहिती अधिकारी हे अपील क्रमांक १८/०७ च्या सुनावणीस सुध्दा हजर नव्हते व त्यांना समज देण्यात आलेली असल्यामुळे व पोलीस उपआयुक्त यांनी त्यांना समज दिलेली नाही असे दिसून येते व त्यामुळे पोलीस उपआयुक्त यांना सुध्दा समज देण्यात येत आहे. व जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त)ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम त्यांचे दर महिन्याचे पगारातून वसुल करुन ती "००७०-इतर प्रशासकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षात जमा करावी.

जन माहिती अधिकारी यांना शास्तीबध्दल विचारणा करण्यात आली परंतु त्यांनी आयोगाकडे खुलासा सादर केला नाही.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार** क्रमांक ८५/२००९

**१) श्री नवल रजनीकांत त्रिवेदी,**
**हॅाटेल रजनीकांतच्या मागे, सेंट्रल एव्हेन्यू,**
**बजेरिया, नागपूर.** **तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,**
**(मुख्यालय) पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त,**
**पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.१०.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारकर्ता यांनी दिनांक २५.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ६.१०.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. तक्रारकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अपील क्रमांक १७८४/०७ चा निर्णय दिनांक २१.२.०९ रोजी आयोगाने दिला असून निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने मुद्या क्रं. ३ वगळून माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी अशा प्रकारचा आदेश दिलेला आहे. परंतु सदरच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती सन १९६९ पासूनची असल्यामुळे मुळ नस्तीचा शोध घेणे सुरु आहे. मुद्या क्रं. २,४,५ व ६ ची माहिती मुळ नस्तीमध्ये असण्याची शक्यता आहे. सन १९६९ पासूनची माहितीची मागणी केलेली असल्यामुळे दोन महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. मुद्या क्रं. ७ अन्वये मुळ नस्ती उपलब्ध होताच निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याची तजवीज ठेवली आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविलेले आहे. परंतु अपीलकर्ता हे निरीक्षणासाठी हजर झालेले नाही. त्याकरीता अपीलकर्ता

( पान २ वर ..)

यांना वेळोवेळी पत्र दिलेले दिसून येते. एकुण ५२ मुळ नस्त्या आहेत. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी नस्तींचे निरीक्षण करुन आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. अन्यथा अपीलकर्ता यांना ५२ नस्तीच्या कागदपत्रांचा खर्च भरुन छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत एकुण ५२ नस्तींचे निरीक्षण करुन त्यातून आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेण्यात याव्यात.

२) तक्रारकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार** क्रमांक १२२/२००९

**१) सौ.आशाताई विठठलराव रागीट,**
**रा.हैद्राबाद स्टेट बँक जवळ, पंचशिल वार्ड, राजूरा,**
**ता. राजूरा, जिल्हा चंद्रपूर.** **तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**चंद्रपूर, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.१०.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारकर्ता यांनी दिनांक ११.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ६.१०.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. तक्रारकर्ता यांच्या अपील क्रमांक २३३/०८ या अपीलामध्ये दिनांक २३.३.२००९ रोजी १० दिवसांत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु तक्रारदार यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून सदरची तक्रार दाखल केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तक्रारदार यांची माहिती आता उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांना उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारचा प्रत्यावह नाही. त्यामुळे सदरची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांना अपील क्रमांक २३३/०८ मधील आदेशाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत संपूर्ण माहिती रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार** क्रमांक १२७/२००९

**१) श्री भाष्कर मिठूजी डोंगरे,**
**कस्तुरबा वार्ड, गोंदिया (पंचशिल झेंडयाजवळ)**
**क्रिष्णापुरा, पो.ता.जि. गोंदिया-४४१६०१.** **तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**मनोरभाई पटेल हायस्कुल चिचगांव पुरगांव,**
**पो.गणखैरा, ता. गोरेगांव, जिल्हा गोंदिया.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.१०.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारकर्ता यांनी दिनांक ३०.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ६.१०.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. तक्रारदार यांचे अपील क्रमांक २६४८/२००७ मध्ये दिनांक ३.४.२००७ रोजी मंजूर करण्यात येवून निर्णय पारित करण्यात आला असून १० दिवसांत माहिती विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलबध करुन देण्यात यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु आज जन माहिती अधिकारी हजर नाही व त्यामुळे तक्रारदार यांना माहिती उपलब्ध झाली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त)ची शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून त्यांच्या अपील क्रमांक २६४८/०८ मधील आदेशाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत संपूर्ण माहिती रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २६४८/०८ मध्ये दिलेल्या

( पान २ वर ..)

आदेशाचे पालन केलेले नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त)ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम त्यांचे दर महिन्याचे पगारातून वसुल करुन ती "००७०-इतर प्रशासकिय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षात जमा करावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७७९/२००९**

**१) श्री  नरेंद्रकुमार पुंडलीक रामटेके,**
**लोकमत, जिल्हा कार्यालय, स्टेशन रोड,गोंदिया-४४१६०१.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी पोलीस अधीक्षक कार्यालय,**
**गोंदिया, ता.जिल्हा गोंदिया.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी , पोलीस अधीक्षक कार्यालय,**
**गोंदिया, ता.जिल्हा गोंदिया.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.५.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस अधीक्षक कार्यालय, गोदिया यांचेकडे साहित्या पुरवठा करण्याची तयारी दर्शविलेल्या कंत्राटदाराचे नांव, साहित्याचे नांव, क्षेत्र दराची सूची, पोलीस विभागात लोखंडी पलंग खरेदी केले आहे काय, खरेदी केले असल्यास कोणत्या दरात खरेदी केले, किती खरेदी केले या निविदात सहभागी होणा-या कंत्राटदार/एजन्सीचे नांव व दर बाबत माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुशंगाने दिनांक २.६.२००९ रोजी अपीलकर्ता यांना रुपये ४५/- चा भरणा करावा. मुद्या क्रं.३ लोखंडी पलंग खरेदीची कार्यवाही जिल्हा परिषद गोंदिया या कार्यालयाकडून करण्यात आले असल्याने माहिती मिळण्यास संबंधीत कार्यालयाकडे कृपया पत्रव्यवहार करावा असे कळविलेले दिसून येतात. अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरना करुन माहिती उपलब्ध करुन घेतली होती. मुद्या क्रं. ३ च्या संदर्भात त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ११.६.०९ रोजी दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक७.७.०९ रोजी देण्यात आला असून मुद्या क्रं.३ मधील माहिती पोलीस अधीक्षक कार्यालय गोंदिया या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे व लोखंडी पलंग जिल्हा परिषद कार्यालय गोंदिया यांनी पुरविलेले असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्या कार्यालयाकडे पत्रव्यवहार करण्यासाठी सूचित केलेले आहे. पोलीस अधीक्षक गोंदिया येथील अभिलेखे पाहाता आपणास पुरविण्यात आलेली माहिती बरोबर असून मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा गोंदिया यांचेकडून लोखंडी पलंग पुरविण्यात आलेले आहे असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.२००९ रोजी पत्र दिले होते. व त्यानुषंगाने दिनांक २७.८.२००९ रोजी सदरची माहिती अधिनियमाचे कलम ८(छ) प्रमाणे प्रकट करण्यास अपवाद असल्याचे मत जाहिर करण्यास हरकत नसावी असे अपर पोलीस अधीक्षक गोंदिया यांनी कळविले आहे. तसेच आपण मागितलेली माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये पोलीस

( पान २ वर ..)

विभागाचे नक्षलग्रस्त भागातील सशस्त्र दूरक्षेत्राकरीता डबल डेकर लोखंडी पलंग केव्हा खरेदी केले व कुठे कुठे वाटप केले याबाबतची माहिती सुरक्षेच्या दृष्टीने देणे योग्य होणार नाही असे कळविलेले दिसून येते. त्यावर पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी डबल डेकर पलंग बाबतची माहिती पुरविण्याबाबत हरकत नसावी. याबाबतची माहिती सुरक्षेच्या दृष्टीने देता येणार नाही असेही कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी मुख्य कार्यपालन अधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे लोखंडी पलंग खरेदी करीता कोणताही निधी या कार्यालयास प्राप्त झाला नाही. १२८ नग डबल डेकर लोखंडी पलंग खरेदी करुन पोलीस अधीक्षक गोंदिया यांचेमार्फत पुरविले आहे असा आयोगाकडे खुलासा केलेला आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली ती दिशाभूल करणारी माहिती आहे. व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. व त्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरीत अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २.५.२००९ च्या अर्जामध्ये सदरचे पलंग हे कोणत्या क्षेत्रामध्ये वितरीत केले याबध्दलची माहिती विचारलेली नाही. जी माहिती विचारलेली आहे ती, क्षेत्राचे नांव, साहित्याचे नांव, पोलीस विभागात लोखंडी पलंग खरेदी केले आहे काय वगैरे.., ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु कोणत्या क्षेत्रात पुरविले या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाचे कलम ८(छ) प्रमाणे जो निर्णय दिला आहे तो योग्य आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २.६.२००९ च्या उत्तरात मुद्या क्रं. ३ च्या संदर्भात जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती दिशाभूल करणारी असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक, गोंदिया यांनी करावयाची आहे व त्याकरीता निर्णयाची एक प्रत पोलीस अधीक्षक, गोंदिया यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७७८/२००९**

**१) कु.शोभा रामचंद निचत,**
**पार्वती नगर चौक,पो. पार्वतीनगर, नागपूर-४४००२७.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**नागपूर गह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक,**
**नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.५.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा इस्टेट मॅनेजर, नागपूर गृह निर्माण यांचेकडे कु.शोभा रा.निचत यांना अलॅाट केलेले क्वार्टर नंबर व अलाटमेंटच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३.६.२००९ रोजी अपीलकर्ता यांना एकुण ४ मुद्यावर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दिनांक १७.६.२००९ रोजी दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १८.७.२००९ रोजी देण्यात आला असून सुनावणीच्या वेळेस संबंधीत माहिती अधिकारी श्रीमती कंगाले हजर होत्या. अपील अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी अपीलार्थी तर्फे श्री संजय रामचंद्र निचत यांना ताबा दिला असल्यास ताबा पावतीची प्रत त्यांना ७ दिवसांचे आंत दयावी असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या

( पान २ वर ..)

अर्जामध्ये पोचपावती मागितली नव्हती व जी माहिती मागितली होती ती विहित मुदतीत मुद्येनिहाय उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये पोच पावती उपलब्ध करुन देण्याकरीता आदेश दिलेले असल्यामुळे पोच पावतीचा शोध घेण्यात आला व आता ती पोच पावती मिळून आलेली आहे व ती उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारचा प्रत्यावह नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना ताबा पावतीची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७८२/२००९**

**१) श्री केशव जानबा घाटोळे,**
**ताकिया धंतोली, नागपूर** — **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी,**
**नागपूर(शहर) गिरीपेठ पोस्ट ऑफिस समोर, नागपूर.** — **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,**
**नागपूर(शहर)गिरीपेठ पोस्ट ऑफिस समोर, नागपूर.** — **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रादेशि परिवहन अधिकारी(ग्रामीण) यांचेकडे सन १९७९ ते १९९७ पर्यंत देवरी तपासणी नाका, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी गोंदिया व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी वर्धा या कार्यालयात कार्यरत होतो. त्यामुळे कार्यालयातर्फे देण्यात येणारे गोपनिय अहवालाच्या प्रती माझ्याकडे नाही. तरी वरील कालावधीत गोपनिय अहवाल दिलेले असल्यास त्याच्या झेरॅाक्स प्रती दर वर्षाच्या संपूर्ण माहिती देण्यात यावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती टपालाने घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १०.२.२००९ रोजी प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर शहर यांचेकडे सदरचा अर्ज हस्तांतर केलेला दिसून येतो. व त्याप्रमाणे दिनांक २९.८.२००९ रोजी कार्यालयीन अभिलेख्याप्रमाणे गोपनिय अहवालाच्या छायांकित प्रती सन १९७९-९७ पर्यंत पुरविण्यात आलेल्या आहेत. कार्यालयीन अभिलेख्यावरुन त्यांना काही अभिलेख्याचे शेरे त्यांना गोंदिया कार्यालयात कार्यरत असतांना कळविलेले आहे. यावरुन सदरचे

( पान २ वर ..)

प्रतिकुल शेरे कळविण्यात आलेले आहे असा निष्कर्ष प्रथम अपीलीय अधिकारी यांनी काढलेला दिसून येतो. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, प्रतिकुल शेरे कळविले असे त्यांचे म्हणणे असेल तर, मी ते प्रतिकुल शेरे स्विकारलेले आहे अशी पोच मला द्यावी. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तशा प्रकारची पोच उपलब्ध नाही. मात्र दिलेल्या पत्रावरुन अपीलकर्ता यांना त्यांचे प्रतिकुल शेरे हे त्या त्या वेळेस कळविण्यात आलेले आहे असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, माहिती जूनी असल्यामुळे व अपीलकर्ता हे निरनिराळया कार्यालयामध्ये कार्यरत असल्यामुळे त्यांना प्रतिकुल शेरे कळविल्याची पोच आज उपलब्ध होऊ शकत नाही. परंतु अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक ४.२.२००९ चे अर्जामध्ये पोच मागितलेली नाही व त्यामुळे तशा प्रकारे माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक नाही. त्याकरीता अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७८३/२००९**

**१) सौ.रेखा मुरारी दिक्षीत,**
**संत ज्ञानेश्वर वार्ड, मोहता गार्डन जवळ,**
**आशिर्वाद भवन, हिंगणघाट, ता.हिंगणघाट, जिल्हा वर्धा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,**
**वर्धा. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,**
**भूमी अभिलेख, देवळी, ता.देवळी, जिल्हा वर्धा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.९.०९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हा निरीक्षक, भूमी अभिलेख, वर्धा यांचेकडे दिनांक २२.१०.२००८ ला अर्ज केले. सोबत शिवसरोज दुबे व कांताबाई दुबे यांचे मृत्यू प्रमाणपत्राची नक्कल सुध्दा दिली तसेच आम्ही वारसदारांचे नांव नोंदणी करुन आखिव पत्रिका मिळण्याकरीता नझुल कार्यालयाकडे अर्ज सुध्दा केले पण आखिव पत्रिका नाही मिळाली आणि अर्जदारांचे नांव सुध्दा नोंदले नाही. अर्जदारानी पुन्हा दिनांक २६.२.२००९ ला अर्ज केला पण कोणताही प्रतिसाद नझुल कार्यालयाकडून मिळाला नाही,.. वगैरे माहिती मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, कार्यालय अधीक्षक भूमी अभिलेख यांनी सदरचा अर्ज तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे हस्तांतर केलेला दिसून येतो. व प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक १७.४.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे दिनांक २५.५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे दिनांक १५.६.२००९ रोजी अपीलकर्ता यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती दिनांक १७.४.२००९ रोजी उपलब्ध झ ाली परंतु ती प्रत्यक्ष दिनांक ५.५.०९ रोजी मिळाली. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, माहिती ही तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे आल्यावर राज्य

(पान २ वर ..)

जन माहिती अधिकारी, जिल्हा निरीक्षक, भूमी अभिलेख यांचे कार्यालयात अर्ज दाखल केला होता. व त्यामुळे सदरचा अर्ज तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे हस्तांतर केलेला आहे व त्यामुळे निश्चितच वेळ लागतो व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती जर दिनांक ५.५.२००९ रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे, तरी ती मुदतीत आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपील सुध्दा अपीलकर्ता यांनी जिल्हा निरीक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे केले आहे. व अशा प्रकारे तरतुद ही अधिनियमात नाही. माहिती ज्या कार्यालयात उपलब्ध असेल त्या कार्यालयात अर्ज करणे आवश्यक असते व त्यामुळे ३० दिवसांमध्ये माहिती उपलब्ध होऊ शकते. दिनांक २२.१०.०८ चा अर्ज कोणत्या कार्यालयात केला याचा उल्लेख नाही. त्यामुळे सदरचा अर्ज तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे केले असावा. मात्र, माहिती जिल्हा निरीक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे मागितलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचा विलंबाचा मुद्या निकाली निघतो. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना प्रकरणातील चौकशीच्या संदर्भात तक्रार केली. परंतु अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे जशी माहिती आहे तशी उपलब्ध होते. कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्या बाबत तपासणी करता येत नाही. त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७८४/२००९**

**१) प्रा.कु.कल्पना शिवमयंक दुबे,**
**साप्ताहिक बाजार, वार्ड नं.६, पुलगांव,**
**ता.देवळी, जिल्हा वर्धा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,**
**भूमी अभिलेख, वर्धा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,**
**भूमी अभिलेख, देवळी, ता.देवळी, जिल्हा वर्धा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा निरीक्षक, भूमी अभिलेख, वर्धा यांचेकडे पुलगांव नझुल रेकार्ड मधील ब्लॉक नं.११ मधील भूखंड क्रं.१६/१, ११९/१, १५७/१ व ब्लॉक नं. १२ मधील भूखंड क्रं. १३/१ ची पृथक आखिव पत्रिका, पृथक नकाशे व मोजणीची क प्रत शिघ्र प्राप्त करण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १८.३.२००९ रोजी आपल्या अर्जात मागणी केलेली माहिती तालुका निरीक्षक, देवळी यांचे कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे आपला माहितीचा अर्ज तालुका निरीक्षक, देवळी यांचेकडे पत्र दिनांक १८.३.२००९ अन्वये माहिती पुरविण्यासाठी पाठविलेला आहे. आपण मागणी केलेली माहिती पुरविण्याबाबत तालुका निरीक्षक यांना आदेश देण्यात आलेले आहे. व त्याप्रमाणे दिनांक १७.४.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व माहिती दिनांक ५.५.०९ रोजी अपीलकर्ता यांनी प्रत्यक्ष घेतलेली दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी दिनांक २५.५.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १५.६.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांचे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये दिनांक १५.६.०९ रोजी सुनावणी घेतली असून मौजा पुलगांव नझुल येथील ब्लॉक नं. ११ मधील प्लॉट नं. १६/१, ११९/१,२, १५७/१ व ब्लॉक नं. १२ मधील १३/१ चे पोट हिस्सा मोजणी दिनांक २७.११.२००८ व २८.११.०८ रोजी मोजणी करण्यात आली असून सदर मोजणी नकाशाच्या नकला अर्जदार यांना तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, देवळी यांनी दिनांक १५.६.०९ रोजी पुरविलेल्या आहेत. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे अपील निकाली काढणेत यावे असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

( पान २ वर ..)

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती उपलब्ध झाली होती परंतु ती विलंबाने उपलब्ध झाली. परंतु अपीलकर्ता यांनी सुध्दा माहिती ही तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांचे कार्यालयात असताना जिल्हा निरीक्षक वर्धा यांचेकडे मागितलेली दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या चुकीमुळे विलंब झालेला असल्यामुळे त्याकरीता जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लादणे योग्य नाही. अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज व प्रथम अपील हे जिल्हा निरीक्षक यांचेकडेच केले आहे. अधिनियमाच्या तरतुदी जशा जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांना लागू आहेत तशाच त्या अपीलकर्ता यांना सुध्दा लागू आहेत. तसेच अपीलकर्ता यांनी प्रत्यक्ष दिनांक ५.५.०९ रोजी माहिती प्राप्त करुन घेतली याचा अर्थ ते स्वत: कार्यालयात गेले असतील त्यावेळेस त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. व त्यामुळे त्यांचा विलंबाचा मुद्दा निकाली निघतो. तसेच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७८०/२००९**
**अपील क्रमांक ७८१/२००९**

**१) श्री रामनारायण दुर्गाप्रसादजी केजडीवाल,**
**राजबाई भवन, विवेकानंद नगर,तुमसर-४४१९१२,**
**ता. तुमसर, जिल्हा भंडारा. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी (गट-अ)**
**समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया. जि. गोंदिया. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, समाज कल्याण विभाग (गट-अ)**
**जिल्हा परिषद, गोंदिया, जिल्हा गोंदिया. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांचेतर्फे ॲड. एस.एन.अग्रवाल हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपील क्रमांक ७८०/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे आपले कार्यालयीन पत्र क्रं.१४२८/०८ दिनांक १३.८.२००८ चे सहपत्रात आठवले अशोक कचरु यांनी मागितलेली माहिती मध्ये नमुद केलेला मुद्या क्रं. ३ चे शासकिय धोरणची सत्यप्रत. (२) तसेच मुद्या क्रं.६ ला नमुद केलेली माहिती. (३) तसेच मुद्या क्रं.७ चे शासकिय धोरणची सत्यप्रत व त्यासंदर्भातील संपूर्ण माहिती व त्याअनुषंगाने आपण केलेली कार्यवाहीची लेखी माहिती मिळण्याबाबत, अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २६.८.०८ रोजी एकुण ३ मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १ ची माहिती उपलब्ध झाली नाही व मुद्या क्रं.२ ची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मुद्या क्रं.३ ची माहिती उपलब्ध करुन देताना ती छायांकित प्रत वाचता येणे शक्य नाही या कारणास्तव प्रथम अपील दिनांक १०.१०.०८ रोजी दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.१०.२००८ रोजी देण्यात आला असून मुद्या क्रं.१ ची माहिती शासकिय धोरणाची प्रत कार्यालयात उपलब्ध नव्हती

(पान २ वर ..)

व आता ती प्राप्त झाल्यामुळे देता येईल असे अपीलकर्ता यांना सांगण्यात आले. मुद्या क्रं.३ अन्वये शासकिय धोरणाची प्रत साक्षांकित प्रत देण्यात आलेली नव्हती ती प्रत आता साक्षांकित करुन देण्यात यावी, असे कळविलेले दिसून येते. त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचेतर्फे ॲड. एस.एन. अग्रवाल हजर आहेत. व त्यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना संपूर्ण माहिती ही योग्यरित्या उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे मुद्या क्रं. २ व ३ ची माहिती आज उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच मुद्या क्रं. १ व ३ ची माहिती पुन्हा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे व मुद्या क्रं.२ ची माहिती पुणे कार्यालयातून मागवून उपलब्ध करुन देण्यात यावी. परंतु जन माहिती अधिकारी हे हजर नसल्यामुळे त्याबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झ ालेली आहे हे आज नस्तीमध्ये नाही किंवा त्यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली नाही. वास्तविक, दिनांक १०.९.०९ रोजी या कार्यालयातून नोटीस सुनावणीसाठी काढण्यात आली होती. व ती ज्याअर्थी अपीलकर्ता यांना मिळू शकते त्याअर्थी जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांना सुध्दा उपलब्ध झाली असली पाहिजे. परंतु ते हजर नाहीत. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक ७८१/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.०८ रोजी जन माहिती अधिकारी, सोशल वेलफेअर ऑफिसर, गोंदिया यांचेकडे आपले कार्यालयीन पत्र क्रं. २३१ दि. ३१.१.२००८ ची सत्यप्रत.(२) दि. ३१.१.०८ ला प्रेषीत केलेले आवक जावक रजिस्टरची सत्यप्रत. (३) आवक जावक क्रं. २२८ ते २३८ ची कार्यालयीन पत्राची सत्यप्रत.त्यासंदर्भात संपूर्ण माहिती व त्याअनुषंगाने आपण केलेली कार्यवाहीची लेखी माहिती मिळण्याबाबत. माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक १०.११.०८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.११.०८ रोजी देण्यात आला असून प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये कार्यालयात माहिती उपलब्ध असल्यामुळे दिनांक २६.८.०८ रोजी पत्र क्रमांक १४९४ अन्वये पैसे भरण्याकरीता कळविलेले आहे.

(पान ३ वर..)

त्यामुळे माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली किंवा विलंबाने प्रक्रिया केली असे म्हणता येणार नाही. माहिती अधिकारी यांनी कळविलेली कार्यवाही बरोबर आहे. विहित मुदतीमध्ये माहिती करीता रुपये ३६/- प्रमाणे माहिती घेवून जाण्याबाबत कळविलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी ३६/- रुपयाचा भरना केलेला नसल्यामुळे व फी चा भरना केल्यानंतर माहिती सादर करावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

५. माहिती लपविली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु त्याबाबत कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला नाही. अपीलकर्ता यांच्या वकीलांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केलेला खुलासा नस्तीमध्ये आहे. परंतु सदरचा खुलासा यामध्ये रुपये ३६/- भरण्याबाबतचा कोणताही उल्लेख केलेला नाही व त्यामुळे रुपये ३६/- चा भरना करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी हे प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ७८०/०९ अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मुद्या क्रं. १ व ३ ची माहिती स्पष्टपणे वाचता येईल अशी माहिती साक्षांकित करुन उपलब्ध करुन द्यावी. मुद्या क्रं.२ ची माहिती पुणे कार्यालयातून मागवून उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ७८१/०९ हे प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे खारीज करण्यात येत आहे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक१३९ /२००९**

**१) श्री चंद्रशेखर पोपट चौधरी,**
**प्लॉट नं.जी-१३, फलॅट नं.बी-२,**
**आदित्य अपार्टमेंट, पुर्ती बाजारसमोर, आठरस्ता चौक,**
**लक्ष्मीनगर, नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक,**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारकर्ता यांनी दिनांक ३१.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ५.१०.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. सदरच्या तक्रारीचा निर्णय दिनांक १०.२.२००९ रोजी देण्यात आलेला आहे. आदेशामध्ये तक्रार मंजूर करण्यात आली असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक यांनी माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली असून अपूर्ण माहिती दिल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. व ही कार्यवाही सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे, असा निर्णय दिलेला आहे. सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी जो खुलासा आयोगाकडे दाखल केला आहे तो खुलासा तक्रारीच्या अनुषंगाने दिसून येत नाही. व त्यामुळे माहिती अधिकारी व परीक्षा नियंत्रक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी आयोगाकडे जी तक्रार दाखल झालेली आहे, त्या तक्रारीच्या संदर्भात खुलासा करण्यात यावा असे आदेश दिनांक ५.१०.२००९ चे निर्णयामध्ये देण्यात आले होते. त्याअनुषंगाने डॉ.डी.एन.मिश्रा, परीक्षा नियंत्रक व माहिती अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांनी सुधारित खुलासा दिनांक २७.११.२००९ रोजीचे पत्रान्वये आयोगाकडे दाखल केला आहे. खुलाशाचे

( पान २ वर ..)

अवलोकन केले असता सुधारित खुलासा हा समाधानकारक असल्याने अपील क्रं.२६४१/२००७ च्या दिनांक १०.२.२००९ च्या निर्णयातील आदेश क्रं. २ रद्य करणे संयुक्तिक राहील.

**<u>आदेश</u>**

१) "सुधारित खुलासा समाधानकारक असल्याने अपील क्रं.२६४१/२००७ च्या दिनांक १०.२.२००९ च्या निर्णयातील आदेश क्रं.२ रद्य करण्यांत येत आहे."

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना कळविण्यांत यावे व वरील आदेशाची प्रत मुळ आदेशासोबत जोडण्यांत यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.१२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८४८/२००९**

**१) श्री प्रभूनाथ उरकुडाजी कोल्हे,**
**द्वारा ओम अपार्टमेंट प्लॉट नं.३७,**
**मालवीय नगर, खामला रोड, नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त(महसुल)**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा चिटणीस(महसुल शाखा)**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.४.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे, माझ्या दिनांक १४.८.२००८ व १७.३.२००९ रोजीच्या अर्जाचे अनुषंगाने कार्यवाहीची प्रत पुरविण्याबाबत सादर केलेल्या अर्जाची प्रति सोबत जोडलेल्या आहे, अशी माहिती मागितलेली दिसून येते. तसेच नोंदणीकृत डाकेने पाठविण्याकरीता २५/- रु. तिकिट लावलेला लिफापा अर्जासोबत पत्ता लिहून जोडलेला आहे, असेही नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३०.४.२००९ रोजी प्रस्तुत प्रकरणात कार्यवाही सुरु आहे, असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ५.६.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २५.६.०९ रोजी देण्यात आला असून अपील खारीज करण्यात आलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी जे निवेदन दिलेले आहे त्या निवेदनावर

( पान २ वर ..)

तातडीने कार्यवाही होण्याची त्यांची अपेक्षा आहे. त्यांनी ज्या कार्यवाहीची अपेक्षा केलेली आहे, त्या कार्यवाहीबध्दल अहवाल त्यांना प्राप्त झाला आहे. परंतु त्यावर पुढील कार्यवाहीचा निर्णय अजून इ ालेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना अर्ज करते वेळेस जी वस्तुस्थिती आहे ती कळविलेली होती. दरम्यान अहवाल हा मा. आयुक्त यांचेकडे मान्यतेकरीता पाठविला आहे. व त्यास मान्यता मिळालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेली माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांना सध्या त्यांच्या निवेदनाच्या संदर्भात किंवा अहवालाच्या संदर्भात कोणत्या स्तरावर सदरचा अहवाल प्रलंबित आहे याबध्दलची माहिती त्यांना कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना, जन माहिती आकिारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या निवेदनावरील अहवालाच्या संदर्भात सद्यस्थितीची माहिती विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १५.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८४७/२००९**

**१) श्रीमती वर्षा घनश्याम गौरकर,**
**द्वारा-हेमंत गौरकर, एफ-२, बालाजी अपार्टमेंट,**
**अमरनाथ अपार्टमेंटच्या मागे,**
**के.डी.के.कॅालेज रोड, नंदनवन, नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोली अधीक्षक,**
**नागपूर ग्रामिण, नागपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक(मुख्यालय)**
**नागपूर ग्रामीण, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.९.०९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक(मुख्यालय), कार्यालय पोलीस अधीक्षक, नागपूर यांचेकडे अपीलकर्तीने दिनांक ३.१.०९ ला दिलेल्या माहितीचे अधिकारान्वये पोलीस उप अधीक्षक(मुख्या.) पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामिण(नागपूर) (माहिती अधिकारी) यांनी दिलेल्या माहितीचे मुद्दा क्रं.३ मध्ये नमुद भ्रमणध्वनी क्रमांक ९४२०५०३३०० हा भ्रमणध्वनी कोणाचा आहे. सदर भ्रमणध्वनी धारकाचे संपूर्ण नांव प पत्ता कळविण्यात यावा. (२) श्री सुनिल भूते, पोलीस उपअधीक्षक(गृह) नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर यांचे पत्र क्रं.नाजिग्रा/होम/२००८-२००१ दिनांक १०.४.०८ ला संलग्न सहपत्रांची झेरॅाक्स प्रत उपलब्ध करुन दयावी. अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २६.३.२००९ रोजी प्रथम अपील हे पोलीस अधीक्षक यांचेकडे दाखल केले आहे. त्यानंतर दिनांक १४.४.०९ रोजी अपीलकर्ता यांना माहितीच्या खर्चाकरीता रुपये ७२/- चा भरणा करावा व ३६ प्रती घ्याव्या असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून ती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी, याकरीता त्यांनी अधिनियमाचे कलम पोलीस अधीक्षक यांच्या निदर्शनास आणले. परंतु तरीसुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिलेला दिसून येत नाही. त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांच्या अपील मेमोवरुन असे दिसून येते की, त्यांना दिनांक १३.८.२००९ पर्यंत सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नव्हती. याचाच अर्थ माहितीचा अर्ज व प्रथम

(पान २ वर ..)

अपीलाच्या नंतर सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो व त्याकरीता जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करणे योग्य राहील. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची दखल घेतलेली नाही. दिनांक २७.४.२००९ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या दिनांक १४.४.०९ च्या पत्राचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी अधिनियमाच्या तरतुदी निदर्शनास आणून सुध्दा त्याची दखल न घेता त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे. व त्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासकिय कार्यवाही करणे आवश्यक राहील.

जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना त्यांच्या दोनही मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु ती दिनांक १४.८.२००९ रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. थोडक्यात, माहितीचा अर्ज आल्यानंतर दखल घेतली नाही. परंतु प्रथम अपीलानंतर सुध्दा कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही, असे दिसून येते. त्यामुळे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना माहिती विलंबाने उपलब्ध झालेली असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १५.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८४९/२००९**

**१) श्री मनोज वामन वासनिक,**
**लष्करीबाग, कु-हाडकारपेठ, पाचपावली पो.स्टे.मागे,**
**नागपूर-१७. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**नागपूर. — उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,**
**तहसिल कार्यालय, नागपूर (शहर). — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांचेकडे वाहन अपघात मध्ये मिळणारी रक्कम व अपघात क्षतिपुर्तीची रक्कम व कालावधी संबंधाने माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १६.५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १७.७.०९ रोजी दिलेला दिसून येतो. परंतु तरीही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही याबध्दल युक्तीवाद केला. परंतु दिनांक ४.४.०९ च्या पत्राप्रमाणे चौकशीसाठी पत्र सादर केले आहे. अहवाल अप्राप्त आहे असे कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिसून येत नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात उपविभागीय

( पान २ वर ..)

अधिकारी यांनी नोटशिटवर नोंद केलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचे वकील यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना जी माहिती मिळाली नाही ती त्यांनी इतर कार्यालयात जावून छायांकित प्रती घेतल्या आहेत. परंतु जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, त्यांनीच त्यांना छायांकित प्रती उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी किंवा इतर अधिकारी यांनी त्यांच्याशी दूरव्यवहार केला असे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. परंतु निश्चित कोणत्या अधिका-यांनी त्यांच्यासोबत दूरव्यवहार केला हे निवेदनात म्हटलेले नाही. त्यामुळे त्याबाबत निश्चित अशी कार्यवाही करता येत नाही. अपीलकर्ता यांची क्षतीपुर्तीची जी अपेक्षा आहे ती मंजूर करण्यात आली आहे असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. परंतु माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३०.३.०९ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती, जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १५.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८४५/२००९**

**१) श्री अजय आर. मिश्रा,**
**६१, रतन नगर, मानकापूर, नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.उपायुक्त,**
**महानगर पालिका, नागपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा निगम सचिव, महानगरपालिका,नागपूर**
**४) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(विद्युत),महानगर पालिका,नागपूर**
**५) जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, लक्ष्मीनगर झोन क्रं.१,**
**महानगर पालिका, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.५.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, महानगरपालिका यांचेकडे त्यांच्या दिनांक २४.३.२००९ च्या निवेदनावर झालेल्या कार्यवाहीची माहिती एकुण ७ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १०.६.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्याप्रमाणे दिनांक ९.७.०९ रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.८.०९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी (लोककर्म) यांनी मुद्या क्रं. १ ते ७ ची माहिती व माहिती अधिकारी (विद्युत) यांनी ५ दिवसांचे आंत माहिती विनामुल्य द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्यावर दिनांक १२.८.०८ रोजी माहिती अधिकारी व कार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी मागितलेली माहिती सोबत जोडलेली आहे व त्यापैकी आपणास काही माहितीची आवश्यकता असल्यास कृपया

**(पान २ वर..)**

व्यक्तीशः संपर्क साधावा असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना त्यांच्या तक्रारीच्या संदर्भात निर्णय करुन घ्यावयाचा असल्यामुळे ते माहिती मागत आहे असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कार्यालयात कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन देता येतात. परंतु कोणत्याही प्रकरणात कारवाई करण्याचे आदेश देता येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती माहिती ही एकाच विभागाची उपलब्ध झालेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाची माहिती त्यांना अजूनपर्यंत उपलब्ध झालेली नाही. त्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागातील जन माहिती अधिकारी किंवा सहाय्यक जन माहिती अधिकारी किंवा माहिती उपलब्ध करुन घेण्यास ज्यांचे ज्यांचे सहाय्य घेतले असेल त्यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २९.५.२००९ च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भात माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत कागदपत्राच्या छायांकित प्रतीचे स्वरुपात विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) जन माहिती अधिकारी(सार्वजनिक बांधकाम विभाग)महानगरपालिका, यांनी अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध किंवा जन माहिती अधिकारी किंवा कार्यालयातील जे अधिकारी/कर्मचारी माहिती न उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असतील त्यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे करण्यात येत आहे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १५.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८५५/२००९**
**अपील क्रमांक ८५६/२००९**
**अपील क्रमांक ८५७/२००९**

**१) सौ.विमलबाई प्रभाकर कुंभरे,**
**मु.गांधीनगर, पो. चापलवाडा, ता.चामोर्शी, जि.गडचिरोली. अपीलकर्ता**

**२) श्री आनंदराव झुरुजी मडावी,**
**मु.बेलगटा चक, पो.पेटतळा, ता.चामोर्शी, जि.गडचिरोली. अपीलकर्ता**

**३) श्री मुराजी पैका तेलामी,**
**मु.पोतेपली, पो. चापलवाडा, ता.चामोर्शी, जि.गडचिरोली. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप वनवंरक्षक,**
**आलापल्ली वनविभाग, आलापल्ली. ता.अहेरी, जिल्हा गडचिरोली. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्राधिकारी,**
**वनपरिक्षेत्र घोट (वनविभाग आलापल्ली)**
**ता.चामोर्शी, जिल्हा गडचिरोली. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.१०.२००९)**

**नि र्ण य**

तीनही अपीलकर्ता यांनी दिनांक १८.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये प्रत्येकी एक याप्रमाणे तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १६.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपील क्रमांक ८५५/०९ व अपील क्रमांक ८५६/०९ मध्ये अपीलकर्ता गैरहजर आहेत. अपील क्रमांक ८५७/०९ मध्ये अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. वरील तीनही अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्राधिकारी, घोट यांचेकडे, आमच्या संयुक्त वन व्यवस्थापन समितीचा स्थापनेचा दिनांक या समितीला कोणकोणते वनक्षेत्र दिलेले आहे त्याच्या आराजीसह कम्पार्टमेंट नंबर. (२) या समितीला वर्ग केलेल्या क्षेत्रातून समितीच्या स्थापने पासून ते आजपर्यंत प्रति वर्षाला कोणकोणते वनोत्पादन काढलेले आहेत व त्याची एकुण किंमत, त्याचा खर्च वजा जाता एकुण शिल्लक रक्कम किती आहे व ती शासनाच्या कोणत्या खात्यात जमा आहे, याची संपूर्ण माहिती प्रमाणित मिळण्यात यावी. माहिती व्यक्तीशः आवश्यक आहे असे नमुद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ७.१.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा

( पान २ वर ..)

दिलेला दिसून येत नाही. मात्र सुनावणीकरीत नोटीसेस काढण्यात आलेल्या दिसून येतात. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तीन अपीलार्थीपैकी श्री मुराजी पैका तेलामी, अपीलकर्ता अपील क्रमांक ८५७/०९ हे स्वत: त्या समितीचे अध्यक्ष आहे. व त्यांना त्यांच्या परिक्षेत्रात किती कामे करण्यात आली याबाबतची संपूर्ण माहिती आहे. तरी त्यांनी माहितीच्या अधिकारात अर्ज केला असल्यामुळे सदरची माहिती ही संयुक्त वन व्यवस्थापन समितीस माहितीच्या अधिकाराखाली मागितलेल्या माहितीच्या संदर्भात क्षेत्र सहाय्यक यांचेकडून प्राप्त झालेली माहिती दिनांक २२.१.०९ रोजी अपीलकर्ता यांना पुरविण्यात आलेली आहे. त्यात क्षेत्र सहाय्यक मक्केपल्ली यांनी, मक्केपली उपक्षेत्रात मौजा गांधीनगर गांवात संयुक्त वनव्यवस्थापन समिती दिनांक १.१०.२००२ ला गठीत करण्यात आली असून समितीला वर्ग केलेला खंड क्रमांक २९ क्षेत्र १००.३२२ हेक्टर आहे. परंतु आतापर्यंत वर्ग केलेल्या क्षेत्रात कोणत्याच प्रकारचे कामे मंजूर झालेले नाही. आणि विभागीयरित्या शासकिय कामे करण्यात आलेली नाही. करीता आजपर्यंत संयुक्त वनव्यवस्थापन समिती गांधीनगर समितीला वर्ग केलेल्या क्षेत्रात काढलेल्या व विक्री केलेल्या वन उत्पादन आणि जमा खर्चाची माहिती निरंक आहे. व ही माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे.

तसेच वनपरिक्षेत्राधिकारी, घोट यांनी श्री आनंदराव झुरुजी मडावी यांना दिनांक ६.१.०९ रोजी श्री जे.आर.रायपूरे, क्षेत्र सहाय्यक, भाडभिडी यांचेकडून समितीच्या गांवाचे नांव पेटतळा, राजूर (बं.), बेलगटाचेक, भोगनबोडी या संदर्भातील माहितीचा तपशिल उपलब्ध करुन दिलेला दिसून येतो. त्याबध्दलचा सर्व पत्रव्यवहार आयोगाकडे दाखल केलेला आहे.

४. अपील क्रमांक ८५७/०९ मध्ये सुध्दा अपीलार्थी यांनी प्रकृतीच्या कारणास्तव प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर राहता आले नाही असे आयोगाकडे आज निवेदन दिलेले आहे. क्षेत्र सहाय्यक, मकेपल्ली यांनी संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या सर्व अध्यक्षांना सुनावणीस हजर राहाण्यासास कळविण्यात आले होते. परंतु ते हजर राहीलेले दिसून येत नाही. क्षेत्रसहाय्यक, मकेपल्ली यांनी, मकेपल्ली उपक्षेत्र, मौजा पोतेपल्ली गांवात संयुक्त वन व्यवस्थापन समिती दिनांक ३.११.०२ ला गठीत करण्यात आली असून खंड क्रमांक ४७ क्षेत्र १९६.०२६ व खंड क्रमांक ५० क्षेत्र १३६.७६६ हेक्टर आहे. परंतु आतापर्यंत वर्ग केलेल्या क्षेत्रात कोणतीही कामे झालेली नाही व विभागीयरित्या शासनाने कामे केलेली नाही. करीता आजपर्यंत संयुक्त वन व्यवस्थापन समिती, पोतेपल्ली कडे वर्ग केलेल्या क्षेत्रात काढलेल्या व विक्री केलेल्या वन उत्पादन आणि जमा खर्चाची माहिती निरंक आहे. व ही माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु सर्व अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती विलंबाने उपलब्ध झालेली आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती ही समितीच्या सचिवांकडून उपलब्ध करुन घेवून क्षेत्र सहाय्यक यांचेकडून ती माहिती अधिकारी यांन उपलब्ध करुन दिली जाते. त्यामुळे सदरची माहिती ही वन विभागातील असल्यामुळे त्यास विलंब लागतो. तरी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यातही त्यांचीच समिती असल्यामुळे त्यांना संपूर्ण माहिती आहे.

( पान ३ वर..)

यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्याकरीता तीनही अपीले खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ८५५/०९, अपील क्रमांक ८५६/०९ व अपील क्रमांक ८५७/०९ खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८५२/२००९**
**अपील क्रमांक ८५३/२००९**

**१) श्री अमिर शेख सरदार कन्नोजे,**
**W.C.L. उमरेड प्रोजेक्ट, क्वा.नं. L.C.H.-५०,**
**ता. उमरेड, जिल्हा नागपूर-४४१२०४.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,**
**पंचायत समिती, उमरेड, ता.उमरेड, जिल्हा नागपूर.**
**३) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,**
**पंचायत समिती, उमरेड, ता. उमरेड, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्राम पंचायत कार्यालय वायगांव (घोटुर्ली)**
**ता. उमरेड, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १६.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.७.२००९ रोजी दोन माहितीच्या अर्जाच्या माध्यमातून जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत, वायगांव यांचेकडे, ग्राम पंचायत वायगांव कडून आपण जिल्हा परिषद शाळेसाठी दरवर्षी किती निधी देतात व तो निधी कोणत्या फंडाद्वारे आपण उपलब्ध करतात. या संबंधीत दर वर्षी म्हणजे २००७ पासून २००९ पर्यंतची प्रत्येक एक एक वर्षाची माहिती सविस्तर मला देण्यात यावी. आणि शासनाकडून विशेष योजना जिल्हा परिषदेला येतात का. व त्या कोणकोणत्या याबाबत माहिती सविस्तर देण्यात यावी. क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाची माहिती देण्यात यावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. दूस-या अर्जामध्ये ग्राम पंचायत परिसरातील खेळाडुसाठी आपल्या ग्राम पंचायत अधिकारी अंतर्गत कोणत्या योजना आहेत. याची माहिती आम्हाला सविस्तर द्यावी. गेल्या वर्षभरात आपण स्थानिक खेळाडुसाठी आपल्या अधिकारकक्षेत अंतर्गत किती कार्यक्रम राबविले. आणि ते कोणते कार्यक्रम आपण राबविले त्यासाठी आपण किती निधी खर्च केला व कोणत्या फंडातून खर्च केला याची सविस्तर माहिती देण्यात यावी. अशी माहिती मागितलेली दिसून येते.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २०.७.२००९ व दिनांक २२.७.२००९ रोजी एकुण ७ मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतु गट शिक्षणाधिकारी यांनी

( पान २ वर ..)

दिनांक १९.९.२००९ रोजी, ग्राम पंचायत वायगांव क्षेत्रात असलेल्या जिल्हा परिषद शाळेसाठी प्राप्त निधीची माहिती यासह संलग्न करुन पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. सन २००७-०८, २००८-०९ मध्ये माहिती निरंक, अशी माहिती दिलेली दिसून येते. व त्यावरुन अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य असली तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येतात. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना खोटी माहिती दिली किंवा विलंबाने दिली अशा प्रकारचे अपीलाचे कारण दिलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे, ती खोटी आहे याकरीता अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारचा पुरावा आयोगापुढे सादर केलेला नाही. व तसेही सर्वश्रुत आहे की, जिल्हा परिषद शाळांना ग्रामपंचायत कडून कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध होत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, उमरेड यांनी आयोगापुढे सांगितले की, माहिती उपलब्ध करुन दिली असली तरी ते मुख्याध्यापकांना सतत त्रास देता असतात. व ही बाब अर्थातच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली असून सुध्दा आयोगाकडे अपील दाखल केलेली आहे यावरुन सुध्दा सिध्द होते. व त्यामुळे सदरचे दोनही अपीले खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ८५२/०९ व अपील क्रमांक ८५३/०९ खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८५४/२००९**

**१) श्री कमलकिशोर केदारनाथ गांधी,**
**एफ-२०२, विजय अर्केड, १६ शिवाजी नगर, नागपूर**
**ता.जि.नागपूर-१०.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,**
**परिमंडळ क्रमांक-१, सिताबर्डी विभाग, नागपूर.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**एम.आय.डी.सी.विभाग, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त, एम.आय.डी.सी.विभाग, नागपूर गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री जी.पी. भावसार, सहाय्यक पोलीस निरीक्षक हजर आहेत. यावरुन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त किंवा पोलीस उपआयुक्त यांचे कार्यालयात कोणत्याही प्रकारचा जबाबदार अधिकारी आहे असे दिसून येत नाही.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, एम.आय.डी.सी.क्षेत्र, नागपूर यांचेकडे दिनांक २७.१२.२००८ ला केलेल्या तक्रारीमध्ये चौकशी अधिकारी द्वारा दिनांक ७.१.०९ नंतर घेतलेले गवाहांचे बयान, व श्री सतिष लध्दड द्वारा दाखल केलेली सर्व कागदपत्रे दिनांक १२.२.०९ ला श्री सतिष लध्दड द्वारा दाखल केलेली तक्रार मध्ये दिनांक १८.३.०९ ला श्री सतिश लध्दड यांनी बयान सोबत जोडलेले सर्व संबंधीत कागदपत्र. श्री सतिश लध्दड द्वारा घेतलेली अग्रीम जमानत व संबंधीत हाजरीचे विवरण, अशी माहिती मागितलेली असून सदरची माहिती व्यक्तीश: आवश्यक आहे असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २१.७.०९ रोजी ११२/- रुपये माहितीचा

(पान २ वर..)

खर्चाचा भरना करावा असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी रुपये ११२/-त्याच दिवशी भरलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक २२.७.२००९ रोजी ५४ पृष्टये अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २६.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १०.९.२००९ रोजी दिलेला असून अपीलकर्ता यांचे अपील मान्य केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना मागितलेली माहिती ही त्यांना वेळेचे आंत दिलेली असून अपीलकर्ता यांनी मुद्या क्रमांक २,३ व ४ हे नवीन मुद्ये उपस्थित केलेले असल्यामुळे त्याबाबतची माहिती मिळण्याकरीता जन माहिती अधिकारी यांचेकडे नवीन अर्ज दाखल करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. तसेच जन माहिती अधिकारी यांनी निशुल्क माहिती पुरवावी. माहिती उपलब्ध नसल्यास तसे कळवावे अशा सूचना देवून अपील निकाली काढण्यात आले. त्यामुळेही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना जे माहितीचे पृष्ठे मिळालेली आहेत ती त्यांना आवश्यक नाही असे देण्यात आलेले आहेत. श्री सतीष लध्दड यांचे संदर्भात पोलीस स्टेशनमध्ये हजेरी ठेवण्यात आलेली आलेली आहे. परंतु त्याबध्दलीची माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दोनही केसमध्ये संपूर्ण माहिती कागदपत्राच्या स्वरुपात देण्यात आलेली आहे. परंतु, सतीष लध्दड यांच्या संदर्भात मागितलेल्या हजेरीच्या संदर्भात मात्र माहिती देण्यात आलेली नाही कारण त्या संपूर्ण हजेरी पुस्तकामध्ये प्रत्येक मिनिटाला नवीन नोंद होत असते व त्यात इतरही संपूर्ण आरोपी/गुन्हेगार यांची माहिती आहे. त्यामुळे त्या संपूर्ण रजिस्टरची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांनी संपूर्ण हजेरी रजिस्टरची पाहाणी करुन श्री सतीष लध्दड यांना दिलेल्या आदेशाप्रमाणे त्यांची हजेरी होत आहे किंवा नाही हे तपासावे व ज्यावेळेस हजेरी नसेल त्यावेळेस ती कां नाही याबध्दलचे आदेश पोलीस अधिका-यांनी पारित केलेले असेल तर उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. तसे श्री सतिष लध्दड यांनी अनुपस्थित राहाण्याकरीता अर्ज केलेला

( पान ३ वर..)

असेल तर त्या अर्जाच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याहीपेक्षे अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१०.२००९ रोजी संपूर्ण नस्तीचे निरीक्षण करुन आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन घेण्याची तयारी दर्शविली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६.१०.०९ रोजी हा निर्णय मिळाला नाही तरी सहाय्यक पोलीस आयुक्त यांचे कार्यालयात निरीक्षण देणे आवश्यक राहील. तसेही तोंडी आदेश अपीलार्थी व उत्तरवादी यांना देण्यात आलेले आहेत. त्याकरीत अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना श्री सतिष लध्दड यांचे हजेरीच्या संदर्भात हजेरी पुस्तक निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावे व त्यात हजेरी नसल्याच्या संदर्भात सुट देण्यात आलेली असल्यास त्या आदेशाच्या प्रती किंवा अर्जाच्या प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात..

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८५८/२००९**

**१) श्री बल्लभदास दीपचंदजी डांगरा(माहेश्वरी)**
**एल.आय.जी.क्वार्टर नं.एल-३०(५०),**
**विदर्भ हाऊसिंग बोर्ड कॅालोनी, शांतीनगर, नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा), नागपूर.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा**
**नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा), नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.९.०९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११..५.०९ रोजी जन माहिती अधिकारी, नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ(म्हाडा), नागपूर यांचेकडे एकुण १३ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १५.६.२००९ रोजी (दिनांक ११.५.०९ चा अर्ज दिनांक १५.५.०९ रोजी प्राप्त झाला असे गृहित धरुन), आपण दुकान क्रं.९(२२ दुकाने) शांतीनगर, नागपूर या दुकानाची नस्तीमधील कागदपत्रांची मागणी केलेली आहे. आपला अर्ज हा विहित नमुन्यात नसून पत्र स्वरुपाचे आहे. आपणांस नेमक्या कोणत्या प्रती हव्या आहेत. याकरीता नस्तीची पाहाणी करुन त्यानुसार प्रती पेज रु.२/- प्रमाणे रक्कमेचा भरणा केल्यास उपलब्ध रेकॉर्डनुसार कागदपत्रे पुरविणे शक्य होईल, असे मिळकत व्यवस्थापक यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक २०.८.०९ रोजी दिनांक १०.६.०९ चा अर्जाचा संदर्भ देवून नस्तीतील उपलब्ध कागदपत्रे आपल्या पत्रानुसार छायांकित प्रती एकुण १७ झेरॅाक्स प्रती पाठविलेल्या दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.६.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २३.७.०९ रोजी देण्यात आलेला आहे. त्यात दिनांक २९.६.०९ रोजी सादर केलेल्या माहितीच्या अधिकाराच्या अर्जाचे संदर्भात सुनावणी दिनांक १०.६.०९ रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी माहिती अधिकारी श्री अनिल अंकलगी, कार्यकारी अभियंता-१ व श्रीमती कंगाले, मिळकत व्यवस्थापक हजर होते. माहिती अधिकारी यांनी दिनांक ११.५.०९ नुसार अर्जाप्रमाणे माहिती दिनांक १६.७.०९ पर्यंत न चुकता द्यावी असे आदेश देण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु तरीही

( पान २ वर ..)

अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, जी माहिती मिळाली आहे ती जाणून बुजून अर्धवट व दिशाभूल करणारी माहिती देणा-या अधिका-यांवर नियमानुसार दंडात्मक कार्यवाही व्हावी, अशी विनंती केलेली आहे. वास्तविक अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ४.४.०९ च्या अर्जाप्रमाणे गाळा क्रं. आय २०० च्या बाजूला असलेली मोकळी जागेच्या संदर्भामध्ये ती जागा सपाट करुन पाहिजे आहे. त्यावर कचरा व डासांची उत्पत्ती होते, अशी त्यांची तक्रार आहे. त्यामुळे माहिती मागितलेली दिसून येते. परंतु त्याबाबतही दिनांक ८.४.०९ रोजी मोका तपासणीचा अहवाल त्यांना दिलेला आहे. अपीलकर्ता यांना दिनांक २०.८.०९ रोजी नोंदणीकृत डाकेने माहिती पाठविली व ती त्यांना दिनांक २८.९.०९ रोजी मिळाली आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांची तक्रार ही अपूर्ण माहिती दिल्याबध्दल असल्यामुळे व माहिती मुद्येनिहाय दिलेली नसल्यामुळे ती तपासणी शक्य होत नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांना मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन देणे किंवा माहिती उपलब्ध नसल्यास तसे कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना, जन माहिती अधिकारी यांनी माहिती, हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक ११.५.०९ च्या अर्जातील एकुण १३ मुद्यांच्या संदर्भात उपलब्ध असलेली कागदपत्रे किंवा नसल्यास त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी. कोणत्याही प्रकारचा अभिप्राय किंवा मत विचारले असल्यास ते उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८६०/२००९**

**१) श्री कैलास रामचंद्रराव श्रीरामे,**
**द्वारा श्री हिरामणजी वाघमारे,**
**३०, म्हाडा कॅालनी, बोरनाल्याजवळ, काटोल रोड,नागपूर-१३. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**सहधर्मदाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**सिव्हील लाईन, नागपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी,**
**सहधर्मदाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**सिव्हील लाईन, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक रोजी २९.९.२००९ राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.४.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, धर्मदाय सहआयुक्तांचे कार्यालय यांचेकडे, महेश विद्या प्रसारक शिक्षण संस्था नागपूर रजि.नं.एफ २५६६(एन) विषयी आवश्यक माहिती. कालावधी २००१ ते २००८ मधील माहिती एकुण ६ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १६.६.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १६.९.०९ रोजी झालेली असून अपील क्रं.८/०९ मध्ये आपण माहितीसाठी मागणी केलेला अभिलेख संस्थेकडून मागविण्याकरिता या कार्यालयातर्फे संस्थेच्या अध्यक्षास दिनांक २९.८.०९ रोजी कारणे दाखवा नोटीस पाठविले असता संस्थेच्या सचिवांकडून त्यास या कार्यालयास उत्तर प्राप्त झाले आहे, त्यात त्यांनी माहितीचा अधिकार या संस्थेस लागू होत नाही असे कळविले आहे, व तसे अपीलकर्ता यांना कळविले आहे. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, शिक्षण संस्था ही धर्मदाय आयुक्त

( पान २ वर..)

यांचेकडे पंजिबध्द झालेली असते व मुंबई विश्वस्त अधिनियमाप्रमाणे पंजीबध्द झालेल्या संस्थेस संपूर्ण माहिती ही धर्मदाय आयुक्त यांचेकडे देणे बंधनकारक असते. व त्यामुळे त्यांच्याकडून ही माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्या कार्यालयात पंजीबध्द झाल्याची माहिती असते परंतु संस्थेच्या नेहमीच्या सभा किंवा त्याबध्दलची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसते व तसी ती कोणतीही संस्था पाठवित नाही. त्याकरीता संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता संस्थेस दिनांक २९.८.०९ रोजी कारणे दाखवा नोटीस पाठविली होती. परंतु त्यावर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा संस्थेस लागू होत नाही असे उत्तर आलेले आहे. जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, संस्थेची शाळा आहे व शाळेस अनुदान आहे. ज्या संस्थेस शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही त्या संस्थेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मा. उच्च न्यायालय मुंबई, नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी दिलेला आहे. परंतु संस्थेची शाळा असल्यास शासनाकडून अनुदान मिळते. शाळा सुरु करण्यासाठी, धर्मदाय आयुक्त यांचेकडे संस्था पंजीबध्द असल्याशिवाय परवानगी मिळत नाही. व त्यामुळे शाळेस अनुदान याचा अर्थ संस्थेस अनुदान असा होतो. व त्यामुळे सदरच्या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (च) मध्ये 'माहिती' या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे. व त्यामध्ये सार्वजनिक प्राधिकरणास एखादया खाजगी निकायबाबत नियंत्रण असल्यास त्यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन घेवून ती माहिती अर्जदारास पुरवावी अशी तरतुद आहे. व त्यामुळे तशाही प्रकारे शिक्षण संस्थांनी धर्मदाय आयुक्त यांचेकडे माहिती देवून ती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

वास्तविक, ही बाब, प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांनी तपासून प्रथम अपीलात निर्णय देणे आवश्यक होते. परंतु याबाबत कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता किंवा अधिनियमाच्या तरतुदींची माहिती करुन न घेता संस्थेच्या सचिवाकडून मिळालेले उत्तर अपीलकर्ता यांना दिलेले आहे. तसेही मुंबई विश्वस्त अधिनियम, १९५० च्या तरतुदीप्रमाणे

(पान ३ वर..)

सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांचेकडे अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीपैकी ४ मुद्यांची माहिती निश्चितच उपलब्ध असणे अपरिहार्य आहे व तशी संस्था सादर करीत नसेल्यास संस्थेच्या विरुध्द विश्वस्त अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे हेही सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांचे कार्यकक्षेत आहे. व असे असताना फक्त पोस्टाचे काम करणे हा न्याय देण्याचा प्रकार नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी, सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांचे कार्यालय यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेवून ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी अन्यथा त्यांच्या अधिकारात संस्थेच्या विरुध्द योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना, जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांच्या दिनांक ३०.४.२००९ च्या अर्जाप्रमाणे संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेवून छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिकारी हे रुपये २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त)चे शास्तीस पात्र राहतील, याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८६३/२००९**
**अपील क्रमांक ८६४/२००९**

**१) श्री इन्द्रकुमार साधुराम लेहरवानी,**
**५-बी, जरीपटका, नागपूर-१४.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्य.)**
**जिल्हा परिषद, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव/प्राचार्य,**
**सिंधु एज्युकेशन सोसायटी, महात्मा गांधी सेंटिनियल सिंधु हायस्कुल,**
**जरीपटका, नागपूर-१४.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १६.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक ८६३/०९ मध्ये दिनांक २४.२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, श्री दिपक खुबचंद बजाज, सचिव, सिंधु एज्युकेशनल म.गां.से.सिंधु हायस्कुल जरीपटका नागपूर में स्कुल में जो बांधकाम हॉल व अन्य काम जारी है उसमें सोसायटी नियमानुसार पॅाच हजार रुपये के उपर अगर कोई काम किया जाता है तो निविदा टेंडर बुलाये जाते है व पेपरों में घोषणा देनी पडती है. से चल रहे बांधकामों की निविदा कौन कौन से अखबारों में दी गई व कब स्विकार किये गये व टेंडर कब खोले गये.. कृपया जानकारी देनेका. अशी माहिती मागितलेली दिसून येते. तसेच अपील क्रमांक ८६४/०९ मध्ये दिनांक ५.२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, महोदयजी महाराष्ट्र शासन द्वारा घोषित माहिती अधिकार अधिनियम २००५ के अंतर्गत स्कुल मे बोर्ड पर सूचित किया जाना चाहिये की इसके अन्तर्गत मुख्य अधिकारी कौन है. अगर समयानुसार जबाब नही देते है तो अपील सुनवाईका अधिकार किसे है. और अपील दर्ज करने का समय क्या है. कृपया जानकारी देनो का कष्ट करे. अशी माहिती व्यक्तीशः मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक २४.२.२००९ व दिनांक ५.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. दोनही प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.९.०९ रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित आहे. यापूर्वी माहिती दिलेली नाही. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना उददेशून अर्ज करावा व माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे आदेश दिलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता

(पान २ वर..)

यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल केलेली दिसून येतात.

३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, श्री दिपक बजाज व त्यांचे कुटूंबिय हेच प्राचार्य, सचिव व अध्यक्ष आहेत व त्यामुळेच त्यांनी माहितीची मागणी केलेली होती. परंतु अद्यापपर्यंत माहिती दिलेली नाही.

४. आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.१०.२००९ रोजी सुनावणीची नोटीस काढण्यात आलेली होती. परंतु जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य आज आयोगापुढे हजर झालेले नाही. यावरुन माहिती देण्यास टाळाटाळ करीता आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी संस्था व शाळा ही अनुदानित असल्यावर सुध्दा त्यांच्या विरुध्द कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. व निरर्थ असा प्रथम अपीलाचा निर्णय पारित केलेला आहे. व त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५,०००/-ची शास्ती लादणे आवश्यक झालेले आहे. परंतु शास्ती लादण्यापुर्वी त्यांचे म्हणणे ऐकुण घेणे बंधनकारक असल्यामुळे आयोगापुढे त्यांनी खुलासा करणे किंवा त्यांचे म्हणणे मांडणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे दोनही अपीले मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ८६३/०९ व अपील क्रमांक ८६४/०९ मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना, जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांच्या दिनांक २४.२.०९ च्या व दिनांक ५.२.०९ च्या अर्जाचे अनुषंगाने विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य तथा सचिव यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाचे अनुषंगाने ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे **रुपये २५,०००/- ची शास्ती** कां लादण्यात येवू नये याबध्दलचा खुलासा किंवा त्यांचे म्हणणे त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगापुढे सादर करावे. अन्यथा, रुपये २५,०००/- ची शास्ती कायम होईल व ती वसुल करण्याची जबाबदारी ही प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांची राहील, याची नोंद घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८६५/२००९**

**१) श्री बलीराम हरीचंद बसेने,**
**मु.पो.रतनारा, गोंदिया, ता.जि.गोंदिया.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.९.०९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.९.०९ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पुरवठा अधिकारी यांचेकडे, आपल्या कार्यालयातून दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची संपूर्ण फाईलची प्रत. मा. तहसिलदार साहेबाच्या अहवालासह व आदेशांसह मिळण्याबाबत. दिनांक १३.८.०८ चा अर्ज जिल्हाधिकारी साहेब गोंदिया. अशी माहिती व्यक्तीशः मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ८.६.०९ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे कार्यालय यांनी तक्रार अर्जातील प्रकरणावर आदेश होणे आहे. आदेश होताच आपण मागितलेली संपूर्ण कागदपत्रे व अहवाल उपलब्ध करुन देण्यात येईल. माहितीकरीता अग्रेषित, असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक २७.७.०० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक १४.८.०९ रोजी सुनावणी घेण्यात आली. व त्यावेळेस अपीलकर्ता यांना रुपये ३००/- भरना केल्यावर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे आदेश देण्यात आले. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी रुपये ३००/-चा भरना केलेला आहे. व त्यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व तशी त्यांनी पोच दिलेली आहे. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करुन माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली व अपीलीय अधिका-यांनी फी ची आकारणी केली असे कारण दिलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, दिनांक ७.७.०९ रोजी आदेश पारित झाला असल्यावर सुध्दा त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही व अपील मुदत संपत येत असल्यामुळे दिनांक २७.७.०९ रोजी त्यांनी प्रथम अपील दाखल केले आहे. व त्यानंतरच त्यांना रुपये ३००/- चा भरणा त्यांच्याकडून करुन घेण्यात आलेला आहे. त्यांनी लेखी निवेदनात सुध्दा

( पान २ वर ...)

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही. तरी ती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी अशी तरतुद असून सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी फी आकारणी केलेली आहे ती योग्य नाही व त्यामुळे त्यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी केलेल्या तक्रारीची चौकशी झालेली नव्हती व त्यामुळे ३० दिवसांचे आंत त्यांना त्याबाबत कळविण्यात आलेले आहे. व त्यातही आदेश होताच आपण मागणी केलेली संपूर्ण कागदपत्रे व अहवाल उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले आहे. त्यानुसार दिनांक २०.७.०९ रोजीच म्हणजेच प्रथम अपील दाखल करण्यापुर्वीच अपीलकर्ता यांना दिनांक ७.७.०९ रोजी, आदेश पारित करण्यात आले आहे व वरील मागणी केलेली माहिती करीता प्रती पृष्ठ रुपये २/-भरना शासन जमा केल्याची पावती या कार्यालयास सादर केल्यास वरील दोनही प्रकरणात अर्जात नमुद केल्याप्रमाणे माहिती आपणास व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात येईल असे युपीसीने कळविलेले आहे ते आयोगाचे निदर्शनास आणले. यावरुन अपीलकर्ता यांच्या प्रथम अपील दाखल करण्यापुर्वीच जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ८.६.०९ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी कार्यवाही केलेली आहे. तक्रारीची कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन देणे हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. व त्यामुळे दिनांक ८.६.०९ चे उत्तर हे विहित मुदतीत असल्यामुळे कोणत्याही प्रकारची शास्ती लादण्याची आवश्यकता नाही. मात्र तक्रारीची चौकशी झाल्यानंतर व प्रथम अपीलाच्या पुर्वीच दिनांक २०.७.०९ रोजी पत्र दिलेले असल्यामुळे माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असे म्हणता येत नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८६१/२००९**

**१) श्री ईश्वर गणपतराव सतई,**
**६४, एम.आय.जी.२/८, हिवरी नगर,**
**भंडारा रोड, नागपूर-८.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तथा उप आयुक्त(महसुल८**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सु-नावणी आज दिनांक १६.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे खुलासा दाखल करण्यात आला आहे. प्रथम अपीलय अधिकारी यांचे तर्फे कागदपत्र दाखल केलेली आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१२.२००८ रोजी श्री सी.एस. डहाळकर, अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे, प.ह.न.१७ मौजा मकरधोकडा येथील शेत सर्व्हे ४७३ मधून रस्त्याबाबत गैरअर्जदार सा.गो.दळवी यांनी विभागीय लोकशाही दिन टोकन क्रं.७३१ नुसार कार्यवाही करण्याचे आदेश दिल्यावरुन एस.डी.एम.उमरेड यांनी सविस्तर चौकशी करुन आदेश पारित केला असून मोजणी नकाशावर तशाप्रकारे उल्लेख आहे वगैरे.. संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. माहिती संबंधीत कालावधी दिनांक ४..११.०८ देण्यात आलेला दिसून येतो. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.१.०९ रोजी अपीलकर्ता यांना सदर प्रकरण न्यायालयीन आहे. प्रकरणात दिनांक ४.११.०८ रोजी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये उपलब्ध कागदपत्रांची तपासणी, तसेच दोनही पक्षांना सुनावणीची संधी देवून योग्य आदेश पारित झालेले आहे. पारित आदेशा विरुध्द सक्षम अधिका-यांकडे दाद मागावी. तसेच सोबत पारित आदेशाची छायांकित प्रत जोडण्यात आलेली आहे, असे कळविलेले दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी दिनांक ३.८.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. परंतु दिनांक ९.२.०९ रोजी पुन्हा अपीलकर्ता यांना दिनांक ४.११.०८ रोजीच्या आदेशाविरुध्द अपील दाखल करण्याच्या संदर्भामध्ये मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९९६६ च्या तरतुदीनुसार विहित मुदतीत रितसर अपील दाखल करु शकतात असे कळविण्यात आलेले आहे. त्यावर दिनांक २०.२.०९ रोजी दिनांक ४.११.०८ च्या आदेशाची प्रत पाठविण्यात आलेली नाही कारण प्रकरण क्रं. ३०/बीएनडी/५६/०७-०८ रेकार्ड रुम मध्ये जमा असल्यामुळे आदेशाची प्रत पाठविली नसल्याचे

( पान २ वर..)

निष्पन्न झाले. त्यामुळे मला मुदतीत अपील सादर करता येणार असा आक्षेप घेणारे पत्र अतिरिक्त जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यात आलेले आहे. त्यानंतर पुन्हा दिनांक ३१.७.०९ रोजी अपीलकर्ता यांच्या दिनांक २०.७.०९ च्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३.४.९२ चे परिपत्रकाची छायांकित प्रत प्रपत्र अ, ब मे,१९९२ चे जिल्हाधिकारी, नागपूर यांचे आदेशाची प्रत दिनांक २२ जुलै,८६ च्या पत्राची छायांकित प्रत उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झ ाल्यामुळे त्यांनी दिनांक ३०.९.०९ रोजी राज्य माहिती आयोगाडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांच्या दिनांक २९.१२.०८ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. अपीलकर्ता यांच्या दिनांक २९.१२.०८ च्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांना त्यांच्या प्रकरणामध्ये दिनांक ४.११.०८ ला महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ प्रमाणे पारित झालेल्या आदेशाची माहिती आहे. परंतु त्या आदेशाच्या विरुध्द अपील दाखल न करता त्या आदेशातील निष्कर्षाच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी काही प्रश्न उपस्थित केलेले दिसून येतात. परंतु ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीमध्ये येत नाही. जी माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध असते ती जशीच्या तशी उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. कोणत्याही निर्णयामध्ये तो निर्णय कशा प्रकारे घेण्यात आला किंवा कां घेण्यात आला, असे प्रश्न उपस्थित करता येत नाही. व त्या त्या अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे योग्य त्या कार्यपध्दतीचे पालन करणे हे आवश्यक असते. दिनांक ७.२.०९ रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ च्या तरतुदी प्रमाणे अपील हे विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे दाखल न करता माहितीच्या अधिकारात माहिती मागितलेली आहे व वर नमुद केल्याप्रमाणे अशा प्रकारची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी नंतर जी कागदपत्राची मागणी केलेली आहे ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८७५/२००९**

**१) श्री दादाजी महादेव राऊत,**
**मु.पो.कोंढाळा ता. वडसा, जिल्हा गडचिरोली.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी,**
**पंचायत समिती देसाईगंज(वडसा), जिल्हा गडचिरोली.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्राम पंचायत कार्यालय, कोंढाळा, ता.देसाईगंज(वडसा)**
**जिल्हा गडचिरोली.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.८.०९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीचे वेळी आयोगासमोर सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती, दिनांक २०.११.०९ पुर्वी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यास ते तयार आहे. तसेच सदर बाब अपीलकर्ता यांनी सुध्दा आयोगापुढे मान्य केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे कबूल केल्याप्रमाणे दिनांक २०.११.०९ पुर्वी अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जात मागितलेली संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे योग्य राहील. सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २९.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८९१/२००९**
**अपील क्रमांक ८९२/२००९**

**१) श्री झियाउद्यीन फिरोज घुलाम मोहीउद्यीन,**
**किडवाई मैदानजवळ, लष्करी बाग, नागपूर-१७.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता(बांधकाम विभाग),**
**जिल्हा परिषद, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक ८९१/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २०.५.०९ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे "Why, you are Tempered and changed, the verdict of the Court order, passed by the Hon'ble IIIrd Labour Court in Comp.ULP/No.३१७/०३ Dt. १०.१०.२००५ in favour of Shri Ziauddin Firoz and iisued a Fresh appointment order as there is no such power to appoint C.R.T.E. Labour bay C.E.O., Z.P.Nagpur. Information in respect of C.E.O. Z.P. Nagpurs order No.जिपना/बांध/का.१(६)/६१५५/०५ Dt. १९.१२.०५ referred as per Court order passed by the Hon'ble IIIrd Labour Court at Nagpur in Comp.ULP No.३१७/०३ Dt. १०.१०.०५." सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.६.०९ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २२.६.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ११.८.०९ रोजी देण्यात आला असून माहिती विहित कालावधीत उपलब्ध करुन दिलेली आहे. तृतीय कामगार न्यायालय नागपूर यांनी दिनांक १०.१०.०५ ला पारित केलेल्य आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे प्रकरण दाखल करण्यात आलेले असून सध्या प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार अर्जदारास विभागाकडून झालेल्या कार्यवाहीची माहिती द्यावयाची आहे. माहितीच्या अधिकारात विभागाने एखादया प्रकरणात काय कार्यवाही करावी असे अभिप्रेत नाही. अपीलकर्ता यांना विहित कालावधीमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे तसेच प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे, तसेच माहिती अर्जात, अर्जदाराने नमुद

**( पान २ वर ..)**

केलेले मुद्ये माहितीचा अधिकाराचा कार्यकक्ष्‍ेबाहेरचे असल्याने अपीलकर्ता अर्जदाराचे अपील खारीज करण्यात येत आहे, असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. आयोगापुढे युक्तीवाद करताना अपीलकर्ता व त्यांचे मित्र यांनी असे सांगितले की,कोर्टाचा आदेश बाजूला कां करण्यात आला व नवीन नियुक्तीचा आदेश कां देण्यात आला वगैरे..असे सांगितले. तसेच बॅक वेजेस देण्यात यावे व रिइनस्टेट करावे अशी मागणी केलेली आहे, अशा प्रकारचा युक्तीवाद मा. उच्च न्यायालयाचा निर्णय वाचून केला. परंतु अपीलकर्ता यांनी उपस्थित केलेले मुद्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे नाही. व त्यामुळे ते विचारात घेता येत नाही. कोणत्याही प्रकरणातील कारण किंवा एखादया प्रकरणात कार्यवाही ही मागता येत नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे आयोगापुढे खुलासा सादर केलेला आहे.

खुलासाः उपरोक्त संदर्भांकित पत्राचे अनुषंगाने माहितीचा अधिकार अधिनियम ००५ अन्वये अपील क्रमांक ८९१/०९ नुसार द्वितीय अपीलासंबंधात खालीलप्रमाणे विभागाचा अभिप्राय आपणास सविनय सादर करण्यात येत आहे.

श्री झियाउद्यीन फिरोज गुलाम मोहीरुद्यीन हे जिल्हा परिषद बांधकाम उपविभागात दिनांक ३१.३.१९८० रोजी हजेरीपटावर मजूर या पदावर नियुक्त करण्यात आले. त्यांची ५ वर्ष सतत सेवा पुर्ण झाल्यामुळे त्यांना शासन आदेश क्रमांक काव्यआ-१०८६/सीआर १३१७/१६ दिनांक ९.७.८६ नुसार दिनांक १.४.१९८५ पासून रुपांतरीत नियमित अस्थायी आस्थापनेवर घेण्यात आले. व हजेरीपटावरील नाव कमी करण्यात आले. श्री झियाउद्यीन फिरोज यांचे विरुध्द सतत अनाधिकृतपणे गैरहजर राहण्याबाबत विभागीय चौकशी करुन त्यांना मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांचे आदेश क्रमांक २८२७/०३, २९.७.०३ अन्वये दिनांक १.१२.१९९० पासून अनाधिकृतपणे गैरहजर ठरवून त्यांना जिल्हा परिषद, नागपूरच्या सेवेतून कमी करण्यात येवून दिनांक १.१२.१९९० पासूनचा अनाधिकृत गैरहजरच्या कालावधी अकार्यदिन करण्यात आला. या निर्णयाचे विरोधात अपीलकर्ता अर्जदार यांना मा. तृतीय कामगार नयायालय प्रकरण क्रमांक ३१७/०३ दाखल केले. मा. मा. न्यायालयाचे दिनांक १०.१०.२००५ चा आदेशाचा आदर राखून अपीलार्थी यांना रुपांतरीत नियमित अस्थायी आस्थापनेवर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे आदेश क्रमांक /जिपना/बांध./का.१(६)/६१५५/०५ दिंक १९.१२.२००५ अन्वये पुर्नस्थापित करण्यात आले. श्री झि ायाउद्यीन फिरोज हे दिनांक २०.१२.२००५ ला कामावर रुजू झाल्यापासून त्यांना नियमित वेतन देण्यात येत आहे. मा.तृतीय कामगार न्यायालयात प्रकरण क्रमांक यु.एल.पी.३१७/०३ चे दिनांक १०.१०.२००५ चे पारीत आदेशाविरोधात जिल्हा परिषद नागपूरने औद्योगिक न्यायालयात प्रकरण क्रमांक युएलपी ९२/०६ दाखल कले. औद्योगिक न्यायालयात जिल्हा परिषद नागपुरनी मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर येथे डब्ल्यु.पी.२५५/०७ ला अपील दाखल केलेले आहे. मा. उच्च न्यायालयाने श्री झियाउद्यीन फिरोज यांना दिनांक ३१.७.२००७ चे पारीत अंतरीत आदेशान्वये थकबाकी देण्यास स्थगती दिलेली आहे. त्यामुळे श्री झियाउद्यीन फिरोज यांना दिनांक १.८.१९९० ते दि. १९.१२.२००५ पर्यंतच्या अनाधिकृत गैरहजेरीचा कालावधीचे वेतन देण्यात आलेले नाही. मा. उच्च न्यायालयाचे अंतिम आदेशानुसार पुढे कार्यवाही करण्यात येईल.

**( पान ३ वर ..)**

सदर बाब श्री झियाउद्दीन फिरोज यांना ज्ञात आहे. सन १९९० ते २००५ या सतत गैरहजेरीचा कालावधीचे वेतनाची थकबाकी देण्याबाबत मा. उच्च न्यायालयात प्रकरण क्रमांक २५५/०७६मधील अंतरिम आदेशानुसार स्थगिती देण्यात आलेली आहे. श्री झियाउद्दीन फिरोज सिआरटी मजूर यांनी माहितीचे अधिकार अधिनियम २००५ नुसार विभागाकडे खालीलप्रमाणे प्रथम अपील आजपावेतो सादर केलेली आहे.

१. प्रथम अपील दिनांक २३.२.२००६
२. प्रथम अपील दिनांक १३.९.२००६
३. प्रथम अपील दिनांक १६.४.२००७
४. प्रथम अपील दिनांक २६.४.२००७
५. प्रथम अपील दिनांक १५.५.२००७
६. प्रथम अपील दिनांक २०.५.२००९
७. प्रथम अपील दिनांक २२.६.२००९

तसेच श्री झियाउद्दीन फिरोज सिआरटी मजूर यांनी माहितीचे अधिकार अधिनियम २००५, नुसार मा.राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांचेकडे खालीलप्रमाणे द्वितीय अपील सादर केलेले आहे.

१. द्वितीय अपील क्रमांक २००६/४१२/०२ सुनावणी दिनांक २२.९.२००६
१. द्वितीय अपील क्रमांक २००६/५३/०७ सुनावणी दिनांक ४.१०.२००७
१. द्वितीय अपील क्रमांक २००६/१६६७/०७ सुनावणी दिनांक २२.९.२००७
१. द्वितीय अपील क्रमांक २००६/१६६८/०७ सुनावणी दिनांक २२.९.२००७
१. द्वितीय अपील क्रमांक २००६/१६६९/०७ सुनावणी दिनांक २२.९.२००७
१. द्वितीय अपील क्रमांक २००६/८११/०७ सुनावणी दिनांक २२.९.२००९

अपीलकर्ता अर्जदार यांनी माहितीचे अधिकारात दिनांक २२.७.२००९ अन्वये सादर केलेल्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २२.७.२००९ अन्वये अपील क्रमांक २२/०९ नुसार घेण्यात आली व सुनावणीचा निर्णय व आदेश पत्र क्रमांक ४५१०/०९ दिनांक ११.८.२००९ अन्वये निर्गमित करण्यात आला. जिल्हा परिषद बांधकाम विभाग हे ग्रामिण विकासाचे विविध बांधकामांची विकास कामे करणारी यंत्रणा आहे. अपीलकर्ता अर्जदार हे बांधकाम विभागात सिआरटी कामगार आहेत. अपीलकर्ता अर्जदारांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा अतिवापर करुन विभागाचा बराच कालावधी घेतल्याचे वरील प्रकरणावरुन सिध्द होते असे वाटते. अपीलकर्ता अर्जदार यांचे मा. तृतीय कामगार न्यायालयात प्रकरण क्रमांक यु.एल.पी. ३१७/०३ चे दिनांक १०.१०.२००५ चे पारीत आदेशाविरोधात मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर येथे डब्ल्यु.पी.२५५/०७ मधील अंतरिम आदेशानुसार सन १९९० ते २००५ या सतत गैरहजेरीचा कालावधीचे वेतनाची थकबाकी देणेकरीता अंतरीम आदेशानुसार स्थगिती देण्यात आलेली आहे. सबब, श्री झियाउद्दीन फिरोज सिआरटी मजूर यांची द्वितीय अपील क्रमांक ८९१/०९ खारीज करण्यात यावी, ही विनंती.

वरील खुलाशावरुन अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

अपील क्रमांक ८९२/०९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ४.८.०९ रोजी जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता यांना order No. with date by which and whose order you

**(पान ४ वर ..)**

are stoped/withheld my salary (pay and allowances) from १.८.९० to २८.७.२००३. अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ११.८.०९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असून त्यात दिनांक २७.६.०७ रोजी केलेल्या माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती व आता मागितलेली माहिती ही सारखीच आहे. व त्यावेळेस देण्यात आलेली माहिती आता मागितलेल्या माहितीशी संलग्न समजण्यात यावी. तथा पुनश्च माहिती देण्यात येत आहे. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १०.८.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ११.८.०९ ला तीच माहिती पुन्हा देण्यात आलेली आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांना आतापर्यंत दिनांक ११.८.०९, १८.६.०८ व दिनांक १५.९.०९ इत्यादि पत्राद्वारे संपुर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु, अपीलकर्ता पुन्हा पुन्हा तशाच प्रकारची माहिती प्रकरण मा. उच्च न्यायालयात प्रलंबित असल्यावर सुध्दा मागण्याचा प्रयत्न करीत आहे. आता पर्यंत त्यांचे काही अपील मंजूर व काही अपील खारीज करण्यात आलेले आहे. तरीही पुन्हा पुन्हा तीच माहिती मागत असल्यामुळे हा माहितीच्या अधिकारातील तरतुदींचा गैरवापर आहे व अशा प्रकारे गैरवापर करण्यामुळे जे खरोखर माहितीच्या अधिकारात अपील करतात त्यांचे अपील विलंबाने सुनावणीस लागतात. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ८९१/०९ व अपील क्रमांक ८९२/०९ खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८८८/२००९**

**१) श्री नागोराव लक्ष्मणराव सावरकर,**
**महासचिव, जन समस्या निवारण संघर्ष समिती, नागपूर**
**३९ देवतळे ले आऊट, अंबाझरी उद्यानाजवळ,**
**नागपूर-३३.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त उपायुक्त,**
**(सा.प्र.विभाग) नागपूर महानगरपालिका, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त,**
**(सा.प्र.विभाग) महानगरपालिका, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१०.०९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे एकुण २७ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी दिनांक ११.८.०८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २६.८.०९ रोजी देण्यात आला असून, संपूर्ण माहिती सर्व संबंधीत विभागाकडून गोळा करुन ८ दिवसांचे आंत निशुल्क देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक ५.९.०९ रोजी अपीलकर्ता यांना एकुण २७ मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितली आहे त्या माहितीच्या संदर्भात मोघम उत्तर देण्यात आलेले आहे व माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहे, ते निरनिराळया विभागाशी संबंधीत आहे. अपीलकर्ता यांनी अर्ज सामान्य प्रशासन विभागाकडे केलेला असून त्यांनी विचारलेल्या मुद्यांचे अवलोकन केले असता ते महानगरपालिकेतील ब-याच विभागाशी संबंधीत दिसून येते. वास्तविक अधिनियमाचे कलम ५ प्रमाणे कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये उपविभागाकरीता जन माहिती अधिकारी नियुक्त करण्याची तरतुद आहे.

**( पान २ वर ..)**

व त्याप्रमाणे निरनिराळया उपविभागाकरीता महानगरपालिकेमध्ये जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. जेणेकरुन ३० दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध होऊ शकेले. परंतु एका विभागाच्या माहिती अधिका-यांकडे सर्व माहिती मागितल्यास ती उपलब्ध होऊ शकत नाही व ती अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नाही. परंतु अपीलकर्ता यांनी मात्र एकाच माहिती अधिका-याकडे अर्ज करुन अनेक उपविभागाची माहिती मागितलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, मागितलेली माहिती ही अधिनियमाचे कलम २ (च) मधील व्याख्येत येत नाही. वर्तमान पत्राच्या बातम्याचा आधारे व मोघम व व्यापक प्रमाणात माहिती मागितलेली आहे. तसेच काही मुद्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय येईल असे प्रश्न विचारलेले आहे. परंतु ज्याप्रमाणे अधिनियमाच्या तरतुदी सार्वजनिक प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचारी यांना लागू आहेत त्याचप्रमाणे त्या अर्जदारास सुध्दा लागू असतात व त्यामुळे माहिती मागताना ती ज्या कार्यालयात कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच कार्यालयात माहितीचे निश्चित वर्णन करुन मागणे आवश्यक आहे. अर्जदारास निश्चित माहिती नसेल तर त्याकरीता सुध्दा माहितीच्या अधिकारात माहिती या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्या व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणातील नस्तींची पाहाणी करणे व त्यातून आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रती उपलब्ध करुन घेणे हा एक मार्ग आहे. मोघम माहिती विचारल्यावर तशा प्रकारची माहिती काढून द्यावी असे अपेक्षित नाही. परंतु कोणत्याही प्रकारची माहिती तयार करुन देणे हे सुध्दा अपेक्षित नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना जर निश्चित माहिती हवी असेल तर त्यांनी संबंधीत नस्तींचे निरीक्षण करुन त्यातून कागदपत्राच्या छायांकित प्रतीचे स्वरुपात माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. मात्र कोणत्याही प्रकारची अधांतरी विचारलेल्या प्रश्नांची माहिती अपेक्षित नाही. सार्वजनिक प्राधिकरणाकडून कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन घेतल्यानंतर त्या प्रकरणातील निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये गैर प्रकार झालेला असल्यास त्यासंदर्भात योग्य त्या अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे योगय त्या सक्षम अधिका-यांकडे तक्रार करणे अशा प्रकारची कार्यपध्दती आहे. माहितीच्या अधिकारात कोणत्याही प्रकारची कार्यवाही करुन मागता येत नाही. आज आयोगापुढे अपीलार्थीने दाखल केलेल्या ३ मुद्यांच्या संदर्भात कोणत्याही प्रकारे माहितीच्या संदर्भात वर्णन केलेले नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेली माहिती उपलब्ध करुन घ्यावयाची असल्यास संबंधीत नस्तींचे निरीक्षण करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना सार्वजनिक प्राधिकरणातील ज्या विभागातील माहिती अपेक्षित आहे त्या विभागाच्या जन माहिती अधिकारी यांचेकडे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत तारीख कळवून व माहितीचे निश्चित वर्णन

(पान ३ वर..)

करुन त्यासंदर्भातील नस्तींचे निरीक्षण करुन आवश्यक असतील त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्या.

२) संबंधीत विभागाचे जन माहिती अधिकारी यांचेकडे अपीलकर्ता यांनी कामकाजाच्या दिवशीच्या कार्यालयीन वेळ व तारीख कळविल्यास व त्या तारखेस ते उपस्थित राहील्यास व माहितीचे निश्चित वर्णन केल्यास त्या विषयाशी संबंधीत नस्त्या त्यांना निरीक्षणाकरीता उपलबध करुन देण्यात याव्या. व त्यांना आवश्यक असतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्या.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८९०/२००९**

**१) श्री शरद लक्ष्मणराव कुलकर्णी**
**द्वारा गिरीश एल.कुलकर्णी, ब्लॉक नं.ई/५, एनआयटी हाऊसिंग कॅाम्लेक्स,**
**व्यंकटेश नगर जवळ, नंदनवन, नागपूर-४४०००९.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**नझुल विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.०९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक१७.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, तहसिलदार नझुल कार्यालय, नागपूर यांचेकडे, However please provide the information regarding of १st time/initial awarding the lease of land. (not for renewal of lease of land, since it is already provided vide your reply letter dt. १७.१०.०८) The iformation provided against my application dt. ४.११.०८ to Appellate Inquiry Officer, PIO Nazul. माहिती मागितलेली दिसून येते.

सदरच्या अर्जाप्रमाणे अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.६.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु दिनांक १८.६.०९ च्या प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अर्जातील माहिती नझुल लीज बाबत असल्यामुळे सदर अर्ज नझुल तहसिलदार यांनी या कार्यालयात दिनांक २१.११.०८ रोजी पाठविलेला आहे. अर्जातील माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने व यापुर्वीच त्यांनी दिनांक २२.४.२००८ ला अशाच प्रकारची प्रश्नार्थक माहिती माहितीच्या अधिकारात हया कार्यालयास मागितलेली होती. ती माहिती त्यांना दिनांक १७.१०.०८ रोजी देण्यात आलेली आहे. व त्याच प्रकारची माहिती पुन्हा मागितलेली आहे. त्यांचे अर्ज १ ते ८ सोबत जोडलेले आहे. त्यामध्ये प्रश्नार्थक माहिती मागितलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे सुध्दा प्रथम अपील दाखल केलेले नाही. अतिरिक्त जिल्हाधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले नाही असे त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, माहितीचे निश्चित

**( पान २ वर..)**

वर्णन केलेले नाही व त्यात जन माहिती अधिकारी यांचा अभिप्राय येतील अशी माहिती मागितलेली दिसून येते, जी अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांना निश्चित कोणत्या लिजच्या संदर्भात माहिती पाहिजे आहे ते सांगितल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ते निश्चित अशी माहिती विचारत नाही. त्यावर अपीलकर्ता यांना ज्या बिल्डींग लिजवर दिलेल्या आहेत त्याकरीता सर्वसाधारण अटी व शर्ती असल्यास त्या अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना ,जन माहिती अधिकारी यांनी, हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत नागपूर शहरातील लिजवर दिलेल्या मालमत्तेच्या संदर्भातील अटी व शर्तीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या. विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८८६/२००९**
**अपील क्रमांक ८६७/२००९**

**१) श्री तिलोकचंद सुगनचंद सिंघवी,**
**मु.पो.मंगरुळ, ता. समुद्रपूर, जिल्हा वर्धा. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (सं.व सु.विभाग)**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.हिंगणघाट,**
**ता.हिंगणघाट, जिल्हा वर्धा. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.हिंगणघाट,**
**ता.हिंगणघाट, जिल्हा वर्धा. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ३०.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक ८८६/०९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २२.७.०९ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, ग्रामीण उपविभाग समुद्रपूर, वि.वि.कं.मर्या.समुद्रपूर यांचेकडे ग्रा.क्रं. ३९७७६००००९११ (३९७७६००००९११) C.P.L. देण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.८.०९ रोजी अपीलकर्ता यांना सी.पी.एल. जानेवारी, ०५ ते जून, २००९ पर्यंत या पत्रात जोडले आहे. विजेचे बिल या कार्यालयात निघत नसल्यामुळे या कार्यालयामधून देता येणार नाही, असे सहाय्यक अभियंता यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात अपीलकर्ता यांना दिनांक ३.१०.०९ रोजी सविस्तर तपशिलात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना अपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, संगणकीकरण झाल्यानंतर संपुर्ण डाटा हा संगणकात साठवून ठेवण्यात येतो व त्यातून विजेचे बिल तयार करण्यात येतात. परंतु काही तांत्रिक कारणामुळे पाच महिन्याच्या कालावधीतल संगणकातील सी.एल.पी.ची

**(पान २ वर ..)**

माहिती देता येत नाही. त्याचप्रमाणे १९८९ पासूनची माहिती मागितलेली असल्यामुळे ती सुध्दा आता उपलब्ध होऊ शकत नाही. तसेच संगणकातून बिल देण्यात येत असल्यामुळे दूसरी प्रत तांत्रिक कारणामुळे निघणे शक्य नाही. त्यामुळे जी माहिती उपलब्ध आहे ती अपीलकर्ता यांना दिलेली आहे. व जे सि.पी.एल. उपलब्ध करुन दिलेले आहे ते सी.एल.पी. मधून त्यांना बिलाच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन घेता येईल. तसेच सन ८९ पासूनचे सि.एल.पी. ची डुप्लीकेट देयके यात कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक हित दिसून येत नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी पोस्टाने माहिती मागितली होती परंतु अपीलकर्ता यांना ती घरी हस्तबटवाडयाने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब होऊ शकतो कारण ते ३ कि.मी. अंतरावर जंगलात एकटेच राहातात. त्यामुळे हस्तबटवाडयाने त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक ८८७/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २२.७.०९ रोजी ग्रा.क्रं.३९७७६००००७७६ सी.पी.एल.बाबत विजेचे बिल देण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. त्या संदर्भात दिनांक १७.८.०९ रोजी अपीलकर्ता यांना सी.पी.एल.मे २००० ते जून २००९ पर्यंत दिलेले आहे. विजेचे बिल या कार्यालयातून निघत नसल्यामुळे देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक ३.१०.०९ रोजी संपूर्ण वस्तुस्थिती व माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

**खुलासा:** वरील विषयाचे अनुशंगाने सविनय सादर करण्यात येते की, मे.चंद्रा स्टोन वर्क रा. मंगरुळ ता. समुद्रपूर तर्फे श्री त्रिलोकचंद सुगनचंद सिंघवी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये ग्राहक क्रं. ३९७७६००००७७६ बध्दल अर्ज म.रा.वि.वि.कं.मर्या.उपविभाग समुद्रपूर येथे अर्ज सादर केला. अर्जा मध्ये २७.३.२००० ते जुलै २००९ पर्यंतचे सि.पी.एल व याच कालामधील विजेचे साक्षंकित बिल मिळण्या बाबत नमुद केले होते. त्यानुसार पत्र क्रं.सब/सुपर/महसुल/१०६४/दिनांक १७.८.२००९ नुसार मागितलेली माहिती देण्यात आली आहे. ग्राह क्रं. ३९७७६००००७७६ दिनांक २७.३.२००० रोजी नवीन विज पुरवठा स्टोन क्रशनसाठी देण्यात आला. त्यानुसार प्रथम विज देयक आवश्यक नवीन विज पुरवठयाचे दस्ताऐवज संबंधित कनिष्ठ अभियंता कडून प्राप्त झाल्यानंतर माहे मे, २००० मध्ये निर्गमित झाले. त्यामुळे सि.पी.एल माहे मे २००० पासून उपलब्ध असल्यामुळे ग्राहकास देण्यात आले आहे. माहे नोव्हेंबर, डिसेंबर, २००० व माहे फेब्रुवारी, मार्च एप्रिल, २००७ एकुण ५ महिन्याचे सि.पी.एल या कार्यालयास उपलब्ध नसल्यामुळे देण्यात आले नाही. दिनांक १७.८.२००९ रोजी माहे जुलै, २००९ चे सि.पी.एल. उपलब्ध नसल्यामुळे देण्यात आले नव्हते पण दिनांक १७.९.२००९ रोजी आय.टी.सेक्शन मधून उपलब्ध झाल्यामुळे ते साक्षांकित करुन दिले नाही. दिनांक २७.३.२००० ते जुलै, २००९ पर्यंतच्या विज देयकाची साक्षांकित प्रत सदर ग्राहकाचे मुळ विज देयक माहे मे २००० ते जुलै, २००७ पर्यंत ग्राहकास वितरीत करण्यात आले आहे. सदर विज देयक एकदाच निर्गमित करण्यात येत असून त्याचे ग्राहकाला वितरण करण्यात आले आहे. त्यामुळे सदर विज देयकाची प्रत उपलब्ध नाही. मात्र सी.पी.एल म्हणजेच ग्राहकाचे पर्सनल लेजर आहे. सदर लेजर ही निर्गमीत झालेल्या विज देयकाचे संपूर्ण माहिती देणारी प्रत आहे. त्यामुळे मागितलेल्या

**( पान ३ वर ..)**

विज देयकाची संपूर्ण त्यामध्ये आहे. त्यामुळे दिनांक २७.३.२००० ते जुलै, २००९ पर्यंतचे विज देयक समजण्यात हरकत नाही. त्यात तत्सम संपुर्ण माहिती नियमीत झालेल्या विज बिलावर असलेली माहिती सारखीच आहे. विज देयक हे एकदाच निर्गमि करण्यात येतात. त्यामुळे पुन्हा विजेचे देयक देता येणार नाही. पत्र क्रं.साअ/संपुर/महसुल/१०६४ दिनांक १७.८.२००९ नुसार मे. चंद्रा स्टोन र्वर्कस मार्फत श्री सिंघवी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार ग्राहक क्रं. ३९७७६००००७७६ बाबतची माहिती दिनांक १७.३.२००९ रोजी एस.एस.मुन कनिष्ठ तंत्रज्ञ यांना श्री सिंघवी यांचे सि.पी.एल व इतर कागदपत्रे घेवून त्यांचे घरी पाठविण्यात आले. घरी कुणीही नसल्यामुळे त्यांनी परत उपविभागीय कार्यालयास सादर केली. त्यानंतर दिनांक २१.८.०९ रोजी जेच कागदपत्रे श्री जि.पी.ठाकरे तंत्रज्ञ यांना सिंघवी यांचे धरी पाठविले असता तिथे कुणीही आढळले नाही. त्यांचे घर मंगरुळ जावा पासून ३ कि.मि.अंतरावर जंगलामध्ये आहे. परत दिनांक १.९.२००९ रोजी श्री एस.एस. मुन कनिष्ठ तंत्रज्ञ यांना तेच कागदपत्रे घेवून सदर ग्राहकांचे धरी पाठविण्यात आले. घरी त्यांचा मुलगा असल्यामुळे त्यांना ते कागदपत्रे देण्यात आले. (सासेबत श्री मुन व ठाकरे यांचे याबाबतचे पत्र जोडले आहे.) त्यामुळे विहित मुदतीत माहिती देण्यात आली आहे. आपणास माहिती साठी सादर.

सदरच्या खुलाशावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली दिसून येते. त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ८८६/०९ व अपील क्रमांक ८८७/०९ खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८८९/२००९**

**१) श्री भास्कर मिठुजी डोंगरे,**
**कस्तुरबॉ वार्ड, (पंचशिल झेंडयाजवळ) गोंदिया-४४१६०१,**
**ता.जि. गोंदिया.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, गोरेगांव, ता.गोरेगांव, जिल्हा गोंदिया.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा ग्राम सेवक,**
**ग्राम पंचायत पुरगांव, पो.गोनखैरा ता.गोरेगांव, जि.गोंदिया** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१०.०९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती मिळाल्याचे आयोगापुढे सांगितल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८९६/२००९**

**१) श्री सुदाम तुकारामजी चापले,**
**कात्यायाणी रुग्णालयामागे, बालाजी वार्ड,**
**चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,**
**भूमी अभिलेख कार्यालय, चंद्रपूर. ता.जि.चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,**
**भूमी अभिलेख कार्यालय, चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१०.०९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.७.०९ रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक यांचेकडे, राज्य माहिती आयुक्त खंड पीठ, नागपूर यांचे अपील क्रं.१८० दिनांक १७.३.०९ चे आदेशाप्रमाणे फेर फार कशाच्या आधारावर केले त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती पुरविण्यात सूचित केले होते. परंतु अजून पर्यंत प्रती प्राप्त झाल्या नाही. फेर फार करीत असताना मला सूचना कां देण्यात आल्या नाही. अशी माहिती टपालाने मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.८.२००९ रोजी विषयांकित प्रकरणात फेर फार मंजूरीची कार्यवाही नायब तहसिलदार (महसुल विभाग) यांचे आदेशाप्रमाणे झाली असल्याची संबंधीत खस-यावर नोंद असून सदर आदेशाची प्रत या कार्यालयास उपलब्ध नाही. त्यामुळे आपण संदर्भिय अर्जात मागणी केलेली माहिती इकडून पुरवता येत नाही. तसेच शासकिय कामकाजाचे दिवशी सकाळी ११ ते दुपारी १२ वाजेपावेतो नक्कल फी भरणा केल्यास सन १९९८-९९ चे खस-याची प्रमाणित प्रत आपणास पुरविण्यात येईल, कृपया कळावे, असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.८.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १७.९.०९ रोजी देण्यात आला असून सदर प्रकरणात मोका चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत तालुका निरीक्षक यांना सूचना दिली आहे अशा प्रकारचे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु दिनांक १७.९.०९ रोजी तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख चंद्रपूर यांनी अधीक्षक, भूमी अभिलेख चंद्रपूर यांना मौजा चांदा नझुल मोहल्ला बालाजीपुरा शिट नं.७ ब्लॉक नं.८८ प्लॉट नं. २३/२, २४ व २५/२ क्षेत्र ३६२.३० चौ.मी.चे धारक श्री सुरेश वल्द काशिनाथ मेंढी व इंदीराबाई काशिनाथ मेंढी रा. चंद्रपूर यांचे नावाची सन १९७६-७७ चे खस-यात नोंद असून रकाना क्रं.९ मध्ये रा.मा.क्रं. १५६/७५-७६ यांचे आदेश दिनांक २३.३.७७ प्रमाणे केलेली नोंद कार्यालयीन अभिलेख्याची पडताळणी केली असता

**(पान २ वर ..)**

बरोबर असल्याचे आढळून आले. वरील नोंदीचे अनुषंगाने शोध घेतला असता या कार्यालयात आदेश उपलब्ध नसल्याचे दिसून आले. असे कळविलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाच्या सुनावणीत दिलेल्या सूचनेप्रमाणे मोका चौकशी न करता व अहवाल न दिल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, सदरचा खसरा त्यांचा स्वत:चा आहे. घर बांधलेले आहे. त्याची आज किंमत १५ लख आहे. असे असताना सुध्दा सदरच्या खस-याच्या संदर्भात दूस-याच्या नांवाने फेर फार करण्यात आली. व माझे नांव कमी करण्यात आले. व त्याकरीता फेर फार कशाच्या आधारावर घेतले आहे याबध्दलची कागदपत्रे मागितलेली आहे. सन १९७७ मध्ये फेर फार नायब तहसिलदार यांनी घेतले. त्यासंदर्भात कागदपत्रे उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यावर अधीक्षक भूमी अभिलेख, चंद्रपूर यांनी प्रथम अपीलाच्या सुनावणीत मोका चौकशी करुन अहवाल पाठविण्याबाबत आदेश देण्यात आले होते. परंतु तरीही तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांनी मोका चौकशी केलेली नाही. जर कागदपत्रे उपलब्ध होत नसेल तर मोका चौकशी करणे हा योग्य मार्ग आहे, व त्याकरीता फी ही अर्जदार यांना भरण्याची आवश्यकता नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, चुकीचे फेर फार संबंधीत कार्यालयाने घेतलेले असल्यामुळे त्यांची कोणत्याही प्रकारची चुक नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांनी मोका चौकशी करणे संयुक्तीक राहील. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीतकर्ता यांच्या संपूर्ण खस-याची मोजणी करुन व त्यावरील मालमत्तेची संपूर्ण मोका चौकशी करुन अहवाल अधीक्षक, भूमी अभिलेख यांना सादर करावा. तसे न केल्यास तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांचे विरुध्द रुपये २५,०००/- ची शास्ती लादण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

२) अधीक्षक, भूमी अभिलेख यांनी अहवाल सादर झाल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ प्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन अपीलकर्ता यांना फेर फारचे संदर्भात माहिती विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८९३/२००९**

**१) श्री भाऊराव तानबाजी बनसोड,**
**प्लॉट नं.६, गणेशनगर, ग्रेटनाग रोड, नागपूर-०९.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,**
**नागपूर विभाग, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
**रवींद्र अध्यापक विद्यालय, रेशिमबाग, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.१०.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, रविंद्र अध्यापक विद्यालय, रेशिमबाग गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.२.०९ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांचेकडे, श्री पी.पी. अहीरराव, माजी प्राचार्य, रविंद्र अध्यापक विद्यालय, रेशिमबाग यांचे संदर्भात एकुण ६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ७.८.०९ रोजी देण्यात आला असून प्राचार्य तथा संस्था सचिवांनी न्यायायालयाच्या निर्देशाप्रमाणे कार्यरत समितीच्या नांवांची यादी अर्जदारास देण्यात यावी. मुळ ठरावाची झेरॉक्स प्रत संस्था सचिवानी अर्जदारास पुरवावी. शाळा समितीची अद्यावत यादी सचिवांनी अर्जदारास पुरवावी, असे आदेश देण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यानंतर सुध्दा ११ सप्टेंबर, २००९ पर्यंत अध्यक्ष/सचिव, श्री गुरुदेव एज्युकेशन सोसायटी नागपूर किंवा प्राचार्य यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे पुन्हा स्मरणपत्र दिलेले दिसून येते. व त्यानंतर संस्थेने दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे असल्यामुळे दिनांक २४.७.०९ रोजी पुन्हा प्रथम अपीलाच्या संदर्भात सुनावणी घेण्यात आली व संस्था सचिव व अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य तथा माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे मान्य केल्यानुसार दिनांक ७.८.०९ अन्वये माहिती देण्याबाबत निर्णय देण्यात आलेला दिसून येतो. त्यानंतरही प्राचार्य तथा माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली याबाबत दिनांक २६.८.०९ अन्वये अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे तक्रार केलेली दिसून येते. व त्याप्रमाणे अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य यांचेवर प्रशासकिय कार्यवाही करण्यासाठी कळविले आहे असे अपीलकर्ता यांना कळविलेले

**(पान २ वर ..)**

दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, माहिती प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर देण्यात आली. अर्जाच्या नंतर ३० दिवसांचे आंत माहिती दिलेली नव्हती व जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती दिशाभूल करणारी माहिती आहे. व त्यामुळे संस्थेकडे कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती, कागदपत्राच्या छायांकित प्रतीचे स्वरुपात उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, संथा व माहिती अधिकारी तथा प्राचार्य हे योग्य ती माहिती उपलब्ध करुन देत नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकिय कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. आजही, जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य हजर नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ करीत आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २३.२.०९ च्या अर्जाप्रमाणे संस्थेकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्यामधील माहिती कागदपत्राच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात जन माहिती अधिकारी यांनी, हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक २३.२.०९ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा दोन स्मरणपत्रे देवूनही दिशाभूल करणारी व चुकीची माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द रुपये १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त)ची शास्ती कां लादण्यात येवू नये या बध्दलचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा अन्यथा शास्ती कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८९९/२००९**

**१) श्री राधेश्याम पिते परसरामजी काबरा,**
**शिवाजी वार्ड, मु.पो.ता.देसाईगंज(वडसा) ४४१२०७**
**जिल्हा गडचिरोली.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद कार्यालय देसाईगंज,**
**ता.देसाईगंज, जिल्हा गडचिरोली.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक,**
**नगर परिषद कार्यालय देसाईगंज,**
**ता. देसाईगंज, जिल्हा गडचिरोली.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.१०.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, नगर परिषद देसाईगंज यांचेकडे दिनांक २.३.०९ रोजी झालेल्या न.प.विशेष सभेतील सर्व ठरावाच्या सत्यप्रती मिळण्याबाबत व हयासंबंधाने निघालेल्या नोटीसची टिपणी सहित सत्यप्रत मिळण्याबाबत. (२) दिनांक ६.३.०९ रोजी झालेल्या न.प.ची विशेष तातडीची सभेतील सर्व ठरावांच्या सत्यप्रती मिळण्याबाबत तसेच हयासंबंधाने न.प.ने काढलेल्या नोटीसची व नोटीस सोबत जोडलेल्या टिपणीची सत्यप्रत मिळण्याबाबत इ. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद करुन मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ८.६.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर दिनांक ८.७.०९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी अपीलाच्या निणर्ययाच्या कारणासहित माहिती मागितलेली दिसून येते. अपीलावर आदेश लिहिण्याची प्रथा आहे काय अशा प्रकारचा आक्षेप घेण्यात आलेला दिसून येतो. तसेच माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली याकरीता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपील मेमोमध्ये लेखी टिपणी दिलेली आहे. त्यामध्ये माहिती विलंबाने उपलब्ध झाली त्याकरीतता शास्तीची कार्यवाही करावी अशी विनंती करण्यात आलेली आहे. अपीलकर्ता यांचे लेखी बयाणसुध्दा अपीलकर्ता यांनी दिलेले आहे व त्यामध्ये अपील क्रमांक ६१७/०९ मध्ये जे आदेश पारित करण्यात आलेले आहे त्या आदेशाच्या संदर्भामध्ये आक्षेप घेण्यात आलेला आहे. वास्तविक, अपीलकर्ता यांना जर आदेश मान्य नसतील तर त्यांनी

(पान २ वर ..)

मा. उच्च न्यायालयात दाणे आवश्यक होते. कोणत्याही द्वितीय अपील मध्ये दूस-या कोणत्याही निर्णयाबध्दल आक्षेप घेणे हे नियमबाहय आहे. परंतु अर्जदार किंवा अपीलार्थी यांना सर्वच नियम माफ आहे, असे दिसून येते. अधिनियमाच्या कोणत्याही प्रकारच्या तरतुदी आपण पाळावयाच्या नाही असे अपीलकर्त्यांच्या दृष्टीने दिसून येते. कायदा जसा शासकिय कर्मचारी/अधिकारी यांना लागू आहे तसा तो अपीलकर्ता यांना सुध्दा लागू आहे. त्याप्रमाो अपील किंवा अर्ज नसतील तर त्याप्रमाणे सुध्दा निर्णय देणे हे आयोगावर बंधनकारक आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे लेखी बयाण जे आहे ते अनाठायी असेच आहे.

आज अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु ती विलंबाने उपलब्ध करुन द्यावी लागली त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

खुलासा : विषयाचे अनुषंगाने खुलासा सादर करण्यात येते की, अर्जदार श्री राधेशाम पिते परसरामजी काबरा शिवाजी वार्ड देसाईगंज यांनी या कार्यालयास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत जोडपत्र अ मध्ये मुद्या क्रं. १ ते २ नुसार आवश्यक दस्तऐवजाची मागणी केली असता जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन मुख्य लिपिक श्री म.गो. गोस्वामी यांनी विहित मुदतीत म्हणजेच ३० दिवसांचे आंत मुद्या क्रं. १ व २ ची माहिती अर्जदारास उपलब्ध करुन दिली नसल्याचे दिसून येते. यासंबंधी अर्जदार श्री काबरा यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी श्री सी.एम. सदावर्ती नगर परिषद देसाईगंज यांचेकडे दिनांक ८.६.०९ ला जोडपत्र ब १९(१) नुसा प्रथम अपील सादर केले. तत्पुर्वी जन माहिती अधिकारी  तथा मुख्य लिपिक हे दिनांक ३१.५.०९ रोजी नगर परिषद सेवेतून सेवानिवृत्त झाल्याने त्या ऐवजी पर्यायी व्यवस्था म्हणून श्री विजय बडवाईक यांनी दिनांक ६.६.२००९ ला मुख्य लिपिकाचा पदभार स्विकारल्या नंतर जोडपत्र-अ नुसार दस्ताऐवज न पुरविण्यामागील कारणाचा शोध घेतला असता श्री म.गो.गोस्वामी, मुख्य लिपिक यांनी जोडपत्र अ मधील मुद्या क्रं. १ नुसार दिनांक २.३.०९ रोजी झालेल्या सभेचे कार्यवृत्तांत ठराव नोंदवहीवर लिहीली असल्याचे दिसून आले. परंतु जोडपत्र-अ मधील मुद्या क्रं.२ नुसार दिनांक ६.३.२००९ रोजी झालेल्या सभेचे कार्यवृत्तांत ठराव नोंदवहीवर लिहीले नसल्याची बाब दिनांक २९.६.२००९ मुख्य अधिकारी नगर परिषद देसाईगंज यांचे निर्दशनास आसून दिली. यासंबंधाने मुख्य अधिकारी नगर परिषद देसाईगंज यांनी दिनांक ६.३.२००९ रोजी झालेल्या सभेचे संपूर्ण ठरावाच्या प्रती माहितीच्या अधिकारा अंतर्गत श्री राधेश्याम काबरा यांना सुनावणीच्या तारखेला उपलब्ध करुन दयावयाची असल्याने व उपरोक्त दिनांकाला झालेल्या सभेला सभाध्यक्ष म्हणून असलेले श्री जेसामल अर्जूनदास मोटवानी यांची ठरावाचे प्रारुप अंतिम करण्याची जबाबदारी होती व त्यामुळे श्री गोस्वामी यांनी सभाअध्यक्ष यांना सादर केलेले कच्चे प्रारुप अंतिम करुन दयावे अशी मौखिक विनंती केली. त्यावरुन त्यांनी सुनावणी आधी दिनांक ६.३.२००९ रोजी झालेल्या सभेचे कार्यवृत्तांताचे प्रारुप अंतिम कार्यवृत्ताची नोंद ठराव नोंदवहीवर घेवून श्री जेसामल अर्जूनदास मोटवानी तत्कालीन अध्यक्ष तथा विद्यमान उपाध्यक्ष नगर परिषद देसाईगंज यांची ठराव नोंदवहीवर स्वाक्षरी घेण्यात आली व दिनांक ८.७.०९ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीच्या वेळेस प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी, नगर परिषद देसाईगंज यांनी नस्तीवरनिर्णय दिल्याप्रमाणे कार्यालयाचे पत्र क्रं./कावि/नपदे/केमाअ/२८०/२००९ अन्वये जोडपत्र-अ मधील मुद्या क्रं. १ व २ ची माहिती श्री काबरा यांना उपलब्ध करुन देण्यात आली.

(पान ३ वर ..)

यावरुन जन माहिती अधिकारी हे वैयक्तिकरित्या दोषी आहे असे दिसून येत नाही. सभेच्या अंतिम कार्यवाहीची नोंद किंवा ठराव नोंदवहीवर अंतिमरित्या मान्य झाल्याशिवाय उपलब्ध करुन देता येत नाही व ही जबाबदारी सभाध्यक्षाची असल्यामुळे व त्यांनी ती अंतिम करुन दिलेली नसल्यामुळे ती उपलब्ध करुन दिलेली नाही हे म्हणणे योग्य वाटते व त्यानंतर माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.१०.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७९८/२००९**

**१) श्री राजेंद्र गयादीन गंगोत्री,**
**रामनगर, मरारटोली, नागपूर, ता.जि.नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**भवन्स भगवानदास पुरोहित विद्यामंदीर,**
**श्रीकृष्णनगर, वाठोडा, नागपूर, ता.जि.नागपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी,**
**भवन्स भगवानदास पुरोहित विद्यामंदीर,**
**श्रीकृष्णनगर, वाठोडा, नागपूर, ता.जि.नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.११.२००९)**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती यांचे तर्फे ॲड. श्री पी.बी.अग्रवाल हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.२.०९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे एकुण ११ मुद्यांमध्ये संस्थेच्या संदर्भातील तसेच शिक्षकांच्या संदर्भातील माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ८.४.०९ रोजी संस्थेकडेच प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस उत्तरवादी यांचे वकील यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, सदरची संस्था ही विना अनुदानित आहे व शासनाकडून कोणत्याही प्रकारचे वित्तीय सहाय्य संस्थेस किंवा शाळेस मिळत नाही. त्याकरीता त्यांनी डॉ.पंचाबराव देशमुख को-ऑपरेटिव्ह बँक लि. विरुध्द स्टेट इन्फार्मेशन कमीशन या याचिकेत मा. उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय आयोगाचे

( पान २ वर ..)

निदर्शनास आणला व त्यात ज्या संस्थेस शासनाकडून आर्थिक सहाय्य नसते ती संस्था ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ मधील सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत येत नाही, असे प्रतिपादन केले. यावरुन सदरच्या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होत नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७९६/२००९**

**१) श्री भिमराव पांडूरंग झिले,**
**मु.पो. हिंगणा, धनगरपूरा, ता.हिंगणा, जिल्हा नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, हिंगणा**
**ता.हिंगणा, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.०९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.६.२००९ रोजी तहसिल कार्यालयाचे जन माहिती अधिकारी यांचेकडे लग्नानंतर पत्नीच्या नांवाने घेतलेली शेती व प्लॉट सोडचिठठी झाल्यावर विकण्याचा आदेश नाही. याचा जी.आर.मिळण्याबाबत, शासकिय नवीन सुधारित आदेशाची प्रत, अशी माहिती व्यक्तीशः मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.७.२००९ रोजी विषयाच्या अनुषंगाने आदेश किंवा जी.आर.ची प्रत या कार्यालयात उपलब्ध नाही. संबंधीत विषयाच्या पुस्तकाचे अवलोकन करावे असे कळविलेले दिसून येते. परंतु अर्जदाराचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २०.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस अपीलार्थीला कायदयाच्या तरतुदींचा अभ्यास करण्यासाठी कायदयाची नांवे सांगण्यात आली व त्यामुळेही त्यांचे समाधान झालेले नाही व त्यामुळे प्रकरण निकाली काढण्यात आले. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी दिशाभूल व त्रोटक माहिती दिली या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

**(पान २ वर ..)**

३. वास्तविक अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जी माहिती दिली ती योग्य आहे. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचे आदेश किंवा जी.आर. नसून सदरची बाब ही कायदयाने निश्चित केलेली आहे. व त्यांना हिंदु विषयक हक्क कायदयाच्या तरतुदी पाहाण्यास सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७९७/२००९**

**१) श्री गुणवंत चतुरदास तेजसिरी,**
**कार्यालय, विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,**
**नागपूर विभाग, कॅाटन मार्केट, वेअर हाऊस, नागपूर-४४००१८. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,**
**भूमी अभिलेख, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय यांचेकडे एकुण २१ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून यते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २४.४.२००९ रोजी २१ मुद्यांवर उत्तर दिलेले दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलात पुन्हा १९ मुद्दे उपस्थित केलेले दिसून येतात. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ९.६.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलार्थीचे अपील अंशतः मंजूर करण्यात आलेले आहे. त्यात या कार्यालयाशी संबंधीत नसलेली माहिती मा.उपसंचालक, भूमी अभिलेख, प्रादेशिक विभाग, नागपूर यांचेकडून प्राप्त करुन घेणे कामी अर्जाची प्रत त्यांना सादर करावी, असा निर्णय दिलेला दिसून येतो. व इतर मुद्यांच्या संदर्भात सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले आहे.

अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना दिशाभूल करणारी

( पान २ वर ..)

माहिती मिळाली आहे व काही माहिती मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी अर्जात जे २१ मुद्दे उपस्थित केलेले आहे त्यात माहिती मागण्यापेक्षा तक्रारीचे स्वरुप आहे. व त्यांच्या पत्नीच्या शासकिय कामाच्या संदर्भात त्यांनी सदरचे २१ मुद्दे उपस्थित केलेले आहेत. आयोगानी सुध्दा त्यांच्या माहितीच्या २१ मुद्यांचे अवलोकन केले असता असे आढळून आले की, माहिती मागण्यापेक्षा त्यांची प्रत्येक मुद्यांत तक्रार दिसून येते. व त्यामुळे अधिनियमाचे कलम २(च) प्रमाणे माहिती या संज्ञेच्या व्याख्येमध्ये त्यांनी विचारलेले मुद्दे येत नाही, असा निष्कर्ष काढावा लागतो. तरीही त्यांना मुद्यांची उत्तरे दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार** क्रमांक ९७/२००९
**तक्रार** क्रमांक १६२/२००९

**१) श्री विकास गणपतराव शेंडे,**
**नागरी बँक कॅालनी, राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या मागे,**
**हिंदनगर, जिल्हा वर्धा ४४२००३.** **तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**अजनी विभाग, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.११.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारकर्ता यांनी दिनांक १२.३.०९ व दिनांक ८.६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रारी दाखल केलेल्या आहेत. सदरच्या दोनही तक्रारींची सुनावणी आज दिनांक ३.११.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. तक्रार क्रमांक ९७/२००९ मध्ये तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक २४५०/०७ च्या दिनांक २१.१.२००९ च्या निर्णयाप्रमाणे जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती माहिती निरंक आहे असे कळविल्यामुळे, माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. दिनांक १८.२.०९ रोजी अपीलकर्ता यांचे १९९६ मध्ये अपीलकर्ता विरुध्द पोलीस स्टेशन अजनी येथे तक्रार दाखल असल्यास निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहिती देण्यात यावी. या आदेशावरुन १९९६ ला पोलीस स्टेशन अजनी येथील पोलीस स्टेशन डायरी व अदखलपात्र गुन्हयाचा रेकार्ड उपलब्ध नाही. तसेच भाग १ ते ५ चे क्राईम रजिस्टर मध्ये अपीलकर्ता यांचे विरुध्द गुन्हा दाखल नसल्याचे अभिलेख्यावरुन दिसून येते. तरी माहिती निरंक आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचे बयाण घेण्यात आले होते. तसेच माहिती १९९८ ला मागितली होती. परंतु त्यावेळेसही त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नव्हती. अपीलकर्ता यांना इतरही माहिती आतापर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे, असा आयोगाकडे खुलास दाखल केला आहे. व त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

३. तक्रार क्रमांक १६२/०९ मध्ये तक्रारदार यांनी अपील क्रमांक ३३४/०८ मधील दिनांक ४.४.०९ च्या निर्णयाप्रमाणे १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश होते. परंतु अपीलकर्ता यांना दिनांक १५.६.०९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली, ती विलंबाने उपलब्ध करुन दिली असे आयोगापुढे सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरच्या निर्णयाप्रमाणे आदेश मिळाल्यानंतर १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आयोगाचे आदेश आहे.

(पान २ वर ..)

निर्णयाची प्रत त्यांच्या कार्यालयात दिनांक ८.६.०९ रोजी उपलब्ध झाली व त्यानंतर दिनांक १५.६.०९ रोजी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे. यावरुन निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु दूस-या विभागाची माहिती सहा. वास्तुशास्त्रज्ञ यांचेकडून दिनांक २.३.२००९ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यातही अपीलकर्ता यांची माहिती मागण्यापेक्षा तक्रार दिसून येते. त्यामुळे तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारकर्ता यांची तक्रार क्रमांक ९७/२००९ व तक्रार क्रमांक १६२/२००९ खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक २४०/२००९**

**१) श्री वाय.एस. देशभ्रतार,**
**सुगत भवन, कुंभारे नगर, तुमसर,**
**पो.ता.तुमसर-४४१९१२, जिल्हा भंडारा.** **तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, तुमसर, जिल्हा भंडारा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारकर्ता यांनी दिनांक १४.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ३.११.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक २२८६/२००७ च्या दिनांक ५.१२.२००८ च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही अशी आयोगाकडे तक्रार दाखल केलेली दिसून येते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात संपूर्ण माहिती ही त्याहीवेळेस उपलब्ध करुन दिली व आताही उपलब्ध करुन दिलेली आहे. ज्या पुतळा समितीने ते काम केलेले आहे, त्या पुतळा समितीकडून मात्र माहिती नगर परिषेदेस उपलब्ध करुन घेता येणार नाही व ती तक्रारदार यांना उपलब्ध करुन देता येणार नाही. मात्र उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांना जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे तक्रार खारीज करण्यात येत आहे. आंत विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 755/2009

श्रीमती कविता दिलीप पाटील (स्वयंसेविका)
इंदोरा चौक गोंड मोहल्ला
पो. बेझनबाग गोदणी हॉस्पीटल जवळ
नागपूर 440004. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त (अंगणवाडी)
एकात्मिक बाल विकास सेवा योजना
रायगड भवन रिअर विंग पहिला मजला
सी.बी.डी.बेलापूर नवी मुंबई
2) श्रीमती एस. व्ही. पौनीकर
जन माहिती अधिकारी तथा
बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी प्रकल्प)
ना.प्र.3 नविन रेशीमबाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.10.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.7.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.2.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेकडे एकुण चार मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 12.3.2009 दि. 21.3.2009 दि. 24.3.2009 व दि. 6.4.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 20.4.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या सुनावणीनंतर अपीलकर्ता यांना दि. 3.7.2009 रोजी माहितीच्या अधिकाराखाली ना.प्र.1 जुना, ना.प्र.2 जुना, ना.प्र.1 नविन ना.प्र.2 नविन ना. प्र.3 नविन या प्रकरणात कार्यरत असलेल्या गटाची सचिव/अध्यक्षाची माहिती व लायसन्स व अपील क्र. 2 ची माहिती एकूण नान क्र. 2 जा. क्र. 54 दि. 22.5.09 ची प्रत व वरील संपूर्ण माहिती मिळाली व समाधान कारक मिळाली व पान 1 ते 33 पानाचा बंच विवनण केल्या

प्रमाणे प्राप्त झाला. अपूरी मिळालेली माहिती आता मिळाली असे (स्वयंसेविका) कविता पाटील यांनी लेखी दिलेले



आहे. परंतु तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना माहिती अपूर्ण मिळाली व काही माहिती लपवून ठेवण्यात आली आहे. याचा अर्थ ही बाब त्यांना जी माहिती मिळाली त्यावरुन सागीतली असल्यामुळे सदरची मागणी ही नव्याने होते. त्यात हनुमाननगर प्रकल्पातून आजपर्यंतची माहिती, कोणत्याच महिला बचत गटाची माहिती देण्यात आली नाही. रेशीमबाग प्रकल्पातून 8 महिला बचत गटाची आणि मानव नगर प्रकल्पातून 10 महिला बचत गटाची आजपर्यंतची माहिती देण्यात आली नाही असे त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये म्हटले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच अंगनवाडयांना आहार पुरवठा करणा–या महिला बचत गटानी नागपूर म.न.पा.कडून घेतलेल्या किचन एनओसी परवाना संदर्भातील आजपर्यंत तारीखवार माहिती त्याच्या प्रमूखासह देण्यात आली नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे विचारले की माहिती टप्प्याटप्प्याने का देण्यात आली तर त्यांनी असे सांगितले की माहिती एकत्रित नसते ती त्या त्या बचत गटाकडून माहिती मागवून तयार करुन द्यावी लागते. परंतु अपीलकर्ता यांना मिळालेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यांना माहिती मिळाली असे दिसून येते. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाल्याचे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 761/2009.**

श्री अल्लाउद्दीन अब्दुलभाई लालानी
मु. पो. ता. धानोरा जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद गडचिरोली

2) जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.10.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.6.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 19.1.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. माहिती अधिकारी शिक्षण विभाग (प्राथ.) यांचेकडे एकुण तीन मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 2.3.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 26.2.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 30.3.2009 रोजी देण्यात आलेला दिसून येतो. व त्यात अपीलकर्ता यांना दि. 29.4.2009 रोजी एकुण 12 पत्राची माहिती दिलेली दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे दिसून येते. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी असा युक्तीवाद केला की त्यांचेकडे माहिती उपलब्ध असून ते उपलब्ध करुन देत नाही. त्याकरीता जिल्हा परिषद कार्यालयानी 10 महिन्यापूर्वी प्रत्येक पंचायत समितीत माहिती मागितली होती व त्यामुळे ती त्यांचेकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सर्व पंचायत

समितींना माहिती मागितली होती हे खरे आहे परंतु त्या पंचायत समितींनी माहिती पाठविलेली नसल्यामुळे सामायीक जेष्ठता यादी करता आलेली नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध आहे हे अपीलकर्ता यांचे म्हणणे बरोबर आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 756/2009 व 809/2009**

श्री रमेश नामदेव तडस
बालाजी वार्ड बालाजी सभागृह
चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री चंदनखेडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मंडळ अधिकारी वरोरा
तहसिल कार्यालय वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर
2) श्री चन्नावार
जन माहिती अधिकारी तथा
तलाठी सा.क्र. 15
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.10.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.6.2009 व दिनांक 9.9.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. (अपील क्र. 809/2009 हे सारखेच आहे व दि. 8.10.2009 रोजी सुनावणीस ठेवण्यात आलेले आहे व त्यामुळे आजच सदरच्या अपीलाची सुनावणी एकत्रित घेण्यात आलेली आहे.)

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.3.2009 रोजी फेरफाराच्या नोंदीकरीता दिलेल्या कागदपत्राचे माहिती सन 1996 ते 1999 या कालावधीत. तसेच श्रीमान नायब तहलिसदार यांचे दि. 30.6.98 च्या आदेशाची प्रत आदेशाकरीता जोडलेल्या विक्रीपत्राची व सोबत जोडलेल्या कागदपत्राच्या सत्यप्रतीची माहिती मागितलेल्या दिसून येतात. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 22.4.2009 रोजी आदेशाची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. विक्री प्रमाणीत प्रतीच्या संदर्भामध्ये सब रजिष्ट्रार वरोरा यांचे कार्यालयाशी संपर्क साधून प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यावर समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 14.5.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये तलाठी यांचेकडून दि. 17.5.2009 ला प्राप्त झालेली माहिती अर्जदारास दि. 23.6.2009 ला दिली असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु तरीही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांचे म्हणणे असे आहे की तत्कालीन तलाठी यांनी नायब तहसिलदार वरोरा यांच्या अदेशाप्रमाणे फेरफार घेतलेला आहे व त्यामुळे विक्रीपत्र हे मुळ प्रकरणातच असल्यामुळे व सदरचे मुळ प्रकरण हे नायब तहसिलदार यांच्या न्यायालयातील असल्याने सदरची माहिती ही त्यांचे कार्यालयातून मिळेल असे कळविण्यात आलेले आहे. त्यावरही जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांचे मुळ प्रकरण चंद्रपूर येथील आहे असे अपीलकर्ता यांनी सांगीतल्याचे आयोगास सांगीतले व त्यामुळे सदरची माहिती ही त्या कार्यालयातून उपलब्ध होवू शकेल असे त्यांनी सांगीतले. व त्यामुळे विक्रीपत्राची छायांकीत प्रत ही संबंधीत कार्यालयातूनच उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरची दोन्ही अपीले ही खारीज करण्यात येतात.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 634/2009**

श्री सुनिलकुमार गयाप्रसाद मिश्रा
सेंट्रल इंडिया इन्स्टिटयुट ऑफ मास कम्युनिकेशन
व्ही.आय.पी.रोड धरमपेठ नागपूर 440010 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. नागपूर (शहर परिमंडळ)
काटोल रोड नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (प्रशासन)
नागपूर शहर मंडळ
काटोल रोड नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.10.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.7.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.7.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचेकडे मौजा लेंडा वर्धा रोड नागपूर येथील भूमापन क्र. 1183 हिंद सेवक संघाच्या परीसरात असलेल्या दैनिक हितवाद च्या संदर्भात एकुण सहा मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 2.9.2009 नुसार अपीलकर्ता यांना रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तत्पूर्वी अपीलकर्ता यांनी दि. 25.2.2009 प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा अपीलकर्ता यांनी चुकीच्या ठिकाणी प्रथम अपील दाखल केले होते माहिती देण्यास उशीर झाला व त्यामुळे दि. 21.1. 2009 रोजी कार्यकारी अभियंता यांचेकडे माहिती मागण्यासाठी पत्र पाठविले त्याची प्रत कार्यकारी अभियंता नागपूर शहर प्रविभाग व अपीलकर्ता यांना देण्यात आली होती. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीत युक्तीवाद करतांना असे सांगितले की माहिती त्यांना उपलब्ध झाली परंतु मुद्या क्र. 2 ची माहिती त्यांना अद्यापपर्यंत उपलब्ध झाली

नाही. माहितीच्या विलंबाच्या बद्यल प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा करतांना खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

महिती ही साधारण 30 वर्षापूर्वीची जुनी असल्याने व माहिती अर्जदारानी चुकीचे पत्त्यावर पत्रव्यवहार केल्याने त्याची माहिती देण्यास उशीर झाल्याचे दिसुन येते. तसेच माहिती देण्यासाठी संबंधीत सर्व कार्यालयांनी प्रयत्न केल्याचे दिसुन येते. वरील सर्व पत्र व्यवहार हा चूकीच्या पत्त्यावर झाला एवढेच नसुन मा. आयोग यांचेशी केलेल्या पत्रव्यवहारात सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांचा पत्ता काटोल रोड नागपूर असा चुकीचाच देण्यात आलेला आहे.

वरील सर्व पत्रव्यवहारावरुन असे दिसुन येते की 30 वर्षापूर्वीची माहिती अर्जदारास मिळवुन दिलेली आहे. तसेच वरील पत्रव्यवहारातील सर्व प्रती अर्जदारास सुध्दा पुरवून वारंवार त्यांना अवगत करण्यात आलेले आहे व कार्यालयाचे प्रयत्न चालु असल्याचे दाखवुन देण्यात आलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना मुद्या क्र. 2 ची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 10.7.2008 च्या अर्जातील मुद्या क्र. 2 ची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 758/2009**

श्री लेखराम भिवाजी चोपडे
मु. पो. आष्टी (नवीन)
ता. आष्टी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. पी. गीते
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग 1 (नि.क्षे) व मुद्रांक
जिल्हाधिकारी वर्धा
2) श्री शेरेकर
जन माहिती अधिकारी तथा
दुय्यम निबंधक (श्रेणी 1) आष्टी
तहसिल कार्यालय आष्टी
ता. आष्टी जि. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.10.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.7.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.4.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक तहसिल कार्यालय सोबत जोडलेल्या शासन परिपत्रकानुसार पुर्नवसन आणि ताब्यातील भूखंड खरेदी विक्री होते आपल्या कार्यालयामार्फत बंद का करण्यात आला आहे. फक्त अपर वर्धा साठी लागू असून खरेदी विक्री बंद का. अशी माहिती रजिष्टर पोष्टाने मागितलेली दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांना दि. 19.5.2009 रोजी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 28.5.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 29.6.2009 रोजी देण्यात आलेला असून पुर्नवसन अधिनियम 1999 च्या तरतुदीनुसार पुर्नवसनामध्ये प्राप्त झालेल्या भुखंड विकण्याकरीता मा. जिल्हाधिकारी तथा पुर्नवसन अधिकारी यांची पुर्व परवानगी घेतल्या शिवाय खरेदी विक्री करता येत नाही असे जे कळविलेले होते ते योग्य असल्यामुळे प्रथम अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांचेकडे तशा प्रकारच्या ब–याच

नोंदलेली दस्तऐवज उपलब्ध आहे व त्यावर जिल्हाधिकारी तथा पुर्नवसन अधिकारी यांचे कोणतेही परवानगी घेतल्याचे दिसून येत नाही. मात्र त्याबद्यलचा खुलासा हा अपीलकर्ता उशिरा सुनावणीस हजर झाल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त होवू शकला नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे निदर्शनास वस्तुस्थिती आणून अधिनियमाच्या तरतुदीचा तसेच प्रत्यक्षात झालेल्या त्या भुखंडाच्या नोंदणीच्या संदर्भात खुलासा करुन घेणे क्रमप्राप्त होईल. तसेच त्यानंतर सुध्दा जन माहिती अधिकारी यांचे मत कायम असल्यास अपीलकर्ता यांना संबंधित विभागाच्या वरीष्ठ अधिका–याकडे तक्रार करणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता सदरचे अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे पुर्नसुनावणीकरीता पाठविणे संयुक्तिक राहिल.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर (दि. 29.5.2009 ची) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुर्नसुनावणी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत प्रत्यक्ष अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे उपस्थितीत घेण्यात यावी व अपीलकर्ता यांना त्याप्रमाणे निर्णय देण्यात यावा.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 760/2009

श्री हरीभाऊ गोविंदराव साठे
वार्ड नं. 2 मु. पो. नाचणगाव 442306
ता. देवळी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री राजु जवळेकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्था)
आयुक्त कार्यालय
नागपूर विभाग नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी (प्रशासन)
आयुक्त कार्यालय
नागपूर विभाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.10.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.9.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी आयुक्त कार्यालय नागपूर विभाग यांचेकडे दि. 23.3.2009 च्या आधीच्या ग्रा पं. अधिनियम 1958 च्या कलम 39 (1) आणि 14 (ह) च्या किती केसेस नागपूर आयुक्त कार्यालयात विलंबातीत आदेशाची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 24.7.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यानंतर अपीलकर्ता यांनी दि. 3.8.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 11.8.2009 रोजी देण्यात आलेला असून आपण मागितलेली माहितीचे संबंधाने या कार्यालयातील 14 (ह) व 39 (1) प्रकरण नोंदवहीच्या मासिक गोषवारा माहे मार्च 2009 च्या पानाची झेरॉक्स प्रत आपणास पुरविता येईल. सदर माहिती आपण स्वतः या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येवून नियमानुसार शोधन फी चा भरणा करुन उपलबध माहिती घेवून जावे असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे पुन्हा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून

येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. वास्तविक अपीलकर्ता यांना दि. 23.3.2009 च्या आधी च्या थकीत प्रकरणाच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. मात्र द्वितीय अपीलामध्ये दि. 14.10.2008 च्या आधी च्या दि. 23.3.2009 पर्यंत च्या अशी नवीन माहिती मागितलेली दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांना अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 23.3.2009 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 777/2009

श्री चद्रशेखर काशीराम मेश्राम
श्रीनगर चद्रशेखर वार्ड बब्बा भवन जवळ
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा पुरवठा अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया

2) श्री के. बी. मिश्रा
जन माहिती अधिकारी तथा
सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.10.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.9.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.7.2009 रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी अन्न पुरवठा विभाग गोंदिया यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. 23 जाने. 2009 ला परवानाधारक परवाना क्र. 808एच75 यांच्यावर इसी एक्ट अंतर्गत कार्यवाही करण्यात आली व कोणत्याही प्रकारचे आदेश जिल्हा पुरवठा अधिकारी तहसिलदार कडून आदेश न देता पुरवठा निरीक्षक विजय शहारे यांनी केरोसीनचा सप्लाय का बंद केले. असे अधिकार विजय शहारे यांना आहेत का. इाणि इशाक बेग यांच्यावर अशीच कार्यवाही करण्यात आली. 2. सेवईवार आणि केरोसीन अध्यक्ष चंद्रशेखर मेश्राम यांच्यावर तीन वर्षात 36000 लिटर केरोसीनचा काळा बाजार करण्याचे आरोप केले आहे. व त्यांच्या विरुध्द तीन वर्षात आपण का कार्यवाही केली नाही 3. मार्च 2008 ते एप्रील 2009पर्यंत विजय शहारे पुरवठा निरीक्षक केरोसीनची किती चौकशी केली याबद्यलची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती ही तहसिलदार यांचे स्तरावरील असल्यामुळे तहसिलदार यांचेकडून माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता

यांनी दि. 27.6.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 20.8. 2009 रोजी देण्यात आलेला असून माहिती विहित मुदतीत दिलेली असल्यामुळे सदरचे अपील फेटाळण्यात आलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांनी विजय शहारे पुरवठा निरीक्षक यांनी मार्च 2008 ते एप्रील 2009पर्यंत केरोसीनची किती चौकशी केली व कोणा परवानाधारकाला काय निर्णय दिला याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे ज्या तक्रारी पाठविण्यात आलेल्या आहेत त्या तक्रारीच्या बद्यल पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही. जन माहिती अधिकारी तथा सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना तहसिलदार यांचेकडून आलेली मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी वरीलप्रमाणे पुन्हा तपशिलात माहिती पाहिजे म्हणून आयोगापुढे युक्तीवाद केला. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना विजय शहारे पुरवठा निरीक्षक यांनी मार्च 2008 ते एप्रील 2009पर्यंत या कालावधीत केलेल्या केरोसीनची चौकशी व परवान्याच्या संदर्भात केलेली कार्यवाहीची माहिती तसेच तपासणी अहवाल तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे यांच्याकडे केलेल्या तक्रारीच्या संदर्भातील माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 6.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 773/2009**

श्री घनश्याम जयनारायण ब्रजपुरिया
गुजरी बाजार कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहा. निबंधक सहकारी संस्था
ता. कामठी जि. नागपूर

2) श्री दिपक बोदरकर
जन माहिती अधिकारी तथा
सहा. निबंधक सहकारी संस्था
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.10.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.9.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.6.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. निबंधक सहकारी संस्था यांचेकडे श्री शिव गृह निर्माण संस्था ची बायलॉज व सदस्योकी सुची मागितलेली दिसून येते. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 16.6.2009 रोजी सहा. निबंधक यांनी अध्यक्ष, सचिव, पदाधिकारी यांना श्री शिव गृह निर्माण संस्था अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु सदरची माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 20.7.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. त्याप्रमाणे दि. 23.7.2009 च्या पत्राप्रमाणे पुन्हा संस्थेच्या सुनावणीस उपस्थित राहावे असे पत्र दिले व त्यानंतर दि. 29.7.2009 रोजी कोणीही उपस्थित झाले नाही म्हणून दि. 30.7.2009 रोजी श्री ब्रजपुरिया यांनी मागितलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधीत संस्थेस वैयक्तीकरित्या संपर्क साधण्यास कळविण्यात आले. परंतु तरीही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

सदर सुनावणीच्या वेळी श्री मामीडवार यांनी संस्थेची उपविधी व सभासद यादी देण्यास नकार दिला नाही मात्र सदरहू संस्थेचा रेकॉर्ड नागपूर येथे असल्याने किमान 14.9. 2009पर्यंत कालावधी देण्यावी विनंती केली. मात्र हा कालावधी नियमाला धरुन नसल्याने कार्यालयात उपलब्ध असलेल्या ए फाईल चे उपविधीची तथा संस्था नोंदणीचे वेळी असलेल्या सभासदाची यादी देण्यात यावी असे तसेच त्याबाबत झेरॉक्सचा खर्च देण्यात तयार असल्याबाबत श्री ब्रजपुरीया यांनी मान्य केले. त्यावर श्री ब्रजपुरीया यांना या कार्यालयात उपस्थित होवून आवष्यक त्या रकमेचा भरणा करुन माहिती घेवून जाण्याबाबत ठरले. सदर सुनावणीच्या वेळी श्री ब्रजपुरीया यांनी उपस्थित म्हणून स्वाक्षरी करण्यास नकार दिला. तसेच श्री ब्रजपुरीया हे सदर सुनावणी नंतर या कार्यालयात हजर झाले नाही किंवा रक्कम भरणा संदर्भात संपर्क सुध्दा साधला नाही.

तसेच श्री ब्रजपुरीया या पुर्वी दि. 1.2.2007 रोजीच्या अर्जान्वये श्री शिव गृह निर्माण संस्था रनाळा या संस्थेची बॉयलॉजची कॉपी व 2000 ते 2006 या कालावधीचे ऑडीट रिपोर्ट यांच्या नकला व वर्तमान कार्यकारणी यांच्या प्रती मिळण्याबाबत अर्ज सादर केला होता. सदर अर्ज हा संदर्भीय संस्थेला पाठविण्यात येवून अर्जदाराला माहिती आवश्यक ती फी आकारुन पुरविण्यात यावी असे कळविण्यात आले. त्यावर संस्थेने दि. 27.2.2007 रोजीच्या पत्रान्वये श्री ब्रजपुरीया यांनी मागीतलेली संबंधीत बॉयलॉज कॉपी आणि संस्थेजवळ उपलब्ध अंकेक्षण अहवालाची प्रत देण्यास तयार असल्याचे तसेच त्याकरीता रु. 150/— संस्थेच्या कार्यालयात त्वरीत भरणा करुन घेवून जाण्याबाबत कळविले. परंतु श्री ब्रजपुरीया यांनी सदर रकमेचा भरणा केला किंवा कसे याबाबत या कार्यालयास काहीही अवगत नाही.

त्यानुसार सादर करण्यात येते की श्री ब्रजपुरीया यांनी मागीतलेली माहितीच्या संदर्भात या कार्यालयातर्फे वेळोवेळी कार्यवाही केलेली आहे. श्री ब्रजपुरीया यांनी मागीतलेली माहिती संदर्भात या कार्यालयात सुनावणी वेळोवेळी घेण्यात आली असुन माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच श्री ब्रजपुरीया यांनी या कार्यालयात माहितीचा अधिकार अंतर्गत अर्ज दाखल केला होता. सदर अर्जावर अपील अधिकारी म्हणुन जिल्हा निबंधक सहकारी संस्था नागपूर हे आहेत. परंतु श्री ब्रजपुरीया यांनी प्रथम अपीलीय प्राधिकरणाकडे अपील सादर न करता सरळ राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अर्ज दाखल केलेला आहे.

तरी या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती श्री ब्रजपुरीया यांना देण्यास तयार आहे. तसेच श्री ब्रजपुरीया यांनी प्रथम अपीलीय प्राधिकरणाकडे अपील दाखल केला नसल्याने श्री ब्रजपुरीया यांची अपील खारीज करण्यात यावी असे या कार्यालयाचे मत आहे. व यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांनी मागीतलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 6.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 776/2009**

श्रीमती चंद्रकला विनोदकुमार राठी
तर्फे श्री प्रकाश माहेश्वरी
द्वारा श्री मुरलीधर माहेश्वरी
3 नवजीवन कॉलनी वर्धा रोड नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अजय रामटेके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. उपायुक्त –1
महानगर पालिका नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
सहा. आयुक्त (धंतोली झोन)
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.10.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.8.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.4.2009 रोजी जन माहिती अधिकारी महानगर पालिका नागपूर यांचेकडे Unauthorised construction of ३rd and ४th floors on Plot No. २ Mouza Sitabuldi bearing CTS No.३०५४/१ Sheet No.४/७६ Khasara No.३२७ and covering of marginal spaces around the building by shed. च्या संदर्भामध्ये एकुण 6 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 7.4.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 18.5.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 11.6.2009 रोजी देण्यात आलेला असून मुद्येनिहाय माहिती त्वरीत द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु तरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे तर्फे श्री सारंग नेरकर वकील हजर झाले. व त्यांनी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून युक्तीवाद केला. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे परंतु ती संक्षिप्त आहे. व त्यामुळे मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले होते. व त्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा जन माहिती अधिकारी हे रु. 25000/-च्या शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 6.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 775/2009**

श्री पंढरीनाथ काशिनाथ आगलावे
घुग्गुस वार्ड क्र. 6 बहिरमबाबा नगर
हनुमान मंदिराच्या समोर पो. कॉ.नं.1
ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री हरिष माटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी
पंचायत समिती चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर

2) श्री एस. जी. बारसागडे
जन माहिती अधिकारी तथा
सचिव
ग्रामपंचायत घुग्गुस
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.10.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.9.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.3.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत घुग्गुसयांचेकडे नाल्यांचे बांधकाम पूर्ण झालेले व सुरु असलेले कोणकोणत्या फंडातून केले. सन 2008 ते 2009पर्यंत एकुण 6 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 4.7.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 14.8.2009 रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्यामुळे व आपण दुस–यांदा प्रथम अपील अर्ज दाखल केला तरी सदरची माहिती आपणास पुरविण्यात येत आहे असे आदेश दिलेले आहेत. माहिती घेणेकरीता अर्जदार यांना बोलाविले होते. कार्यालयात हजर झाले पण माहिती स्विकारली नाही असे नमूद केलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भात त्यांचे समाधान झालेली नाही व त्यांना वेगळी माहिती दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांना मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता तीच तीच माहिती निरनिराळया प्रकारे मागत असतात. त्यांचे अपील क्र. 535/2009 व 537/2009 हे आयोगानी फेटाळलेले आहे. माहिती घेण्यासाठी ज्यावेळेस अर्जदार नकार देतात तेव्हा त्यांना माहितीची आवश्यकता नाही असे दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 6.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 771/2009

श्री दिलीप विठ्ठलराव ठाकरे
192 सतनामी नगर लकडगंज
नगपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सु. प्रे. मेश्राम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा व्यवस्थापक
मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय
वर्धा रोड नागपूर

2) श्री अ. बा. बैस
जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक
मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय
वर्धा रोड नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.10.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.9.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी शासन मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय चर्नी रोड मुंबई यांचेकडे मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय वर्धा रोड नागपूर या कार्यालयाने संचालक शासन मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय चर्नी रोड मुंबई यांना लिहीलेले पत्र दि. 7.4.2008 चे पत्राची झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी अशी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 13.8.2009 रोजी अर्जात मागणी केलेले व संचालनालयास लिहीलेले पत्र दि. 7.4.2009 चे नसून दि. 8.4.2008 चे गोपनीय पत्र आहे. त्यामुळे या गोपनीय पत्राची प्रत माहितीचा अधिकार अधिनियम–8 मधील पोटकलम (घ) व (छ) अन्वये देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी तत्पूर्वीच दि. 30.7.2009 पुर्वी 30 दिवस पूर्ण होण्याआधीच प्रथम अपील दाखल केले. व त्यामुळे दि. 27.8.2009 अपीलकर्ता यांना सदरचे पत्र गोपनीय कारणास्तव उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी सदरचे पत्र त्यांचेकडून अत्यंत आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले. त्यांनी मॅट मध्ये

सुध्दा केस दाखल केली आहे व त्याकरीता सदरचे पत्र आवश्यक आहे. आयोगपने पत्राचे अवलोकन केले असता सदरचे पत्र उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारची गोपनीयता दिसून येत नाही असेच दिसून आल्यामुळे सदरचे पत्र उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 23.7.2009 च्या अर्जाप्रमाणे पत्राची छायांकीत प्रत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 6.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 774/2009**

श्री मोहन काशिनाथ सोनकुसरे
रा. इंदिरा नगर वार्ड नं. 6
पो. लांझेडा ता. जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधिक्षक
पोलीस अधिक्षक कार्यालय
ता. जि. गडचिरोली

2) जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उप अधिक्षक (मुख्यालय)
पोलीस अधिक्षक कार्यालय
ता. जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.10.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.9.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली यांचेकडे पोलीस कल्याण निधी, संजीवनी निधी, विपत्ती निधी डि.जी. फंड यांचे मंजुरी आदेश संबंधीत रजीस्टरचा उतारा जि.आर.कॉपी, निधी विषयी इत्यादी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 11.8.2009 रोजी 80/– रु. रोखपाल शाखा यांचेकडे भरणा करुन माहिती घेवून जावी असे कळविण्यात आलेले आहे. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 13.8.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 24.8.2009 रोजी देण्यात आलेला असून अपीलार्थीस संजीवनी निधीचे मंजुरी आदेश तसेच पेड व्हावचर देण्यात यावे असा आदेश दिलेला दिसून येतो. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना पोलीस कल्याण निधी, संजीवनी निधी, विपत्ती निधी चा शासन निर्णय उपलब्ध झालेली नाही. संजीवनी निधीची कागदपत्रे उपलब्ध झालेली आहे. त्यावर कोणत्याही सक्षम अधिका–याची अधीकृत पारीत केल्याची सही नाही. त्यातही काही पाने काढून टाकण्यात आलेली आहे. तसेच त्यांना जे अनुदान मंजुर झालेले आहे त्याची प्रत मिळालेली नाही. त्याकरीता त्यांना रु. 1,75,000/– चे मंजुरी आदेश मिळणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना आतापर्यंत संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांना अपुर्ण माहिती उपलब्ध करुन दिली असेत्यांचे म्हणणे असल्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना पोलीस कल्याण निधी, संजीवनी निधी, विपत्ती निधी चा शासन निर्णय किंवा अधिकृत ज्या अधिका–याने पारीत केलेले असेल त्या नमुन्यामध्ये तसेच त्यांना जी रक्कम मंजुर झालेली आहे त्या रकमेचे मंजुरी आदेश हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे संबंधीत लिपीक यांनी कारवाई केलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 6.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 769/2009

श्री भास्कर मिठुजी डोंगरे
कस्तुरबा वार्ड (क्रिष्णापूर) गोंदिया 441601
(पंचशिल झेंडयाजवळ) ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद गोंदिया

2) जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक
श्री शंकरलाल अग्रवाल हायस्कूल बिरसोला/काटी
पो. काटी ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.10.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.9.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.1.2009 रोजी Information certified xerox copies of the appointment orders issued by President Loktantra Multi and approval letters issued by the Education Officer Z.P.Gondia माहिती ही मुख्याध्यापक तथा माहिती अधिकारी यांना माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 16.3.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 30.6.2009 रोजी देण्यात आलेला असून श्री भास्कर मिठुजी डोंगरे यांचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नुसार अर्ज व अपीलाअन्वये श्री शंकरलाल अग्रवाल हायस्कूल बिरसोला/काटी येथे सन 2000–2001 ते 2008पर्यंत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा–यांची नियुक्ती संबंधिची माहिती श्री डोंगरे यांना पुरविण्याची व्यवस्था करावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी आज गैरहजर आहेत. राज्य माहिती आयोगाचे कार्यालयातून दि. 10.9.2009 रोजी सुनावणीची नोटिस काढलेली आहे. त्याप्रमाणे

अपीलकर्ता हजर आहेत. परंतु मुख्याध्यापक किंवा शिक्षणाधिकारी हे हजर नाहीत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी उपलब्ध करुन दिली किंवा नाही ही सिध्द करण्याची जबाबदारी त्यांची आहे व आज गैरहजर असल्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे दोषी आढळुन येतात व त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 5000/– ची शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु शास्ती लादण्यापूर्वी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकुन घेणे बंधनकारक असल्यामुळे त्यांचा खुलासा घेणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे. अन्यथा जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे रु. 25000/– ची शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता याच्या दि. 9.1.2009 च्या अर्जाप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी विहित मुदतीत माहिती करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द रु. 5000/– ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत आयोगापुढे करावा अन्यथा शास्ती कायम होईल याची नोंद घ्यावी.

3) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी प्रथम अपीलाची कोणताही दखल घेतलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 6.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 770/2009**

श्री भास्कर मिठुजी डोंगरे
कस्तुरबा वार्ड (क्रिष्णापूर) गोंदिया 441601
(पंचशिल झेंडयाजवळ) ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद गोंदिया
2) जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक
श्री शंकरलाल अग्रवाल हायस्कूल बिरसोला/काटी
पो. काटी ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.10.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.9.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.1.2009 रोजी जन माहिती अधिकारी उप शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयात Information regarding approval to the appointments to the Grade ३ employees and Grade ४ employees session २०००-२००१ २००८-२००९ session. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती ही गोंदिया जिल्हयातील मुख्याध्यापक माध्यमिक शाळेतील असल्यामुळे आपला अर्ज जिल्हयातील सर्व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक तथा माहिती अधिकारी यांचेकडे पाठविण्यात येत आहे. आपण संबंधित मुख्याध्यापक यांचेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 18.3.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 30.6.2009 रोजी देण्यात आलेला असून श्री भास्कर मिठुजी डोंगरे यांचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नुसार अर्ज व अपीलाअन्वये माध्यमिक शाळेमध्ये सन 2000–2001 ते 2008–2009पर्यंतची वर्ग 3 व वर्ग 4 शिक्षकेतर कर्मचा–यांची नियुक्ती संबंधिची माहिती श्री डोंगरे यांना काही शाळाकडून मिळालेली आहे. उर्वरीत शाळांची माहिती त्यांना पुरविण्याची व्यवस्था करावी असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी हे हजर नाहीत. प्रथम अपीलीय अधिकारी हे सुध्दा हजर नाहीत. व त्यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. त्यामुळे त्यांचेविरुध्द रु. 1000/–ची शास्ती लादणे आवश्यक आहे. तसेच अपीलकर्ता यांनी असे सांगितले की उप शिक्षणाधिकारी कार्यालयात सर्व शाळेच्या बाबत मान्यतेच्या संदर्भातील रजीस्टर ठेवले होते व त्या रजीस्टरच्या प्रती जरी त्यांना मिळाल्या तरी माहिती मिळाली असे त्यांनी सांगितले. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या दि. 9.1.2009 च्या अर्जाप्रमाणे मान्यता दिलेल्या शिक्षकेतर कर्मचा–यांच्या संदर्भामध्ये रजीस्टरच्या छायांकीत प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे आज हजर नसल्यामुळे त्यांचेविरुध्द रु. 1000/–ची शास्ती लादण्यात येते.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 6.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 742/2009

श्री अनिल शंकरलाल मुलचंदानी
एम. अनिलकुमार ॲडव्होकेट
एस–9/10 गिरिश हाईट भारत टॉकीज
सदर नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सिध्दीकी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. उपायुक्त –1
नागपूर महानगर पालिका नागपूर

2) डॉ. आर. एम. गिरी
जन माहिती अधिकारी तथा
आरोग्य अधिकारी
आरोग्य विभाग
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.10.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.8.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.6.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी आरोग्य विभाग नागपूर महानगर पालिका नागपूर यांचेकडे १. Date of application for renewal २. Action taken on the said application for renewal from १-४-२००८ till date and status of current application if submitted if any. ३. Action taken thereafter on show cause notice ४. No. of hospitals Clinics Nursing Homes running in the city without any licenses since when and action taken if any ५. Action taken on the application running into १४५ pages filed by Girish Heights owners Association Girish Heights Adj. to Bharat Takies Kamptee Road Sadar Nagpur filed on १२.२.२००९ our letters dt. २.३.२००९ ६.३.२००९ २.४.२००९ regarding closure of the Hospital.

सदरचा माहितीचा कालावधी 2007–2009 नोंदणीकृत टपालाने किंवा स्वतः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 7.7.2009 रोजी 5 मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 15.7.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 21.7.2009 रोजी देण्यात आलेला आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अचुक माहिती देणे अपेक्षित आहे. परंतु मुद्या क्र. 4 व 5 ची चुकीची माहिती देण्यात आली व विनामुल्य माहिती द्यावी असा निर्णय दिलेला आहे. त्याकरीता आरोग्य अधिकारी आरोग्य विभाग नागपूर महानगर पालिका नागपूर यांनी दि. 27.7.2009 रोजी विभागीय अधिकारी झोन क्र. 1 ते 10 यांना नोंदणी प्रमाण नसल्यास अशा नर्सिंग होम, मॅटर्निटी होम, खाजगी क्लीनीक दवाखाने इत्यादीची माहिती या कार्यालयास 7 दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले आहे. त्यानंतर दि. 20.8.2009 सहा. संचालक नगर रचना विभाग यांचेकडे सुध्दा गिरीश हाईट बिल्डींगमधील होप मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटलच्या बांधकामाबाबत माहिती मागितलेली होती पण आपल्या कार्यालयातून आजपावेतो माहिती या कार्यालयास उपलब्ध झालेला नाही. तरी ती उपलब्ध करुन द्यावी असे नमूद केलेले आहे. पुन्हा दि. 29.8. 2009 विभागीय अधिकारी झोन क्र. 1 ते 10 यांना स्मरणपत्र दिलेले दिसून येते. व तरीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना मुद्या क्र. 1 ते 3 ची माहिती उपलब्ध झालेली आहे परंतु मुद्या क्र. 4 व 5 ची चुकीची माहिती देण्यात आली. त्याबद्यल प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दोषी धरण्यात आलेले असले तरी मुद्या क्र. 4 च्या मुद्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की सदरची माहिती ही कार्यालयात उपलब्ध नसते अशा प्रकारे मागितलेली आहे. व त्यामुळे अशा प्रकारचे सर्व्हेक्षण करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षीत नाही. त्यामुळे मुद्या क्र. 4 च्या संदर्भात माहिती उपलब्ध नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. मुद्या क्र. 5 च्या संदर्भात अपीलकर्ता यांच्या 12.2.2009 2.3.2009 6.3.2009 2.4.2009 या तक्रार स्वरुपातील अर्जाच्या संदर्भामध्ये काय कार्यवाही केलेली आहे अशी त्यांनी माहिती मागितलेली आहे. परंतु सदरच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या ऐवजी शासनाच्या नगर विकास विभागाकडे अपील प्रलंबीत आहे अशी मोघम माहिती दिली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना दिशाभूल करणारी माहिती मिळाली असा युक्तीवाद त्यांनी केला आहे. वास्तविक अपीलकर्ता यांचे तक्रार अर्जावर कार्यवाही काय केली याबाबत कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. अपील शासनाकडून प्रलंबीत असलेतरी अर्जावरील कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होते व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली आहे ती अपुर्ण आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 12.2.2009 2.3.2009 6.3.2009 2.4.2009 अर्जाच्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती ज्या स्तरापर्यंत कार्यवाही झालेली असेल त्या स्तरापर्यंतची माहिती विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 1.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 740/2009

श्री बासदेव सिंग सोगरवाल
ब्रीज भूमी इंडो गॅसजवळ मोठे शिवमंदीर
येरखेडा कामठी 441002
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी
पंचायत समिती कामठी
ता. कामठी जि. नागपूर

2) श्री पी. पी. चन्ने
जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक (सचिव)
ग्रामपंचायत येरखेडा
कामठी 441002
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.10.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.8.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी सचिव ग्रामपंचायत येरखेडा यांचेकडे How much land Acres Hectes is on Revenue Record pertaining to Gram Panchayat Yerkheda २. How much land under use of Public Utility purpose ३.How much land had been encroached for personal use and by whom give names of such defaulters and what legal action has been taken by Gram Panchayat against such defaulters. ४. Give map and its locations where play Ground & Gardens which is in public use at present with its measurement. सदरची माहिती व्यक्तिशः किंवा स्पिड पोष्टने घेणार असे नमूद

केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 22.6.2009 रोजी माहिती तयार केली होती व ती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 23.7.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 7.9.2009 रोजी देण्यात आलेला आहे. माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. 13.8. 2009 अन्वये सदर माहिती सादर करणे संदर्भात भूमी अभिलेख निरीक्षक कामठी यांचे सहकार्य अपेक्षित असल्याचे कळविले आहे. त्यांचेकडून माहिती मिळालेली नाही त्यामुळे त्यांना माहिती देवू शकलो नाही. माहिती उपलब्ध होताच त्वरीत अर्जदारास सादर करण्यात येईल असे कळविलेले आहे. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना सदर पत्राची प्रत नोंदणीकृत पत्राद्वारे सादर केली आहे व त्यामुळे सादरे अपील हे खारीज करण्यात आलेले आहे. दि. 7.9.2009 रोजी वरील विषयान्वये आपणास कळविण्यात येते की ग्रा.पं. येरखेडा येथे अतिक्रमण असल्याबाबतची माहिती गावाची मोजणी झाली त्या गावाचा नकाशा ग्रा.पं. जवळ उपलब्ध नाही. तसेच कोणाचे अतिक्रमण आहे त्यामुळे सिध्द होवू शकत नाही. करीता आपणास विनंती करण्यात येते की गावाची मोजणी करुन कोणाचे अतिक्रमण आहे याची माहिती द्यावी. तसेच पटवारी यांना सुध्दा पत्र दिलेले आहे. व त्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 3.8.2009 रोजी रजिष्टर पोष्टाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ग्रा.पं.येरखेडा गावामध्ये फार मोठया प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे. त्यांचे घरा समोर नाली करीत नाही त्यामुळे घरातील पाणी बाहेर पडणे शक्य होत नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की गावठाणाचा नकाशा त्यांचेकडे उपलब्ध नाही त्यामुळे त्यांना तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे पत्रे दिलेले आहे व त्या पत्रानुसार माहिती उपलब्ध झाल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल. व अद्यापपर्यंत तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांनी कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता तातडीने जन माहिती अधिकारी यांनी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडून संपूर्ण माहिती उपलब्ध करुन घेण्याची प्रकिया पूर्ण करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांनी हा निर्णय जन माहिती अधिकारी यांना मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचे विरुध्द शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

3) जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या आदेशाची एक प्रत तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे तातडीने सादर करावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 1.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 743/2009 व 744/2009**

**<u>अपील क्रमांक 743/2009</u>**

श्री महेन्द्र सदाशिव पांडेय
चुडी मोहल्ला वार्ड नं. 10 पुलगाव
ता. देवळी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी वर्धा
2) जन माहिती अधिकारी तथा
जिल्हाधिकारी कार्यालय (न पा प्र)
वर्धा ..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक 744/2009</u>**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी
नगर परिषद पुलगाव
ता. देवळी जि. वर्धा
2) श्री अनिल हेटे
जन माहिती अधिकारी तथा
बांधकाम अभियंता पुलगाव
ता. देवळी जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.10.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.8.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 743/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 15.6.2009 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे बिना आदेश खोळंबविण्यात आलेले 14 महिन्याचे वेतन व सन 2002 पासून रोखण्यात आलेले वेतनवाढ लागु करुन बकाया रकमेचे प्रदान होणे बाबत मा. जिल्हाधिकारी वर्धा यांचे पत्र क्र. अका/नपाप्र/स.क्र.20(08)/कावि–441/09 दि. 14 मे 2009 च्या पत्राचा मुख्याधिकारी नगर परिषद पुलगाव यांनी सादर केलेल्या अनुपालन अहवालाची प्रत पुरविण्याबाबत. माहितीचा कालावधी सन 2002 ते 2009. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 25.6.2009 रोजी आपला अर्ज दि. 12.3.2009 अन्वये नियमानुसार उचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अर्जदार महेन्द्र पांडेय यांना परस्तर कळविण्यात यावा. व या पत्राची प्रत आपले माहितीकरीता सुध्दा देण्यात आलेली आहे. त्याअर्थी या कार्यालयाचे पत्र दि. 14 मे 2009 अन्वये मुख्याधिकारी नगर परिषद पुलगाव यांनी कार्यवाही केली किंवा कसे या बाबत आपणास माहितीचा अधिकारा अंतर्गत माहिती उपलब्ध करुन घ्यावयाची झाल्यास नगर परिषद पुलगाव यांचे स्तरावर जन माहिती अधिकारी उपलब्ध असल्यामुळे त्यांचे कडून माहिती मागविण्यात यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 18.7.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 20.7.2009 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना दिलेले उत्तर हे योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 744/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 2.5.2009 रोजी श्रीमती रमादेवी वि. सत्यनारायण पांडे वार्ड नं. 15 पुलगाव यांनी सन 2006–2007 या काळात वार्ड नं. 15 येथील मालमत्ता क्र. 85 च्या बांधकामासाठी आपणास पखाणगीकरीता दिलेला अर्ज व अर्जासोबत लागणारे मालमत्ताबाबतचे कागदपत्रे व आपण त्यांना दिलेली परवानगी पत्राची छायांकीत प्रत मिळणेबाबत. 2006–2007 या काळात वार्ड नं. 15 व मालमत्ता क्र. 85 होता पण वार्ड नं. 10 व मालमत्ता क्र. 128 आहे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 30.5.2009 रोजी आपण मागितलेली माहिती व दस्तवेवज या कार्यालयात रु. 26/– जमा करुन त्याच दिवशी घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. आपण प्रत्यक्ष दि. 1.6.2009 ला कार्यालयात हजर राहुन फाईलची तपासणी केली असता या फाईल मधील मागितलेले दस्तऐवज नसल्याचे आपण संगितले. आपण मागितलेली माहितीची फाईल या कार्यालयात उपलब्ध नाही असे त्याच दिवशी म्हणजे दि. 1.6.2009 रोजी कळविणत आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 10.6.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 17.7.2009 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध नसल्याचे त्यांनी स्वतः निरीक्षण करुन सांगीतलेले असल्यामुळे व ती माहिती उपलब्ध नसल्यामुळे व तसे त्यांना कळविलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले आहे. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

5. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी नस्तीचे निरीक्षण केल्यावर त्यांना वेगळीच नस्ती दाखविण्यात आली व त्यामुळे त्यांचे निदर्शनास आल्यानंतर त्या नस्तीमधील कागदपत्रे मिळायला हवी आहे ती नस्ती दाखविण्यात आली होती. परंतु

नस्तीमध्ये मुळ कागदपत्रे नसून छायांकीत प्रती उपलब्ध आहेत. तरी मुळ कागदपत्राच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. छायांकीत प्रतीच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षीत नाही. व त्यामुळे सदरच्या मुळ पत्राच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र आहेत व माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. वास्तविक अपीलकर्ता यांनी 2006–2007 या कालावधीतील आहे. व त्यामुळे बांधकामाच्या परवानगीच्या संदर्भातील माहिती ही उपलब्ध असणे अपेक्षीत आहे व तशी ती नसल्यास संबंधीत अधिकारी किंवा कर्मचारी त्यास जबाबदार आहे. संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांची जबाबदारी ही नस्तीमधील सर्व कागदपत्रे सांभाळून ठेवण्याची आहे व त्या नस्तीमधून काही कागदपत्रे गहाळ झाली असतील त्याबाबत पोलीस तक्रार करणे आवश्यक आहे. व जे जबाबदार असतील त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपील क्र. 743/2009 हे खारीज करण्यात येते.

2) अपील क्र. 744/2009 हे मंजुर करण्यात येत असून मुख्याधिकारी नगर परिषद पुलगाव यांनी संबंधीत कागदपत्रे मुळ कागदपत्रे गहाळ झाल्याच्या संदर्भात पोलीस तक्रार करावी व पोलीस चौकशी मध्ये जे अधिकारी व कर्मचारी जबाबदार असतील त्यांचे विरुध्द कार्यवाही करावी व अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 1.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 836/2009, 837/2009, 838/2009, 839/2009, 850/2009 व 851/2009.**

श्री रमेश रामजी राठोड
प्लॉट नं. 20 विज्ञान नगर मानेवाडा
नागपूर 440034 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**<u>अपील क्रमांक 836/2009, 837/2009, 850/2009</u>**

1) श्री पी. यु. पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी पाचोरा
ता. पाचोरा जि. जळगाव 424201
2) श्री एस. डी. पोंगळे
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार पाचोरा
ता. पाचोरा जि. जळगाव 424201 ..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक 838/2009, 839/2009, 851/2009</u>**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसिलदार अमळनेर
ता. अमळनेर जि. जळगाव
2) श्री आर. जी. चव्हाण
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार अमळनेर
ता. अमळनेर जि. जळगाव ..... **उत्तरवादी**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसिलदार पाचोरा
ता. पाचोरा जि. जळगाव 424201
2) श्री आर. जी. चव्हाण
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार कार्यालय पाचोरा
ता. पाचोरा जि. जळगाव 42420 ..... **उत्तरवादी**

( आदेश पारित दिनांक 15.10.2009 )

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.9.2009, दिनांक 22.9.2009, दिनांक 22.9.2009, दिनांक 19.9.2009, दिनांक 29.9.2009 व दिनांक 29.9.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये सहा द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या सहाही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 836/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 26.3.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालयामध्ये सुतित्रा साईनदास पवार हिने दि. 15.6.2007 रोजी दिलेल्या उत्पन्नाचा दाखला जोडलेले 1. सुतित्रा साईनदास पवार चा अर्ज 2. मा. तलाठी पिंपळगावचा उत्पन्नाचा दाखला 3. मा. तहसिलदार पाचोरा यांचे समोरील जबाब फार्म ची माहिती टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी अशी मागितलेली दिसून येते. पुन्हा अपीलकर्ता यांनी दि. 30.3.2009 रोजी सुतित्रा साईनदास पवार यांना शाळा सोडल्याचा दाखला मागितलेला दिसून येतो. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने संबंधित कागदपत्रे हे मा. उपविभागीय अधिकारी पाचोरा यांचेकडे दाखल असल्याने पुरविता आलेले नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 25.5.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन झालेली नाही असे अपीलकर्ता यांनी सांगितल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरची नस्ती उपविभागीय अधिकारी पाचोरा यांचेकडे दाखल झालेली होती. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. परंतु वास्तविक अपीलकर्ता यांना त्याबाबत 30 दिवसाचे आंत कळविणे आवश्यक होते. परंतु तसे ते केलेले दिसून येत नाही. यावरुन सदरच्या अर्जाची दखल घेतलेली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. व तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आहेत असे आढळुन येते. त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक राहिल. आता सदरची नस्ती उपलब्ध झालेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. व त्यामुळे सदरची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 837/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 25.4.2009 रोजी सुतित्रा साईनदास पवार (वंजारी) यांचे विरुध्द दि. 3.4.2009 रोजी तक्रार अर्ज केला होता. त्या तक्रार अर्जाच्या वरील झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 5.8.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा

दिलेला दिसून येत नाही. मात्र अपीलकर्ता यांनी रु. 35/— चा भरणा केलेला दिसून येतो व त्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना तक्रारीच्या अर्जावर केलेल्या चौकशीच्या जाबजबाबाच्या संदर्भातील प्रती दिलेल्या दिसून येतात. परंतु पूर्ण चौकशी केलेली दिसून येत नाही. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

5. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की कलम 2 (च) प्रमाणे व्याख्या केलेली माहिती भरणे अभिप्रत असून माहिती अधिकारी नियुक्त केलेल्या अर्जानुसार कार्यवाही करुन व सदर कायद्या अंतर्गत जन माहिती अधिकारी यांचेकडे जी माहिती उपलब्ध असेल किंवा आहे ती अर्जदार यांनी मागणी केल्यास पुरविणे बंधनकारक आहे. मात्र विशिष्ट स्वरुपाची कार्यवाही करुन त्याबाबत दिलेल्या निर्णयाबाबत माहिती पुरविणे अभिप्रत नाही. अर्जदार यांनी मागणी केलेली अशा प्रकारची घटना अथवा कृती म्हणजे अर्जदार यांनी तक्रार अर्जात नमुद केलेल्या व्यक्तीविरुध्द गुन्हे दाखल झालेले नसल्यामुळे त्याबाबतची माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. माहिती अधिकार कायद्याअंतर्गत जन माहिती अधिकारी, अपीलीय अधिकारी यांचेकडुन कृती घडवुन आणणे असा अपिलार्थी यांचा हेतु दिसुन येतो. माहिती अधिकार कायद्याचा हेतु उपलब्ध असलेली माहिती मागणीनुसार पुरविणे असा असुन विशिष्ट प्रकरणात कार्यवाही करुन निर्णय घेणे व माहिती पुरविणे अभिप्रत नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही निर्णय घेवून व कार्यवाही करुन पुरविणे अशी आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी, अपीलीय अधिकारी (उत्तरवादी अधिकारी) यांचेकडेस निवडणुकीचे कामकाज संपताच अपिलार्थी यांचे मागणीबाबत नियमानुसार योग्य तो निर्णय घेणेत येवून त्यांना अवगत केले जाईल अशा प्रकारे आयोगापुढे खुलासा दिलेला आहे. यावरुन अपीलकर्ता यांनी ज्या तारखेस माहितीचा अर्ज केलेला आहे तेव्हापासून 30 दिवसामध्ये जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु आयोगापुढे खुलासा केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी केलेल्या तक्रारीची चौकशी ज्यावेळेस पूर्ण होईल त्यावेळेस जो निर्णय असेल त्या निर्णयाची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

6. अपील क्र. 838/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 16.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे प्रविण साईनदास पवार दि. 25.7.2003 रोजी जातीचे प्रमाणपत्र नं. एमएसजी/31/2003 अंमळनेर येथून घेतले. त्या जातीचा दाखलासाठी कोणकोणते कागदपत्र जोडले त्या कागदपत्राबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. त्यावर दि. 14.8.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी आपण मागणी केलेल्या कागदपत्राचे अभिलेखागारात शोध घेतला असता सदर कागदपत्रे आढळुन आले नाही त्यामुळे आपणास सदर कागदपत्राचे निकाल पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना दि. 2.6.2009 चा अर्ज हा उपविभागीय अधिकारी अंमळनेर यांचेकडून जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार

यांचेकडे वर्ग करण्यात आलेला होता असे दिसते. प्रथम अपील हे तहसिलदार यांचेकडे दाखल न करता उपविभागीय अधिकारी यांचेकडे दाखल केलेले होते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 17.9.2009 रोजी देण्यात आलेला असून माहिती अधिकारी यांनी स्वतः पुनःश्च कागदपत्राची तपासणी अभिलेख व लिपीक व त्यांना मदतीसाठी दोन कर्मचा–यांची नियुक्ती करुन अर्जदाराने मागणी केलेल्या कागदपत्राचा शोध घ्यावा व अपिलकर्त्यास कागदपत्र उपलब्ध झाल्यास मोफत पुरविण्यात यावेत असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्याबाबत अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे दिसून येते. व त्याबाबत अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

7. अपील क्र. 839/200 मध्ये अपीलकर्ता यांनी तहसिलदार अमळनेर यांचेकडे अश्विनी साईनदास वंजारी हिला दि. 3.7.2009 रोजी दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या संदर्भामध्ये जी कागदपत्र आहे ती त्यांनी मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दि. 1.8.2009 रोजी मागणी केलेली माहितीचा शोध घेणे चालू असून सदरची माहिती उपलब्ध झाल्यास आपणास कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. पुन्हा दि. 26.6. 2009 रोजी अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी तथा निवासी ना. तहसिलदार अमळनेर यांनी जात प्रमाणपत्राची मुळ संचिकाची अभिलेखागारात शोध घेतला असता आढळुन आली नाही. म्हणुन आपणास नकला पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना त्यानंतर माहिती उपलब्ध झालेली आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

8. अपील क्र. 850/200, 851/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 3.4.2009 रोजीच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये उपविभागीय अधिकारी पाचोरा यांचेकडे व जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये त्याच तक्रार अर्जाच्या संदर्भामध्ये दि. 25.4.2009 रोजी व 5.8.2009 रोजी मागितलेली दिसून येते. तीच माहिती त्यांनी अ. क्र. 835/2009 मध्ये तहसिलदार कार्यालयात मागितलेली आहे. तक्रारी ही तहसिलदार कार्यालयात केलेली असल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातून सदरची अर्ज पुन्हा हस्तांतर झालेले आहे. पुन्हा दि.3.4.2009 रोजीच्या तक्रारीच्या चौकशीची प्रक्रिया पुर्ण झालेली नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असा खुलासा आयोगापुढे केलेला आहे. वास्तविक तक्रार ज्या कार्यालयात केली त्याच कार्यालयात तक्रारीवरील झालेल्या कार्यवाहीची माहिती मागणे अपेक्षित आहे. मात्र अपीलकर्ता यांनी जिल्हाधिकारी कार्यालय तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालयामध्ये व तहसिलदारकडे तीच माहिती मागितलेली असल्यामुळे सदरची दोन्ही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

1) अपील क्र. 836/2009 हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 25.4.2009 च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपील क्र. 837/2009 अपीलकर्ता यांचे दि. 3.4.2009 च्या तक्रारीच्या संदर्भामध्ये चौकशीची जी प्रक्रिया आतापर्यंत झालेली असेल त्याबद्यलची माहिती कागदपत्राच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

3) अपील क्र. 838/2009, अपील क्र. 839/2009, अपील क्र. 850/2009 व अपील क्र. 851/2009 ही अपीले निकाली काढण्यात येतात.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 15.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 844/2009

श्री अमोल नामदेव जोमनवार
मु. चांदली बुज पो. राजगड
ता. सावली जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री युवराज एस.
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली
ता. जि. गडचिरोली
2) श्री सुरेश शिंदे
जन माहिती अधिकारी तथा
सहा. प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.10.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.9.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.6.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली यांचेकडे एन.टी.बी.संवर्गातील स्वयंपाकी पदासाठी दि. 24.5.09 रोजी झालेल्या लेखी परिक्षेतील मौखीक परिखेस पात्र उमेदवारांच्या उत्तरपत्रिकेच्या सांक्षांकित प्रती मिळण्याबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 26.6.2009 रोजी मागितलेल्या अर्जातील परिक्षे संबंधात कोणतीही माहिती केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील नियम क्र. 8 (1) (इ) च्या तरतुदीनुसार देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे दि. 30.7.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 2.9.2009 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात आलेला आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. प्रकल्प अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता हे निरनिराळया विषयावर अभिप्रायात्मक माहिती मागतात. माहिती अधिकारात कोणत्याही विषयावर खुलासा मागणे

..2..

हे अपेक्षित नाही. अपीलकर्ता यांना विहित मुदतीत उत्तर देण्यात आलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा विहित मुदतीत देण्यात आलेले आहे. श्री अमोल नामदेव जोमनवार अपीलकर्ता हे श्री देवीदास रामलू जोनमवार, गृहपाल यांचे पुतना आहेत. श्री देवीदास रामलू जोनमवार, गृहपाल हे सध्या निलंबित आहेत. त्यामुळे ते कार्यालयात निरनिराळया लोकांच्या नावाने माहिती अधिकारात माहिती मागवित असतात. त्यातीलच एक भाग त्यांचे पुतना श्री अमोल नामदेव जोमनवार यांचे मार्फत माहितीच्या अधिकारा अंतर्गत अर्ज सादर करुन कार्यालयास अनावश्यक त्रास देत आहेत असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा व्यापक सार्वजनिक हिताकरीता माहिती मागणे असा अपेक्षित आहे. परंतु कोणत्याही प्रकारे सदरच्या तरतुदींचा गैरवापर करुन कार्यालयाती अधिका–यांना त्रास देणे योग्य नाही. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक नाही. परंतु त्यांची स्वतःची उत्तरपत्रिका ते परीक्षेला बसले असल्यास त्यांना पाहण्याकरीता उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल असे जन माहिती अधिकारी यांना आयोगाने सांगितले असता सदरची परीक्षेची प्रक्रियाच रद्य झालेली आहे व त्यामुळे आता सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही असे त्यांनी आयोगास सांगितले. तसे असल्यास सदरची परीक्षेची प्रक्रिया रद्य झालेली आहे असे अपीलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये परीक्षेची प्रक्रिया रद्य झालेली असल्यास तसे त्यांना लेखी विनामुल्य कळविण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 15.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 632/2009

श्री सी. पी. जेन्स
डब्लू सी एल उमरेड
ता. उमरेड जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद नागपूर

2) सिस्टर एल्मा जोसेफ
जन माहिती अधिकारी तथा
प्रिन्सीपाल
मॉडर्न हायस्कूल डब्लू सी एल उमरेड
ता. उमरेड जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.10.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.7.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.4.2009 रोजी प्राचार्य मॉडर्न हायस्कूल यांचेकडे के जी 1 ते 10पर्यंत टयुशन फी, कॉम्प्यूटर फी, डेव्हलपमेंट चार्ज, रिपोर्ट कार्ड डायरी स्कूल अकाउन्टस बॅक स्टेटमेन्ट कॉपी 2000 से 2008पर्यंतचे माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 26.5.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 17.8.2009 रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये एकुण 8730 पृष्ठे होतात व त्याबद्यलची फी रु. 9788/– असे त्यांना कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. संस्थेतर्फे वकील हजर झालेले आहेत व त्यांनी खुलासा दाखल केलेला आहे. उत्तरवादी म्हणणे असे आहे की त्यांची संस्था ही विनाअनुदानीत असल्यामुळे त्यांना सदरच्या तरतुदी लागू नाहीत. तरी सुध्दा माहिती द्यावयास तयार आहे. परंतु माहिती ही

व्यापक प्रमाणात असल्यामुळे व संस्था ही विनाअनुदानीत असल्यामुळे संस्थेला येणारा खर्च हा परवडणारा नाही व त्यामुळे सदरची माहिती अपीलकर्ता यांना त्यांनी तपासून पाहिल्यास उपलब्ध करुन देता येईल असे त्यांनी सांगितले. माहिती तयार करुन सुध्दा देता येत नाही व त्यामुळेच मुख्याध्यापिका यांनी सदरची माहिती तपासून पाहिल्यास आवश्यक त्या कागदपत्राच्या छायांकीत प्रती 50 प्रतीपर्यंत उपलब्ध करुन देवू असे सांगितले. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत उपस्थित राहण्यास तारीख व वेळ लेखी कळविण्यात यावे. अपीलकर्ता यांनी लेखी तारीख व वेळ कळविल्यावर त्या तारखेस व वेळेस शाळेच्या कार्यालयामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जे अभिलेखे किंवा दस्तऐवज उपलब्ध असतील ते त्यांचे अवलोकनार्थ सादर करावे. अपीलकर्ता यांनी स्वतः प्रत्येक कागदपत्राची तपासणी करुन स्वतःची नोंदी घ्याव्यात. कागदपत्रे तपासत असतांना कार्यालयीन कर्मचा–याची उपस्थिती आवश्यक आहे. अपीलकर्ता यांना आवश्यक असतील त्या कागदपत्राच्या प्रती 50 पेक्षा जास्त नाही अशा विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 15.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 840/2009, 841/2009, 842/2009, 843/2009.**

**<u>अपील क्रमांक 840/2009</u>**
श्री सुधानवा आर. गुमगावकर
एल.आय.सी.ऑफ इंडिया, सदर शाखा, माऊंट रोड
नागपूर 440001

**<u>अपील क्रमांक 841/2009</u>**
श्री शिवकांत जैस्वाल
एल.आय.सी.ऑफ इंडिया, सदर शाखा, माऊंट रोड
नागपूर 440001

**<u>अपील क्रमांक 842/2009</u>**
श्री अविनाश व्ही. भालेकर
एल.आय.सी.ऑफ इंडिया, सदर शाखा, माऊंट रोड
नागपूर 440001

**<u>अपील क्रमांक 843/2009</u>**
श्री नामदेव विठोबाजी हेडाऊ
एल.आय.सी.ऑफ इंडिया, सदर शाखा, माऊंट रोड
नागपूर 440001 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी
नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
उपजिल्हा निवडणूक अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

( आदेश पारित दिनांक 15.10.2009 )

नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.8.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये चार द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या चारही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.5.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा निवडणूक जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांचेकडे एकुण 36 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 18.6.2009 रोजी माहितीच्या करीता एकुण 41 पृष्ठांकरीता रु. 82/— चा भरणा करावा अशा प्रकारे पत्र दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दि. 2.7.2009 रोजी खर्चाचा भरणा केलेला आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना एकुण 41 पृष्ठ दिलेली आहेत. परंतु त्याबाबत अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 23.7.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 5.8.2009 रोजी दिलेला असून अपीलार्थीचे अपील अंशतः मंजूर करण्यात आलेले असून मुद्या क्र. 1 ते 16 बाबतची माहिती indexing and paging करुन द्यावी. दसून येतो. मुद्या क्र. 17 ते 20 तसेच मुद्या क्र. 22 ते 36 बाबतची माहिती नियमानुसार आवश्यक ते शुल्क आकारुन अपीलार्थीस पुरविण्यात यावी अप्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलार्थीनी एकच माहिती मागितलेली असल्यामुळे त्यांचे एकत्रित म्हणणे एकुन घेण्यात आले. अपीलार्थीनी यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी 36 मुद्यांमध्ये माहिती मागितलेली होती व त्यांना मुद्येनिहाय कागदपत्राच्या सवरुपात माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर सुध्दा त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. मात्र जी 41 पृष्ठ उपलब्ध करुन दिलेली आहेत त्या 41 पृष्ठांमध्ये मागितलेली माहिती नाही. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता थोडक्यामध्ये त्यांनी सार्वजनिक निवडणूकीकरीता जे नियम आहेत त्या नियमांची माहिती मागितलेली दिसून येते. त्याबाबतचे नियम, परिपत्रके, शासन निर्णय वगैरेंची माहिती त्यांना छायांकित प्रतीच्या स्वरुपात मिळणे आवश्यक होते. मात्र कोणत्याही प्रकारे जन माहिती अधिकारी यांचे मत येईल अशा प्रकारची माहिती मागता येत नसल्यामुळे ज्या मुद्यांमध्ये जन माहिती अधिकारी यांचे मत मागितलेले असेल त्या मुद्यांची माहिती ही उपलब्ध करुन देता येणार नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी 30 दिवसाचे आंत पैशाचा भरणा करावा हे जर कळविलेले असेल तर

माहिती देतांना मात्र कोणत्याही प्रकारची काळजी घेतलेली दिसून येत नाही. जी माहिती मौखीक असेल त्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची उपलब्ध करुन देता येणार नाही. सदरची माहिती ही ''माहितीच्या अधिकारात'' उपलब्ध करुन दिली अशा प्रकारे प्रत्येक पानावर स्टम्पने प्रमाणित करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहेत.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांची सर्व अपील ही अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत 1 ते 36 मुद्येनिहाय माहिती कागदपत्राच्या सवरुपात विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. व त्यांवर माहितीचा अधिकारी अर्जाप्रमाणे उपलब्ध करुन दिली असे प्रत्येक पृष्ठावर प्रमाणित करुन द्यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द तक्रार आल्यास रु. 25000/– ची शास्ती होईल याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 15.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 878 / 2009**

श्री अजय निळकंठरावजी मानकर
विकास वेल्डींग वर्क शॉप इतवारा चौक वर्धा
ता. जि. वर्धा 442001 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी
नगर परिषद वर्धा
2) श्री अतुल पाटील
जन माहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता
नगर परिषद कार्यालय वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.10.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.7.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.2.2008 रोजी जन माहिती अधिकारी नगर परिषद कार्यालय वर्धा यांचेकडे न.प.बांधकाम विभाग के वर्क ऑर्डर क्र.एमसी / डब्लू आर / पीडब्लूडी / डीई / 3812 दि. 19.2.1996 के मुताबिक वा.नं.52 मे भुरा पहेलवान से रहेमतुल्ला के घर तक इंटो की नाली दुरुस्ती व उंचीकरण के बांधकाम के मा. अध्यक्ष साहेब न.प. वर्धा के दि. 15.2.96 के मुताबीक अर्ज़दार ने किये काम की रकम के भुगतान के संदर्भ मे निचे लिखी संपूर्ण पमाणित माहिती एकुण चार मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः तथा पत्रव्यवहार डाक बुक द्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 21.4.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा झालेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करवे लागले असे दिसून येते.

3. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे त्यांनी दि. 29.10.2009 रोजी मुख्याधिकारी नगर परिषद वर्धा यांना लेखी दिलेले आहे. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती मिळालेली आहे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 30.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 883/2009

श्री अल्लाउद्यीन अब्दुलभाई लालानी
मु. पो. ता. धानोरा जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. युवराज
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली
ता. जि. गडचिरोली
2) श्री सुरेश शिंदे
जन माहिती अधिकारी तथा
सहा. प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली
ता. जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.10.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.4.2009 रोजी शासकीय माहिती अधिकारी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे 100 टक्के सुटीवर पुरविण्यात आलेल्या गॅस संच योजना अंतर्गत लाभार्थी बाबुराव दंदी मडावी यांनी यांजनेत जोडलेल्या कागदपत्राची सत्यप्रत. माहितीचा कालावधी आक्टो/नोव्हें 2007. सदरची माहिती स्वतः शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 18.5.2009 रोजी बाबुराव दंदी मडावी यांना गॅस संच मंजुर करण्यात आलेला आहे त्याबाबतची माहिती आपणास देण्यात येईल परंतु सदर कामास 15 दिवसाचा अवधी देण्याचे करावे असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 23.6.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरची माहिती ही राज्य माहिती आयोगाकडून अपीलाची सुनावणीची नोटिस काढल्या नंतर उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते..

..2..

3. अपीलकर्ता गैरहजर आहे. त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे त्यांनी माहिती अधिकारी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे कागदपत्रे मिळाले अशी पोच दिलेली आहे. परंतु सदरची माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी हे माहितीच्या अधिकाराच्या अर्जाबाबत गंभीर आहे असे दिसून येत नाही. त्यामुळे त्यांना समज देणे आवश्यक आहे. परंतु अपीलकर्ता यांनी माहिती मिळाल्याबद्यल लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व ते हजर नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 30.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 879/2009

श्री कमलाकर संतोष काळे
मु. मंगरुळ पो. व्याहाड
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री व्ही. डी. रुडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक
नागपूर ग्रामीण नागपूर

2) श्री अशोक बागुल
जन माहिती अधिकारी तथा
पोलीस निरीक्षक
पोलीस स्टेशन हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.10.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.9.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी पोलीस स्टेशन हिंगणा यांचेकडे श्री आंबटकर वकील साहेबाकडून नोटीस पाठविली होती त्यावर झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 7.8. 2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 22.8.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 5.9.2009 रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

श्री कमलाकर संतोष काळे मु. मंगरुळ यांनी त्यांचे वकील एस.एन.आंबटकर यांचे मार्फतीने शालीकराम अतकरी व सुनील शालीकराम अतकरी यांचे विरुध्द तक्रार केली

होती सदर तक्रार अर्ज मा. पोलीस अधिक्षक सा. नागपूर ग्रामीण यांचेकडून पुढील चौकशी करीता कार्यालयीन क्र. नाजिग्रा/अर्जशाखा/डी–28/हिंगणा/07 दि. 3.10.07 नुसार पो.स्टे. ला पाठविण्यात आला होता तो अर्ज पो.स्टे. हिंगणा येथे आवक क्र. 1080/07 दि. 6.10.07 ला प्राप्त झाले.

सदर अर्जाची चौकशी आमचे अधिनस्त असलेले सपोउपनि रामराव चव्हान ब.नं. 149 तत्कालीन नेमणुक ओपी पेठ यांचे कडून करुन घेण्यात आली ॲड.श्री आंबटकर यांचे पक्षकार श्री कमलाकर संतोष काळे वय 55 वर्ष रा.मंगरुळ यांचे घरी जावून त्यांना विचारपूस करुन त्याचा बयान नोंदविण्यात आला त्यांचे बयानावरुन असे निष्पन्न झाले की अर्जदारास गैरअर्जदार शालीकराम अतकरी यांनी त्यांची शेती विकण्याबाबत विचारणा केली होती अर्जदाराने शेती विकावयाची नाही असे सांगुन त्यांना नकार दिला होता त्यानंतर गैरअर्जदार हे अर्जदारास यांनी त्रास दिल्यास पो.स्टे.ला कळविण्यात येईल असे आपले बयानात सांगीतले त्यामुळे अर्जदाराचा तक्रारीवर गैरअर्जदारा विरुध्द तक्रार केल्याचे आढळून आलेले नाही.

सदर अर्जाचे चौकशीचा अहवाल मा. पोलीस अधिक्षक सा. नागपूर ग्रामीण यांना पो.स्टे. जावक आवक क्र. 2184/07 दि. 20.11.07 ला पाठविण्यात आला होता.

अर्जदार श्री कमलाकर संतोष काळे यांनी अपील अर्जामध्ये वकील श्री आंबटकर यांनी नोटीस पाठविल्याचे नमुद केले आहे परंतु पो.स्टे. गैरअर्जदार शालीकराम अतकरी सुनील शालीकराम अतकरी यांचे विरुध्द अर्ज किंवा नोटीस प्राप्त झाला नाही. गैरअर्जदार शालीकराम अतकरी व त्याचा मुलगा सुनील शालीकराम अतकरी रा. गोंडखैरी यांचे विरुध्द सपोउपनि रामराव चव्हान यांनी काय कारवाई केली याबाबत माहितीचा अधिकार अंतर्गत दि. 17.7.2009 ला अर्ज पोष्टाद्वारे अर्जदार श्री कमलाकर संतोष काळे त्यांनी दि. 17.7.2009 ला पाठविला होता. सदरचा अर्ज पो.स्टे.ला दिनांक 18.7.2009 ला प्राप्त झाला अर्जात मागीतलेली माहिती ही अर्जदार श्री कमलाकर संतोष काळे यांना दि. 4.9.2009 ला प्रत्यक्ष नापोका अनील मिश्रीा ब.नं.699 चे हस्ते त्याचे निवासस्थानी नेवून दिली आहे.

वरील प्रमाणे अपीलार्थी श्री कमलाकर संतोष काळे यांचे व्दितीय अर्जात अर्जाबाबत खुलासा असुन अर्जदार यांनी मा. पोलीस अधिक्षक सा. नागपूर ग्रामीण यांचे कडे तक्रार अर्ज दिल्याने तक्रार अर्जाचा अहवाल दि. 20.11.07 ला पाठविण्यात आला होता तसेच अर्जदार यांने पोष्टाद्वारे माहितीचा अधिकार अंतर्गत दि. 17.7.2009 ला माहिती मागीतली असता प्रत्यक्ष दि. 4.9.2009 ला माहिती देण्यात आलेली आहे. तरी सुध्दा अर्जदार हे वारंवार त्याच त्या मुद्यावर माहितीचे अर्ज आणि अपील अर्ज करीत आहे. अर्जदार यांना त्याने माहितीचा अधिकार अंतर्गत दिलेल्या अर्जाचा अनुषंगाने पुर्ण माहिती देण्यात आली आहे. तरी अर्जदार यांनी आपणाकडे व्दितीय अर्ज सादर केल्याचे आपणास सहपत्रामध्ये नमुद कागदपत्रावरुन दिसून येईल.

सदरच्या खुलाशावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 30.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 880/2009**

श्री शामराव दुर्गाजी भांगे
रा. जयताळा वार्ड नं. 115 जुना बस स्टॉप
मनोज मेडिकल स्टोअर्सजवळ नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
महसूल व वनविभाग
मंत्रालय मुंबई 32

2) श्रीमती ज्यो. मु. माडेकर
जन माहिती अधिकारी तथा
महसूल व वनविभाग
मंत्रालय मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.10.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.3.2009 रोजी जन माहिती अधिकारी महसूल व वनविभाग मंत्रालय यांचेकडे भारतीय नोंदणी अधिनियम 1908 चा 26 वा कायदा या कार्यालयाची कलम 17 मधिल तरतुदीनुसार पुढील दस्ताऐवज क्षेत्र अधिकारीकडे असलेल्या त्याच्या तालुक्यात किंवा जिल्हयात नोंदणी. नोंदणी अधिका–याजवळ नोंदणी आवश्यक आहे. मालमत्ता हस्तांतरण अधिनियम 1882 संबंधित पक्षकारानी केलेल्या मालमत्तेच्या खरेदी विक्रीचे देण्यासंबंधिचे व्यवहाराचे नियम करणारा हा कायदा आहे. नोंदणी अधिकारी ज्या कारणाकरीता नोंदनी अधिनियमाच्या कलम 71 मधील तरतुदीनुसार एखादा दस्ताऐवज नोंदण्याचे नाकारतात नाकारण्याचे कारण देणा–या पुस्तकात असलेले कायदे व नियम उपलब्ध करुन द्याल. सदरची माहिती नोंदणीकृत

टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 23.4.2009 रोजी आपण मागितलेल्या अधिनियमाच्या व नियमाच्या प्रती शासकीय पुस्तकालय (Govternment Book Depot.) अगर संबंधित विक्रेत्याकडून उपलब्ध करुन घेण्यात यावे असे जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 30.4.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 7.7.2009 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव यांनी या विभागाच्या संदर्भाधिन दि. 23.4.2009 च्या पत्रान्वये आपण मागितलेल्या अधिनियमाच्या व नियमाच्या प्रती शासकीय पुस्तकालय (Govternment Book Depot.) अगर संबंधित विक्रेत्याकडून उपलब्ध करुन घेणेबाबत कळविण्यात आलेले आहे. सदर पत्राची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे. तथापी आपले समाधान न झाले नसल्यास याबाबत पुनश्चः पत्रव्यवहार करण्यात यावा असे नमूद केलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी केलेल्या युक्तीवादामध्ये असे सांगितले की नोंदणी अधिकारी ज्या करणाकरीता नोंदनी अधिनियमाच्या कलम 71 मधील तरतुदीनुसार एखादा दस्ताऐवज नोंदण्याचे नाकारतात नाकारण्याचे कारण देणा–या पुस्ताकात असलेले कायदे व नियम उपलब्ध करुन दिलेले नाही. वास्तविक अपीलकर्ता यांनी स्वतःच भारतीय नोंदणी अधिनियम 1908 च्या कायद्यातील संबंधित तरतुदींची छायांकीत प्रत ही जन माहिती अधिकारी यांचेकडे सुध्दा पाठविलेली दिसून येते. त्यावरुन अपीलकर्ता यांना सदरच्या अधिनियमाच्या तरतुदीची माहिती दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी पुन्हा असे सांगितले की ती माहिती पूर्ण नाही व म्हणूनच त्यांनी मागितलेली होती. नागपूर येथील शासकीय पुस्तकालयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी सुचविल्याप्रमाणे विचारणा केली होती परंतु सदरच्या पुस्तकालयामध्ये त्यांना भारतीय नोंदणी अधिनियम 1908 च्या संदभातील प्रत उपलब्ध झालेली नाही व म्हणूनच त्यांनी प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल केलेले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की शासनाचे अधिनियम व नियम हे प्रसिध्द केले जातात व त्याच्या प्रती हया शासकीय पुस्तकालयामध्ये विक्रीस ठेवण्यात आलेल्या असतात व त्यामुळे हे साहित्य प्रसिध्द झालेले आहे ते पुन्हा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. व त्याप्रमाणे त्यांना कळविण्यात आलेले होते. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पाठविलेल्या पत्राचे अवलोकन केले असता पाठविलेले उत्तर हे योग्य आहे असे दिसून येते. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेले उत्तर व निर्णय हे योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 30.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 874/2009

श्री दिनेशकुमार बनारसीलाल अग्रवाल
मु. पो. ता. सडक अर्जुनी जि.
गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
वित्तीय सल्लागार/उपसचिव
अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
42, सर विठठलदास ठाकरसी मार्ग
मुंबई 400020
2) जन माहिती अधिकारी तथा
वित्तीय सल्लागार/उपसचिव
अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
42, सर विठठलदास ठाकरसी मार्ग
मुंबई 400020 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 29.10.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.9.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी वित्तीय सल्लागार तथा उपसचिव अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचेकडे दि. 15.5.2009 रोजी रजिष्टर पोष्टाने पाठविलेल्या तक्रार अर्जावर तक्रारीची चौकशी करण्यासाठी कोणत्या अधिका–याची नियुक्ती करण्यात आली होती. त्याचे नियुक्ती पत्र. अशा प्रकारे एकुण पाच मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती पोष्टाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 1.8.2009 रोजी सहा. संचालक यांनी उप आयुक्त पुरवठा नागपूर यांचेकडे सदर माहिती आपल्या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे सदर पत्राची प्रत आपणाकडे पाठविण्यात येत आहे. सदर अर्जदाराने मागितलेली माहिती अर्जदारास उपलब्ध करुन द्यावयाची असल्यामुळे सदरची माहिती त्वरीत या कार्यालयास कळविण्यात यावी असे पत्र दिलेले दिसून येते. व उप आयुक्त पुरवठा यांनी दि. 2.9.2009 रोजी जिल्हाधिकारी गोंदिया यांना पुन्हा अपीलकर्ता यांच्या

दि. 17.7.2009 च्या पत्राच्या अर्जाची प्रत आपणाकडे पाठविण्यात येत असून सदर अर्जदाराने मागितलेली माहिती अर्जदारास परस्पर उपलब्ध करुन देण्यात यावी व एक प्रत या कार्यालयास तसेच एक प्रत सहा. संचालक वित्तीय सल्लागार तथा उपसचिव अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पाठविण्यात यावी असे कळविलेले असून अपीलकर्ता यांना सदरच्या पत्राची प्रतिलिपी देवून जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया यांचेशी संबंधित असल्यामुळे आपला अर्ज हस्तांतरीत केलेला आहे असे कळविण्यात आलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 24.8.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी गोंदिया येथील गैरकारभार व तेथे केलेल्या ऑडीट बद्यलची माहिती आपण मागितलेली होती. ते पत्र या कार्यालयास आवक क्र.3662 दि. 19.5.2009 अन्वये प्राप्त झाले व कार्यासन (5) निरीक्षण यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले. कार्यासन–5 यांचे टिपणी दि.16.7.2009 अन्वये संदर्भ क्र.1 मधील पत्रातील विषय व मागणी विचारात घेता त्या पत्रावर कार्यासन (5) निरीक्षण यांचेकडून कार्यवाही करणे अपेक्षीत नसल्यामुहे ते पत्र कार्यासन (5) निरीक्षणाशी संबंधीत नाही. तसेच या कार्यालयाकडून संविधानिक लेख परिक्षण केले जात नाही केवळ चाचणी लेखा निरीक्षण केले जाते असा उल्लेख आहे. त्यामुळे सदर पत्राची प्रत व जन माहिती अधिकारी यांना अग्रेषित केलेल्या माहितीच्या अधिकाराखालील छायांकित प्रत विभागीय आयुक्त (पुरवठा) नागपूर यांचेकडे या कार्यालयाचे संदर्भ क्र.3 च्या पत्रान्वये पुढील कार्यवाहीसाठी व त्याबाबतचा अहवाल प्राप्त करणेसाठी निर्गमित करण्यात आले. ते पत्र त्यांना प्राप्त न झाल्याचा उल्लेख आहे. संदर्भ क्र.5 च्या उपआयुक्त (पुरवठा) यांचे जिल्हाधिकारी गोंदिया यांना अग्रेषित केलेल्या पत्रान्वये सदर पत्राची प्रत जिल्हाधिकारी गोंदिया यांचेकडे पाठविण्यात आली आहे. आपण मागितलेली माहिती आपणास परस्पर उपलब्ध करुन देण्यात यावी व एक प्रत उपआयुक्त (पुरवठा) नागपूर व वित्तीय सल्लागार तथा उपसचिव कार्यालयास पाठवावी असे आदेश दिलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या तर्फे ॲड. एम.डी.राहांगडाले यांनी युक्तीवाद केला. व युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिशाभूल करणारी माहिती दिली आहे असा युक्तीवाद केला. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी केलेल्या तक्रारीच्या चौकशीबद्यल माहिती मागितलेली होती. परंतु तक्रारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती न देता त्यांची तक्रार ही पुढील कार्यवाहीसाठी जिल्हा स्तरावर पाठविण्यात आले असे कळविले. परंतु जिल्हा स्तरावरुन सुध्दा कोणत्याही प्रकारची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ करण्यात आलेली आहे असे त्यांचे म्हणणे असे आहे. तसेच अपीलकर्ता हे प्रत्येक वेळेस जिल्हाधिकारी कार्यालयात गेले होते. त्यावेळेस

उपजिल्हाधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची माहिती दिलेली नाही. व त्यांचे प्रथम अपील सुध्दा सुनावणी न घेता निकाली काढण्यात आले असे म्हटले आहे. आज कोणतेही अधिकारी हे उपस्थित न झाल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपीलामध्ये माहिती अधिकारी वित्तीय सल्लागार तथा उपसचिव अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग विठठलदास ठाकरसी मार्ग मुंबई व अपीलीय अधिकारी वित्तीय सल्लागार तथा उपसचिव अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग विठठलदास ठाकरसी मार्ग मुंबई असे पत्ते दिलेले असल्यामुळे आयोगाचे कार्यालयातून दि.3.10.2009 रोजी नोटिस काढण्यात आली होती. परंतु त्या नोटिसीस कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद देण्यात आलेला नाही. त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांना रु. 25000/– ची शास्ती का लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा हा संबंधीत जन माहिती अधिकारी यांचेकडून घेणे आवश्यक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 17. 7.2009 च्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 15.5.2009 रोजी रजिस्टर पोष्टाने पाठविलेल्या पत्राच्या संदर्भामध्ये मागितलेली मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून रु. 25000/– ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा अधिनियमाच्या कलम 20 (1) च्या परंतुकाप्रमाणे आयोगापुढे सादर करावा अन्यथा शास्ती कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 29.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**